रविवार, 25 सप्टेंबर 2022
किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 02 अंक - 54
Title Code : MAHMAR51117


# आधुनिक केसरी

MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • SUNDAY 25 SEPTEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-54 • TITLE CODE : MAHMAR51117 • PAGE-14 • PRICE-5

चर्चेतली बातमी

## हेमा मालिनी म्हणतात उद्या राखी सावंतही...

आधुनिक केसरी न्यूज



**दिल्ली :** मागील काही दिवसांपासून बॉलिवूड अभिनेत्री कंगना राणौत भारतीय जनता पार्टीकडून मथुरा मतदारसंघातून निवडणूक लढवणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. बॉलिवूड अभिनेत्री हेमा मालिनी सध्या मथुरा मतदारसंघातून भाजपा खासदार आहेत. कंगना राणौत मथुरेतून निवडणूक लढणार असल्याच्या चर्चेबाबत विचारलं असता हेमा मालिनींनी आपली प्रतिक्रिया दिली आहे. कंगना राणौत मथुरेतून लढणार असतील तर चांगली गोष्ट आहे. त्यावर मी माझे विचार कशाला प्रकट करू, माझे विचार देवाला माहीत आहेत. मथुरेत कुणी खासदार असावं, हे भगवान श्रीकृष्ण ठरवतील. प्रसारमाध्यमांना उद्देशून हेमामालिनी पुढे म्हणाल्या की, मथुरेतील ज्यांना खासदार बनायचं आहे, त्यांना तुम्ही बनू देणार नाहीत. तुम्हाला मथुरेत सर्व बॉलिवूड कलाकार हवे आहेत. उद्या राखी सावंतही निवडून येऊ शकते, अशी प्रतिक्रिया हेमा मालिनी यांनी दिली आहे. त्यांचा हा व्हिडीओ सोशल मीडियात व्हायरल होत आहे. तर, मागील काही काळापासून बॉलिवूड अभिनेत्रींने अनेकदा विविध निर्णयांमध्ये भारतीय जनता पार्टीला समर्थन दिलं आहे. भाजपाच्या विविध योजनांना त्यांनी खुल्या पद्धतीने पाठिंबा दर्शवला आहे. त्यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीत मथुरा मतदारसंघातून कंगना राणौत निवडणूक लढवतील, अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे. हेमा मालिनी या मथुरेच्या विद्यमान खासदार आहेत.

# तुम्ही खोके घेऊन ओक्के झालात

## ‘जनआक्रोश’ मोर्चात आदित्य ठाकरेंचा शिंदे सरकारवर हल्लाबोल

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे : युवासेना प्रमुख आमदार आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वात वेदांता-फॉक्सकॉन प्रकल्प गुजरातला गेल्याप्रकरणी पुण्याच्या वडगावमध्ये जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. यावेळी आदित्य ठाकरे यांनी वेदांता, बल्क ड्रग पार्कनंतर मेडिसिन डिव्हाईस पार्क प्रकल्प महाराष्ट्रातून गेल्याचे सांगितले. आंदोलनात शिवसेनेच्या हजारो कार्यकत्यांनी हजेरी लावली. यावेळी आदित्य ठाकरेंनी सरकारवर हल्लाबोल केला. तुम्ही खोके घेऊन एकदम ओके झालात, पण आमच्या रोजगाराचे काय, असा प्रश्न तरुणांचा आहे. फक्त शिवसेनेच्या नाही, तर महाराष्ट्रातील तरुणांच्या पाठीत खंजीर खुपसला आहे, असा आरोप आदित्य ठाकरे यांनी यावेळी केला.**

राज्यातून अनेक प्रकल्प निघून जात आहेत. हे सत्य राज्यातील जनतेसमोर यावे यासाठी आजचा जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला आहे. हा मोर्चा जाहीर झाल्यानंतर राज्यभरातून लोक समर्थन देत आहेत. आज तळेगावात येताना मनात दुःख होते. आज महाविकास आघाडीचे सरकार असते तर राज्यात वेदांन्ताचा प्रकल्प काहीही करून आणलाच असता. त्यामुळे आज इथे आक्रोश मोर्चाच्या जागी जल्लोष मोर्चा झाला असता, अशी प्रतिक्रिया आदित्य ठाकरे यांनी दिली.

गेल्या दोन महिन्यात राज्यात रोजगाच्या संधी कुठेही दिसत नाहीत. मला या गोष्टीचे दुख नाही की प्रकल्प गुजरातला गेला. मात्र, महाराष्ट्र एक प्रगत राज्य आहे. आपण या देशाची आर्थिक राजधानी आहोत. अनेकदा आपण आपल्या मेहनतीच्या जोरावर राज्यात रोजगार खेचून आणला आहे. पण जो प्रकल्प १०० टक्के महाराष्ट्रात येणार होता, तो सरकार बदलताच गुजरात गेलाच कसा, याचे उत्तर शिंदे सरकारने द्यावे.

वेदांन्तासंदर्भात जानेवारीमध्ये झूम कॉलवर आम्ही बैठक घेतली होती. त्यानुसार मी अनिल अग्रवाल यांना महाराष्ट्रात हवं तिथे प्रकल्प उभारा महाराष्ट्र सरकार तुम्हाला हवी ती मदत करण्यासाठी तयार आहे. असे सांगितले होते. त्यानंतर मे मध्येही आमची बैठक झाली होती. त्यानंतर ८० हजार कोटींची गुतंवणूक आम्ही राज्यात आणली होती, अशीही त्यांनी शिंदे सरकारवर केली.



आदित्य ठाकरे यांनी यावेळी मोठा खुलासा केला. वेदांता, बल्क ड्रग पार्कनंतर मेडिसिन डिव्हाईस पार्क प्रकल्प जो महाराष्ट्रात होणार होता तो आता महाराष्ट्राबाहेर जात आहे. खोके सरकारचं लक्ष त्यांच्या गटात कोण येतंय, याकडे आहे. पण राज्यात उद्योग कोणते येत आहेत, गुंतवणूक कोण घेऊन येतंय, याकडे कुणाचंच लक्ष नाही आहे, अशी टीका आदित्य ठाकरे यांनी केली.

गुजरातबद्दल मला वाईट बोलायचं नाही. त्यांनी त्यांचे कर्तव्य केले. आपल्या राज्यात खोके सरकार असताना त्यांनी मौक्यावर चौका मारला आणि आपल्याकडे येणारा उद्योग त्यांच्या राज्यात नेला. मी गुजरात सरकारला याचा दोष देणार नाही. आपल्याच सरकारच्या नाकर्तेपणामुळे हा प्रकल्प गुजरातमध्ये गेला आहे, असा आरोपही त्यांनी केला.

# आरोग्यमंत्र्यांच्या मतदारसंघातील बसस्थानकालाच बूस्टर डोसची गरज



आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**उस्मानाबाद :** राष्ट्रीय महामार्गापासून हाकेच्या अंतरावर असणारे वाशी येथील बसस्थानक व बस स्थानकाला जोडणारा रस्ता त्यावर गुडघ्या एवढे खड्डे, त्यात चिखल व रस्त्याच्या बाजूने घाणीचे साम्राज्य यामुळे या रस्त्याची अवस्था अतिशय दयनीय झालेली आहे. यामुळे वाशी व तालुक्यातील नागरिकांना व एसटी कर्मचाऱ्यांना याचा नाहक त्रास भोगावा लागत आहे. बस स्टँड मध्ये बस येणे सोडा पण चालत जाणे ही कठीण झाल्याने बस स्थानकाचे ढासळलेल्या आरोग्याला मतदार संघातील आरोग्यमंत्र्यांकडून डांबराचे लसीकरण होणार का? हाच संतप्त नागरिकांमधून सवाल केला जात आहे.

दररोज राष्ट्रीय महामार्ग वरून शेकडो एसटी बसेस ये-जा करतात. मात्र याच बसेस वाशी जायचे म्हटले की, अनेक प्रवासी बसमध्ये बसायलासुद्धा तयार होत नाहीत. बस थांबा ते बसस्थानक पाचशे मीटर अंतर जायला अर्धा ते पाऊण तास वेळ लागतो. शेवटची घटका मोजत असलेल्या या बस स्थानकाकडे जाणाऱ्या रस्त्यावरून बैलगाडीसुद्धा चालवणे कठीण झालेले आहे. स्थानकाच्या आवारात प्रवाशांना दिवसेंदिवस चालणेही कठीण होत चालले आहे. त्यामुळे विकासाच्या महामेरूसाठी शिंदे सरकारमध्ये अग्रगण्य राहिलेले आरोग्यमंत्री यांनी आपल्या स्वतःच्या मतदारसंघातील वाशी बसस्थानकाकडे वेळीच लक्ष नाही घातले तर लवकरच या आजारी पडलेल्या बस स्थानकाची प्राणज्योत मालवल्या शिवाय राहणार नाही. कारण गावातील राजकीय पुढाऱ्याकडे स्वतःचे चार चाकी वाहन असल्यामुळे जनसामान्यांसाठी असलेल्या लालपरीकडे कानाडोळा कायम का? त्यामुळे स्वतःच्या मतदारसंघातील वाशी बसस्थानकाकडे जाणारा रस्ता व बसस्थानक परिसर हे सध्या व्हेंटिलेटरवर असल्याने लवकरात लवकर त्यांना बुस्टर डोसची गरज असल्याचे भासत आहे.



नवीन मंत्रिमंडळ विस्तार जोमात मात्र मतदारसंघातील सामान्य जनता कोमात? आम्हाला पण जनता दरबारात गऱ्हाणे मांडण्याची इच्छा आहे साहेब पण एसटी बस स्टँडवर येत नाही.

उस्मानाबाद ते बीड 120 किलोमीटर आंतर असलेल्या राष्ट्रीय महामार्ग वरून एसटी बस जात असताना बस दुरुस्ती किंवा ब्रेक डाऊन बससाठी वाशी हे मधोमधचे एकमेव ठिकाण असल्याने येथे बस डेपोसाठी नागरिकांमधून मागणी होत आहे.

मुख्यमंत्र्यांकडे असलेल्या परिवहन खात्याकडून बसडेपोची मागणी आरोग्यमंत्री पूर्ण करणार का?

खडीचा थरच नसलेल्या बसस्थानकाला चिखलाचा आधारच.
शेत रस्ता तरी बरा.
आरोग्यमंत्र्यांच्या मतदार संघातील वाशी बसस्थानकाचा प्रश्न कायम ऐरणीवर राहणार.

# सप्तशृंगी गडावर नवरात्रोत्सवाची जय्यत तयारी

## मूळ स्वरूपातील देवीदर्शन घेण्याची भाविक -भक्तांना लागली ओढ

आधुनिक केसरी न्यूज


बंडू खडांगळे

लखमापुर : साडेतीन शक्तीपीठ पैकी एक असलेल्या सप्तशृंगी देवीच्या नवरात्रोत्सवास सोमवारी दि.२६ पासून प्रारंभ होणार आहे. दोन वर्षांनंतर पहिल्यांदाच मोठ्या प्रमाणात नवरात्रोत्सव साजरा होणार असल्याने भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता आहे. नांदुरी गडावरील श्री सप्तशृंगी निवासिनी देवी मंदिर ट्रस्टच्या वतीने त्यादृष्टीने नियोजन करण्यात आले आहे. दोन वर्षाच्या कोरोना कालखंडानंतर यंदा लाखो भाविक गडावर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. देवी मुर्तीचे नुकतेच संवर्धन करण्यात आल्याने मुळ रूपातील देवीदशर्न घेण्याची भाविक भक्तांना ओढ लागली आहे.

**भाविकांची व्यवस्था** : दररोज देवीला पुरणपोळीचा नैवेद्य दाखविला जातो .नवरात्रोत्सवात देवीदर्शनांसाठी लाखो भाविकांची गर्दी होत असते .त्या पाश्वभुमीवर ट्रस्टने नियोजन केले आहे .ट्रस्टने भाविकांसाठी निवासव्यवस्थेसाठी वेगवेगळ्या ठिकाणी २०० खोल्या उपलब्ध करून दिल्या आहेत . एका वेळी हजारोंच्या संख्येने भाविक महाप्रसादांचा लाभ घेतील असे प्रसादालय, धर्मार्थ दवाखाना, शिवालय तलावांचे सुशोभीकरण आदी प्रमुख कामे पुर्ण करण्यात आली असुन गडावर येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने विमा काढलेला आहे . नवरात्र कालावधीत घटस्थापना, भगवतीची महापुजा , शतचंडी याग, होमहवनपुजा, श्री भगवती शिखरांवर ध्वजारोहन, पुर्णाहुती नऊ दिवस खडकबाण आदी उपक्रम व धार्मिक विधीचे आयोजन करण्यात आले आहे .

यंदाच्या नवरात्रांवर पावसांचे सावट : यात्राकाळांत वरूण राजां येतो की काय ? या चिंतेत व्यापारीवर्ग असुन कोरोना व आता मंदिर बंद असल्याने व्यापारी वर्गाचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक चक्र बंद पडले होते . पण नवरात्रोत्सव होणार असल्याने व्यापारी वर्ग आता आनंदीत पाहायला मिळत आहे .यात्रा काळात मेळा बसस्थानक असुन गावांपासुन दोन किमी आंतरावर बस गाड्यांची सेवा व्यवस्था केली जाणार आहे .यासाठी भाविकांना आता २४०बस गाड्यांची सुविधा निर्माण करून दिली आहे . नांदुरी येथे खाजगी वाहनांना व्यवस्था करण्यात आली आहे .खाजगी वाहनांना यात्रा काळांत गडावर बंदी घालण्यात आली आहे . मोफत दहा दिवस महाप्रसाद व्यवस्था ही करण्यात आली आहे . परंतु यंदाच्या यात्रेवर पावसांचे संकट आ वासून उभे राहिल्याने थोडे चिंतेचे ढग भाविक भक्तांमध्ये निर्माण झाले आहे . यात्रा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी पोलीस विभाग, आरोग्य विभाग, तसेच विविध विभाग प्रयत्नशील आहे .






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

## महिलांचा आंदोलनातील सहभाग

**एक लढा असाही (भाग-4)**

हिमालयातील जंगले जसजशी नष्ट होत गेली तसतशी तेथे राहणाऱ्या स्थानिक लोकांवर संकटे एकामागून एक येत राहिली. सुरुवातीला त्यांचा रोजगार आणि उपजीविकेची साधने हिरावून घेतली गेली. पुराच्या पाण्याने शेतीची वाताहत झाली. दरडी कोसळून गावांची, घरांची वाट लागली. गंगा, यमुनेसारख्या नद्या अंगावर खेळणाऱ्या हिमालयात तेथील जंगलात राहणाऱ्या लोकांना पिण्याच्या पाण्याची देखील मारामार पडू लागली यावर कदाचित आपला विश्वास बसणार नाही पण हे वास्तव आहे. या सगळ्या परिस्थितीचे चटके जेवढे पुरुषांना बसले, त्यापेक्षा जास्त स्त्रियांना सोसावे लागले. कामाच्या शोधार्थ गावातील बरीचशी पुरुषमंडळी शहराकडे निघून गेली. कोणी सैन्यात भरती झाले. वर्षातून एकदा ही मंडळी गावाकडे येत. पण त्यांच्या अनुपस्थितीत स्त्रियांनाच तेथील सगळ्या समस्यांना तोंड द्यावे



लागे. मुलांचे लटांबर सांभाळत तुटपुंज्या शेतीवर राबावे लागे किंवा ठेकेदाराकडे मोलमजुरी करावी लागे. त्यातील बऱ्याचशा स्त्रिया तर कधी शाळेतही जाऊ शकल्या नव्हत्या. त्यांच्या मुलाबाळांना देखील त्या भागात शिक्षणाची कोणतीही सोय नव्हती. अशा रीतीने शिक्षणाची प्रचंड आबाळ होत होती. पण जगता जगता आणि निसर्गाशी दोन हात करता करता आयुष्य नावाच्या शाळेत मिळणारी अनुभवाची शिदोरी या महिलांच्या गाठी जमा झाली होती.

अशाच प्रतिकूल परिस्थितीतून चिपको आंदोलनाचे नेतृत्व करण्यासाठी काही महिला पुढे आल्या. त्यात गौरा देवी प्रमुख होती. गौरा देवीचा जन्म १९२५ मध्ये चमोली जिल्ह्यातील लाता गावात झाला. ती कशीबशी पाचवीपर्यंत शाळेत जाऊ शकली. ती ११ वर्षांची असतानाच तिच्या वडलांनी तिचे लग्न रेणी गावातील मेहेरबान सिंह यांच्याशी करून दिले पण पुढे दहा वर्षांनी तिच्या पतीचे निधन झाले. वयाच्या केवळ २२ व्या वर्षी गौरा देवी विधवा झाली. यावेळी तिचा एकुलता एक असलेला मुलगा केवळ अडीच वर्षांचा होता. (क्रमशः)



# आनंदी पहाट

## सुखद आठवणी म्हणजे आनंदानुभूती

आधुनिक केसरी

"आठवणी म्हणजे आनंदाचे कंद", हे एकीकडे आपण अनुभवत असतो, पण त्या आठवणींत आपण स्वतः किती व्यस्त व्हायचे, ह्याचे भान राखणे देखील महत्वाचे ठरते. जोपर्यंत काही घडत आहे, तो पर्यंत सर्व ठीक आहे; पण जेव्हा काही बिघडेल तेव्हा मात्र निस्तरणे मुश्कील ठरू शकते. ह्याची जाणीव आपल्याला होणे अधिक महत्वाचे आहे. कित्येकदा, ह्या आठवणीच आपल्या मनाला उभारी देत असतात. आपला मानसिक एकलेपणा दूर करण्याच्या कामी येतात. आपण शरीराने एका वेळेला एकाच ठिकाणी जाऊ शकतो, पण गत काळातल्या आठवणी मात्र आपल्याला अनेक ठिकाणांची सफर करवून आणतात. आठवणी ह्या मुंग्यांच्या वारुळाप्रमाणे असतात. आठवणींचेही तसेच आहे. साठवणीतल्या अशा अनेक आठवणी आपल्या मनांत घर करून रहात असतात. आठवणीतला एखादा क्षण जरी आपल्याला आठवला तरी तो संपूर्ण दिवस विलक्षण करत जातो. ह्या आठवणीच आपापल्या परस्परांतील नात्याची वीण घट्ट करत जातात.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपण वर्तमानांत आपले जीवन जगत असताना खरे तर सद्यःस्थितीचा आणि नजीकच्या भविष्यकाळाचा विचार करणे महत्वाचे, गरजेचे आणि म्हणूनच आवश्यक असते. आपण वर्तमानातील जीवन जगताना प्राप्त परिस्थितीचा आनंद लुटण्याच्या ऐवजी भूतकाळाचे गोडवे गात बसतो. मागील काळात, गत आयुष्यात, भूतकाळात मी कधी, कसा, कोण, कोठे आणि काय होतो, ह्यापेक्षा सद्यःस्थितीत, वर्तमानकाळात, आज मी कसा, कोण, कोठे आणि काय आहे? आणि ते सुद्धा का? ह्याचा प्रकर्षाने आणि प्राधान्याने, सातत्याने आणि साकल्याने अभ्यासपूर्वक विचार करत राहणे गरजेचे असते. मी कालच्या पेक्षाही आज सरस, प्रगत होणे आवश्यक आणि म्हणूनच महत्वाचे असते.

# संस्कार धन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

**भाग-40**

## शेजारधर्म पाळूया

आधुनिक केसरी

कुठेही गेलो की शेजारी फार महत्त्वाचे असतात. मग ते घर, बंगला, बसमध्ये, जेवताना, ऐकताना, शाळेत, कॉलेजात प्रत्येक ठिकाणी शेजारी महत्त्वाचे आहेत. आपण आपला शेजारधर्म पाळलाच पाहिजे. समोरचा कसा आहे याचा विचार करू नका .तुम्ही चांगले आहात ना मग त्यांच्याशी चांगलेच वागा. घरात मोठ्याने टीव्ही लावून शेजाऱ्यांना त्रास देऊ नये किंवा शेजारची मुले अभ्यास करतात ना मग आपण मोठ्यांनी गाणी लावायची का? काही काही गोष्टींचे दोघांनी पालन करावे. व शेजारधर्म जपावा. प्रत्येक संकटाच्या वेळी शक्यतो शेजारी उपयोगात येतात. कारण ते सर्वात जवळ राहत असतात. प्रत्येक कुटुंबाची संस्कृती वेगळी असते. आपण चांगले तेवढे घ्यावे. इतर गोष्टीकडे कानाडोळा केलेलाच बरा.शेजाऱ्याशी पवित्र नातं असावं .चांगल्या विचारांची देवाण-घेवाण व्हावी. एकमेकांचा मान राखावा. कधीतरी ट्रीप सोबत करावी. नेहमीच सहकार्याची भावना ठेवा . नेहमी मीच का मदत करावी ? ही भावना ठेवू नका .त्यामुळे अहंकार उत्पन्न होतो. अहंकारामुळे नातेसंबंध बिघडतात. सगळ्याच नाही पण काही गोष्टींची चर्चा शेजाऱ्यांशी जरूर करावी. शेजारी कोणी राहत नसेल तर उजाड, ओसाड वाटते. शेजारीपाजारी कलकलाट हा असलाच पाहिजे. लहान मुले असतील तर त्यांच्याशी गोड बोलून त्यांना टाटा बाय-बाय करत जा. एक छानशी स्माईल त्यांना दिली की ती मनात खूष होतात. शेजार-शेजारधर्मच असावा तो शेजार व्यवहार होवू नये. त्या नात्यात मग ओलावा राहत नाही,. बऱ्याचदा मग शेजार चांगला नाही म्हणून घर बदलतात. पण स्वतःचे घर असेल तर ते बदलताही येत नाही .चला तर मग आपला शेजारधर्म पवित्र ठेवू या...

## घरातील संस्कारापेक्षा सोशल मीडियाचे संस्कार वरचढ

आधुनिक केसरी

अस म्हणातात की चांगले संस्कार लागण्यास खुप वेळ लागतो पण वाईट संस्कार पटकन लागतात. आता हे पटायला लागलंय कारण रोज एक-एक नवीन किस्से समोर येत आहेत, घरातल्या घरात भांडण इथपर्यंत आपण समजू शकतो कारण तो इतिहास सर्वश्रुत आहे पण आजकाल पोराने वडीलाचा निर्दयपणे खून केला, छोट्याश्या कारणासाठी मुलाने आईला मारले असे अनेक किस्से वरचेवर आपणास पहावयास मिळतात, आई-वडिलांना आजकालचे मुले सर्रास खोटं बोलतात, आपली संस्कृती एवढ्या लवकर एवढी बदलेल हे स्वप्नात सुद्धा वाटले नव्हते, कुछ पाने के लिये कुछ खोना पडता है पण इथे सर्व वाईट घेण्यासाठी जे काही थोडंफार चांगलं होतं ते आपण सोडत आहोत. याचेच खुप वाईट वाटते. धाक, मान, ईज्जत आजकालच्या पिढीत बिलकूल दिसत नाही, घरातल्या संस्कारापेक्षा बाहेरच्या सोशल मेडियाच्या संस्काराचा विळखा आजकालच्या पिढीवर जबरदस्त दिसून येत आहे, याला पुर्णपणे मेडिया जवाबदार आहे, लहान बाळाच्या हातातील मोबाइल काढून घेतला की बाळ मोठ्यांनी भोकाड पसरते हा वीडियो खुप व्हायरल होताना आपण बघतो पण साधा विचार आपण करत नाही की मोबाइल हे लहान बाळाचे खेळणे नाही, आपण कौतुकाने परत त्याच्या हातात मोबाईल देतो इथेच आपले चुकते, आपण चुकिच्या गोष्टींना प्रोत्साहन देतो आणि नंतर त्याचे फळं भोगतो, ऑनलाइनच्या नावाखाली मुलांच्या हातात मोबाईल गेले, नव्हे त्यांच्या पालकांनीच त्यांना दिले पण अभ्यासा व्यतिरीक्त मुले काय गुण उधळत आहेत हे बघण्यासाठी आई-बापांकडे वेळच नाही, त्यांनाही जेंव्हा वेळ मिळतो तेंव्हा तेही मोबाइलवर ऑनलाइनच असतात, हे जर थांबले नाही तर प्रकरण खूप हाताबाहेर जाणार आहे व नंतर हे आटोक्यात येणे शक्य नाही, जेंव्हा हा सोशल मेडिया एवढा ऍक्टिव नव्हता तेंव्हा लोकांचे विचार एकमेकांपर्यंत सहज पोहोचत होते पण आता टेक्नोलॉजी एवढी प्रगत झाली पण एकमेकांचे विचार अगदी जवळच्या व्यक्तींपर्यंत देखील पोहोचत नाहीत. याला प्रगती म्हणायचे का अधोगती. पुर्वी खुप धाक असायचा, बंधने असायची आता 100 % मोकळीक त्यामुळे सर्वांना चुका करणे खुप सोपे झाले आहे, अती विश्वास कधीही अंगलटच येतो याची ताजी उदाहरणं आपल्यासमोर आहेत यातून तरी काहितरी शिकलं पाहिजे.

-संजय व्यापारी, संपर्क क्र. 7743918559

# "निरुपण"


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**जगदम्ब नमस्तुभ्यं कोटिचन्द्रप्रभे नमः।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं कोटिसूर्यप्रभे नमः।। १९ ।।**
कोटीचंद्राप्रमाणे, प्रभा असणारे, जगदंबिके, तुला नमस्कार असो. कोटीसूर्याप्रमाणे प्रभा असणारे, जगदंबिके, तुला नमस्कार असो.
**जगदम्ब नमस्तुभ्यममृतवृष्टिहेतवे।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं विषप्रभावनाशिनि।। २० ।।**
अमृतवृष्टीसाठी जगदंबिके, तुला नमस्कार असो. विषाचा प्रभाव विनष्ट करणारे, जगदंबिके, तुला नमस्कार असो.
**जगदम्ब नमस्तुभ्यमनुपमे मनोरमे।**
**नमस्तेऽस्तु महामाये मनसः शान्तिहेतवे।। २१ ।।**
हे अनुपमे, मनोरमे, जगदंबिके, तुला नमस्कार असो. मनाच्या शांतीसाठी महामाये, तुला नमस्कार असो.

# ।। दासबोध स्तवन ।।



## सारशोधन

आधुनिक केसरी

माझ्या मते समर्थानी या समासात समाजातील प्रत्येक गोष्टींचा बारकाईने तपशील सांगितला आहे. आपण आपल्या व्यवहारी जगात जे जे पहातो ते ते समर्थानी मांडले आहे "आपण कसे असावे व कसे नसावे"
हे ज्याचे त्यांनी ठरवावे पण एकदा का तुम्हाला परमार्थाची गोडी लागली की सारासार विचार करून जीवन जगण्याची कला तुम्हाला सापडेल त्यासाठी संतवचनाचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

मित्रांनो या समासात आत्मानुभवाचे तसेच थोडक्यात पण अतिशय रहस्यपूर्ण वर्णन "सारशोधन"या समासात आपण अभ्यासणार आहोत.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

समर्थ म्हणतात संसाराचा त्याग न करता,प्रपंचात रमून देखील माणूस वैचारिक बुध्दीच्या जोरावर केवळ सुक्ष्म विचाराने आत्मज्ञान अनुभवू शकतो. याच जन्मामध्ये मनाने संसारातुन अलग होऊन स्वस्वरूपाकार होता येते. हे केव्हा शक्य आहे तर मग मित्रांनो आपल्या बुध्दीच्या जोरावर वाणी,विचार, सारासार विवेक,समोरच्याला न दुखवता केवळ आत्मसंपन्न होणे व देहीची विदेही दशा भोगता येते. व निर्गुण देवाशी अनन्यपणाने रहाता येते. व सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे सर्व काही करून आपले अकर्तेपण राखुन ठेवणे म्हणजेच परमात्म्याशी एकरूप होणे होय. नाही तर आपण समाजात पहातो की "मी"पणाअंगाखांद्यावर मिरवणारी माणसं आपण हरघडी बघतो. पण तो कर्तेपणा सोडून देऊन त्यांना आपल्या वाट्याला आलेले कर्म निसंकोच,कुठल्याही प्रकारचा हव्यास न करता कुठल्याही प्रकारचा बडेजाव न करता परमार्थ करतो तो खरा परमात्म्याशी एकरूप होतो त्याची सेवा सद्गुरूच्या पर्यन्त पोहचते. आपल्या या विश्वामध्ये सगुण व निर्गुण, द्रुष्य व अद्रयुष्य,स्थुल व सुक्ष्म,विशेष व सामान्य, माया व ब्रम्ह,सार व असार एकत्र असतात. आपण तर सामान्य माणसं आहोतच चांगले वाईट याचा विचार करून आयुष्य जगत परमेश्वर रूपाची आठवण सतत लक्षात ठेवली पाहिजे. जीवनात प्रत्येक ठिकाणी असार सांडून किंवा सोडून देऊन सार घ्यावे लागते. असार हे वरवरचे कवच आहे तर सार हे अंतरंगातील रहस्य आहे. यालाच "सारासार विचार"म्हणतात. जेव्हा तुमच्या मनी सारासार विचार करण्याची वैचारिक बैठक तयार होते व यालाच सत्संग असे म्हणतात. परमात्मा वेगळा खरा पण तो अंतर्यामी व्यापून रहावा यासाठी संतांच्या संगतीत राहून गुप्त परमात्मा शोधून काढण्यासाठी प्रयत्न करावेत.

# ।। भगवंताचे होण्यानेच काळाच्या पलिकडे जाता येते ।।

आधुनिक केसरी

आपल्या जीवनाचा सारखा विकास होतो आहे. म्हणून, आपण आज जिथे आहोत त्याच्या मागे काल होतो, आणि आज जिथे आहोत त्याच्या पुढे उद्या आपण जाऊ. हे जरी खरे, तरी आज आपण जे करायला पाहिजे ते न केले, तर एखाद्या वेळी उद्या मागे जाण्याचा प्रसंग आपल्यावर येईल. पुढचा जन्म हा आजच्या जन्मातूनच निर्माण होतो. तेव्हा आपण आज चांगले असलो तर, 'अन्ते मतिः सा गतिः' या नियमाप्रमाणे पुढचा जन्म आपल्याला चांगलाच येईल. काळ मुख्यतः तीन प्रकारचा असतो; कालचा, आजचा आणि उद्याचा. जो काळ होऊन गेला तो काही केले तरी परत येणार नाही; म्हणून त्याची काळजी करू नये. एखाद्याचे कोणी गेले तर आपण त्याला असे सांगतो की, "अरे, एकदा गोष्ट होऊन गेली; आता काय त्याचे ! आता दुःख न करणे हेच बरे." हे जे तुम्ही लोकांना सांगता, तसे स्वतः वागण्याचा प्रयत्न करा. मागे होऊन गेल्याची विवेकाने विस्मृती पाडता येते. तसेच, पुढे काय होणार हे माहीत नसल्यामुळे त्याची काळजी करू नये. आजचे आपले कर्तव्य आपण केल्यानंतर, 'जे व्हायचे ते होणारच' म्हणून स्वस्थ बसावे. मागची आठवण करू नये किंवा



गेल्याचे दुःख करू नये, आणि उद्याची किंवा होणाऱ्या गोष्टीची काळजी करू नये. सध्या, आपल्याला कालाच्या पलीकडे जाता येत नाही, आणि कालाच्या पलीकडे गेल्याशिवाय भगवंत मिळणार नाही, अशी अवस्था आहे. जगात घडामोडी सारख्या होत आहेत आणि आपली तळमळ कायम आहे ! आपल्याला जी तळमळ लागते ती आपल्या अपुरेपणामुळे, अपूर्णतेमुळे लागते.

कोणीही मनुष्य जन्माला आला की भगवंताला आनंद होतो, कारण सत्यस्वरूप प्रत्येकाला कळावे अशी भगवंताची इच्छा आहे, आणि हे कार्य फक्त मनुष्य जन्मामध्येच शक्य आहे, यासाठी भगवंत आपल्याला समजण्यासारखा आहे हे प्रत्येकाने लक्षात ठेवावे. याकरिताच आपल्याला भाव, इच्छा, तळमळ, आच, मनातून उत्पन्न व्हायला पाहिजे. पुष्कळ चांगला स्वयंपाक केला आणि मीठ घालायचे राहिले तर काय उपयोग ? भाव जर दुजा ठेवला तर भजन चांगले झाले असे कसे म्हणावे ? भक्तीचे नऊ मार्ग सांगितले आहेत. त्यातल्या कोणत्याही एकाचेच पूर्ण भाव ठेवून परिशीलन केले तरी त्यात बाकीचे आठ येतात. आपल्याला जे कळले ते आपल्या आचरणात आणावे, हे खरे ऐकणे होय. जो आपल्या रक्तामासात मिसळतो आणि रोजच्या वागण्यात आणता येतो तोच खरा वेदान्त होय; आणि आपल्या कर्तव्यामध्ये भगवंताचे स्मरण ठेवणे हेच सर्व वेदान्ताचे सार आहे.

आजचे बोधवचन : वेदान्त हा रोजच्या आचरणात आणला पाहिजे.

**-श्रीसद्गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

# अवैध गौण खनिज तस्करांचा नंगानाच : त्याला महसूलची साथ

## कन्नड तालुक्यात तेरा वर्षीय शाळकरी मुलीचा ट्रॅक्टर खाली येऊन पाणपोही फाटा येथे दुर्दैवी अंत

आधुनिक केसरी न्यूज

**गोरख पाटील**



**कन्नड :** तालुक्यातील नविन व्यवसाय सुरू करण्यासाठी पायाभरणी साठी भरती, वीटभट्टी साठी कुठली ही परवानगी न घेता गौण खनिज माफियाचा धुमाकूळ चालू आहे सदरं गौण खनिज वाहतूक करणारे जेसीबीच्या साहाय्याने मुरूम,पोयटा व इतर गौण खनिजचे उत्खनन बेकायदेशीर करतात महसुल विभागाला चिरीमिरी देऊन वेळ काढुन घेतात. त्यात काही ठिकांनी तर बेकायदेशीर अवैध वाहतुक असल्याने हायवा, ट्रॅक्टर चालक क्षरशा रात्री व दिवसा सुसाट वेगाने वाहतूक करतात त्यामुळे पाई चालणारे दुचाकी स्वार यांना नाहक त्रास सोसावा लागत आहे. अश्याच बेजबाबदार वागण्यामुळे बनशेंद्रा येथील छत्रपती शिवाजी माध्यमिक विद्यालयाची रा. डोणगाव वस्ती येथील श्रद्धा सोमनाथ पिंपळे या विद्यार्थांनीचा मुरूमणे भरलेल्या ट्रॉलीखली येऊन दुर्दैवी अंत झाला महसूल विभागला काही जनाची नाही तर मनाची लाज वाटायला हवी पैश्यासाठी निष्पाप शाळकरी मुलांचा बळी गेला. फुल उमलायच्या आत कळीचा अंत झाला यास सर्वस्वी महसूल विभाग जबाबदार आहे अशी जोरदार चर्चा तालुक्यात सुरू आहे. विशेष म्हणजे या ट्रॅक्टर वाहनाच्या ट्रॉलीचा परवाना हा शेती कामाचा आहे की मुरूम वाहतूकसाठी आहे हा पण मोठा प्रश्न पडला आहे. व्यवसायिक परवाना गरजेचा असताना कृषिच्या वाहणातुन हे अवैध वाहतुक करत आहे मात्र महसूल विभाग कुंभाकर्णी झोपेत आहे असाच प्रकार बनशेंद्रा हद्दीतून ,सुवर्णपालेश्वर डोंगर, रेल तांडा, कोळसवाडी , कारखाना डोंगर तालुक्यातुन विविध ठिकानाहुन भरती माफीया व विटभट्टी चालक, मालक, व अवैध खनिज माफियाकडून जेसीबीद्वारे मुरूमाची अवैध वाहतूक दिवसाढवळ्या चालू आहे मात्र ना पोलिसांचे लक्ष आहे ना महसूल विभागाचे तर का ? ट्रॅक्टर व जेसीबीवाल्याने सांगितले की हफ्ते चालू असल्याचे निर्ल्लजपणे वर तोंड करून हे जेसीबी व ट्रॅक्टर मालक सांगत आहेत अशीही दबक्या अवाजात चर्चा सुरू आहे. मात्र यावर महसूल मंत्री यांनीच लक्ष देण्याची गरज आहे.





संबंधिताने तहसील कार्यालयाकडे अर्ज केला आहे पण तहसील कार्यालयाची कुठलीच परवानगी त्यांना दिली नाही यामुळे त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल झाला आहे तहसील कार्यालयाकडून दंडात्मक कारवाई होईल .
**संजय वारकड, तहसीलदार कन्नड**

काम सुरू असताना आमच्या प्रतिनिधी यांनी मंडळ अधिकारी यांना संपर्क केला असता ते म्हणाले की आम्ही त्यांना सांगितलं आहे रितसर परवानगी घ्या मग काम सुरू करा .
**सतिष भदाने, मंडळ अधिकारी**

# परभणी जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करा

## कृषी मंत्री अब्दुल सत्तार यांच्याकडे शिवसेनेची निवेदनाद्वारे मागणी



आधुनिक केसरी न्यूज

**परभणी :** महाराष्ट्र राज्याचे कृषी मंत्री आज शनिवार दि.२४ सप्टेंबर २०२२ रोजी शिवसेना (शिंदे) गट कार्यकर्त्यांच्या मार्गदर्शन मेळाव्यासाठी पुर्णेत आले असता शिवसेना जिल्हा प्रमुख विशाल कदम तालुका प्रमुख कालिदास काळबांडे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाळे त्यांची झिरोफाटा येथे ताफा अडवून भेट घेऊन त्यांच्याकडे एका निवेदनाद्वारे परभणी जिल्ह्यासह पुर्णा तालुक्यात सरसकट कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत देण्याची मागणी केली. शिवसेना जिल्हा प्रमुख विशाल कदम यांच्या नेतृत्वाखाली जमलेल्या असंख्य शिवसैनिकांनी यावेळी 'पन्नास खोके गद्दार ओके' परभणी जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर झालाच पाहिजे शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळालीच पाहीजे शेतकऱ्यांच्या हक्काचा पिक विमा शेतकऱ्यांना मिळालाच पाहिजे अश्या गगनभेदी घोषणाही दिल्या यावेळी शिवसेना तालुका प्रमुख कालिदास काळबांडे,शिवसेना शहर प्रमुख संकेत उर्फ मुंजाभाऊ कदम यांच्यासह शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक, युवासैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राणीसावरगाव येथे बस कंडक्टर व पॅसेंजर यांच्यामध्ये शुल्लक वादावरून हाणामारी

आधुनिक केसरी न्यूज



**राणीसावरगाव :** राणीसावरगाव येथे गंगाखेड ऊन निघालेल्या गंगाखेड -राणीसावरगाव -अहमदपूर ( गाडी नं. MH-20 AL-1613 ) या अहमदपूर डेपोच्या गाडीमध्ये गंगाखेड वरून बसलेला पॅसेंजर राणीसावरगाव येथे बसस्टॅन्ड वर न उतरता बस स्टँड च्या पुढील घटांग्रा चौकात गाडी उभी करून उतरण्यासाठी वाद निर्माण होऊन त्याचे रूपांतर हाणामारीत झाले. गंगाखेड येथून बसलेले पॅसेजर संतोष साहेबराव श्रीरामे आणि त्याची पत्नी महानंदा सतोष श्रीरामे राणीसावरगाव येथे उतरण्यासाठी बसले होते . बसमध्ये महिला कंडक्टर ठकुबाई आबासाहेब गुट्टे तसेच बसमधील महिला पॅसेंजर यांच्या मधीली हाणामारी पाहून चौकात जमलेल्या पब्लिकने त्यांची सोडवणी केली. पोलीस प्रशासनास कळविले असता पोलीस कर्मचारी यांनी घटनास्थळी येऊन गाडी बस ड्रायव्हर कडक्टर यांना बस साहित राणीसावरगाव पोलीस स्टेशन येथे घेऊन गेले व महिला पॅसेंजर यांना घटांग्रा चौकातील खाजगी रुग्नालयात ईलाजासाठी दाखल केले. ईलाजानंतर पुढील कार्यवाही साठी पोलीस चौकी राणीसावरगाव येथे नेण्यात आले.

# सावळी येथे चोरीच्या घटनेत वाढ ग्रामीण भागात चोरांची दहशत

आधुनिक केसरी न्यूज

**मानवत :** तालुक्यातील मौ. सावळी येथे चोरीच्या घटनेत दिवसें दिवस वाढ होत असून काही दिवसापूर्वीच येथील उत्तम जमदाडे या मजुराचा शेळ्या अज्ञात चोरट्यानी रात्रीचा सुमारास चोरून नेल्याची घटना घडली होती. ही घटना ताजी असतानाच २१ सप्टेंबर रोजी रात्रीचा सुमारास अज्ञात चोरट्यानी केबल चोरून नेल्याची घटना घडली आहे सदरील केबल हे लोक सह भागातुन उभारण्यात येणाऱ्या डी. पी. साठी ग्रामस्थांनी आणले असता अज्ञात चोरट्यानी चोरून नेल्याची घटना घडली आहे.

यामुळे ग्रामिण भागात सर्वत्र एकच खळबळ उडाली असून ग्रामस्थां मध्ये एक प्रकारचे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याकडे पोलीस प्रशासनाने लक्ष देऊन रात्रीच्या सुमारास पोलिसांनी गस्त वाढवावी अशी मागणी सावळी ग्रामस्थां मधून होत आहे.



# कन्नड ग्रामीण रुग्णालयात दिव्यांग प्रमाणपत्र नोंदणी व तपासणी



आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन मार्फत ग्रामीण रुग्णालय कन्नड येथे दिव्यांग प्रमाणपत्र नोंदणी व तपासणी दि 27 सप्टेंबर 2022 मंगळवार रोजी कन्नडचे उपविभागीय अधिकारी जनार्धन विधाते व तहसीलदार संजय वारकड यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात येणार आहे तरी खालील प्रकारे दिव्यांग व्यक्तींनी याचा लाभ घेण्यासाठी सोमवार दि 26.09.2022 रोजी ग्रामीण रुग्णालय कन्नड येथे ऑनलाईन फॉर्म भरणे आवश्यक आहे.

1.अस्थिव्यंग,2.शारीरिक व्यंग,3.अंध तसेच 4.मानसिक व्यंग ऑनलाईन फॉर्म भरण्या साठी सर्वांनी सोबत आधार कार्ड,पासपोर्ट साईझ फोटो,जुने प्रमाणपत्र असल्यास त्याची एक झेरॉक्स प्रत सोबत घेऊन सोमवार दि.26.09.2022 रोजी दु.01 ते 05 पर्यंत ग्रामीण रुग्णालय कन्नड येथे उपस्थित राहावे. कन्नड व्यतिरिक्त ग्रामीण रुग्णालय पिशोर येथे दि 28.09.2022 रोजी दिव्यांग प्रमाणपत्र नोंदणी व तपासणी शिबीर आयोजित करण्यात आलेले आहे.





प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

# राष्ट्रवाद जोपासला पाहिजे !

आधुनिक केसरी

**व्यक्तीला एक व्यक्ती म्हणून असलेले महत्त्व हे वैयक्तिक नसून सामाजिक अंगाने असते. धर्म, आध्यात्म अशा अभौतिक बाबतीत तुम्ही वैयक्तिक महत्त्वाचे असू शकता, परंतु समाज अथवा राष्ट्र या अनुषंगाने विचार करता आपण फक्त एकक असतो. तरीही एका पूर्णत्वाचे अंश रूपाने असणे यातच आपले साफल्य असते. म्हटले तर आपण फार दखलपात्र असत नाही, तरीही आपल्याशिवाय समूहाला पूर्णत्व येत नाही हेही खरे. व्यक्ती आणि समाजाचे हे सेंद्रियत्व लक्षात घेतल्याशिवाय राष्ट्र उभारणीत व्यक्तीचे महत्त्व आणि व्यक्तिविकासातील समाजाची भूमिका लक्षात येणार नाही. समाजशास्त्रीय अंगाने हा भाग समजून घ्यावा लागेल.**

युरोपीय राष्ट्रांच्या विकासात ही राष्ट्रवादी भूमिका अत्यंत महत्त्वाची होती. राष्ट्राची भौतिक समृद्धता आणि विकास घडविण्यात आणि सर्व समाजाला एका सूत्रात गुंफण्यासाठी ही संकल्पना महत्त्वाची ठरली. एकच एक विशिष्ट विचारधारा, ध्येय आणि प्रसंगी त्यासाठी सर्वस्वाचे बलिदान हे त्यातूनच पुढे आले. भारताच्या अनुषंगाने आपण जेव्हा विचार करतो तेव्हा त्या दृष्टीने आपण एक राष्ट्र नव्हतो. इंग्रजांच्या आगमनाने आम्हांस राष्ट्र ही संकल्पना माहीत झाली, असे अनेकांना वाटते, पण आमच्या बहुसांस्कृतिकतेतच आमच्या राष्ट्रवादाची बीजे होती, हे पूर्णपणे दुर्लक्षिले जाते. सरळधोपट प्रकारच्या राष्ट्रवादात इथली बहुसांस्कृतिकता गुदमरून जाते, हे आम्ही लक्षात घेत नाही. राज्यशास्त्रीय संकल्पना शिकवत असताना आम्ही समाजशास्त्रीय वैविध्याकडे दुर्लक्ष करतो, परंतु ब्रह्मांडात सुटे सुटे काहीच नसते. शारीरिक अवयवांमध्ये जसे सेंद्रियत्व स्पष्टपणे दाखवता येते तसेच समाजाचेही आहे. डोळ्याचा इलाज करायला गेल्यानंतर आपणास वैद्यक रक्तातील साखर कमी करण्याचा सल्ला देतो. तेव्हा त्या उपायांचा आणि डोळ्याचा संबंध काय? असे आपण म्हणू शकत नाही. कारण पूर्णत्वास पूर्णत्व येण्यासाठी त्याचे एकक तेवढेच महत्त्वाचे असतात. हाच सेंद्रियत्वाचा नियम समाजालाही लागू पडतो. आपल्या चेहऱ्याकडे लक्षपूर्वक पाहिले तर नाक, कान, डोळे, भुवया किती विचित्र दिसतात. तसे दिसू नये म्हणून आपण चेहरा सपाट करून घेतो का? अत्यंतिक राष्ट्रवाद समाजाचे सपाटीकरण करण्यावर भर देत असतो. राष्ट्रवाद दोन्ही रूपाने आपल्यासमोर असतो. सकारात्मक आणि नकारात्मक. यापैकी आपण कोणत्या मार्गाने जायचे हे ठरवले पाहिजे. एकीकडे जपान आणि दुसऱ्या बाजूला इटली आणि जर्मनी अशी दोन्ही उदाहरणे आपल्यासमोर आहेत. कारण इतिहासाचे परिशीलन केल्याशिवाय कोणतीही संकल्पना स्पष्ट होऊ शकत नाही. अनेक तत्त्ववेत्त्यांच्या तत्त्वांचा परामर्श घेतल्यानंतर हेगेल यांनी ही संकल्पना स्पष्ट केली तेव्हा त्यांना अनेक समर्थक आणि विरोधक मिळाले. खरेतर ही संकल्पना हेगेलच्या विचाराचे प्रयोजन नसून परिणाम आहे. कारण आपल्याकडील ब्रह्म या संकल्पनेसारखी अबसल्यूटचा विचार करताना व मानव आणि निसर्गाच्या सेंद्रिय घटकांचे विवेचन करताना ही संकल्पना पुढे आली. मानव, समाज, राष्ट्र हे त्या निसर्गाचाच भाग असल्यामुळे ते अधिकाधिक साह्यकारी कसे होईल हा विचार महत्त्वाचा आहे. राष्ट्र उभारणीत सर्वांनाच सोबत घेतल्याशिवाय आणि सर्वांसाठी काही केल्याशिवाय आपण विकसित होऊ शकत नाही. केवळ काही गट, वर्ग अथवा समूहापुरते धोरणे राबवत असू तर त्यात दुफळी माजणारच. भारतीय स्वातंत्र्य लढ्याला व्यापक रूप देण्याच्या उद्देशाने तत्कालीन नेत्यांनीही सर्वांना सामावून घेण्याचे धोरण अवलंबिले होते. कराची काँगेसमध्ये नागरिक हक्काचा जो एकवीस कलमी ठराव करण्यात आला, त्याच्या काही कलमाकडे जरी पाहिले तरी आपल्या लक्षात येईल. राष्ट्रीय जीवनास आधारभूत असे धंदे राष्ट्रीय मालकीचे करणे, कामगारांना जीवनक्षम वेतन, मर्यादित कामाचे तास, बेकारभत्ता, पगारी रजा वगैरे मिळवून देणे. अशा स्वरूपाची विविध कलमे यात होती. ही राष्ट्रवादी भावना होती. कारण सर्वांना सोबत घेतल्याशिवाय आपण स्वातंत्र्य मिळवूच शकत नाही, हे तत्कालीन नेतृत्वाने जाणले होते.

राष्ट्रवाद नेहमीच चांगला किंवा वाईट असा नसतो. तो राबविणाऱ्याच्या दृष्टीचे द्योतक ठरतो. तरीही राष्ट्र जेव्हा



## क्षितिजापल्याड

संकटात असते, अविकसित असते आणि स्पर्धात्मक तयारीत असते तेव्हा ही संकल्पना सकारात्मकतेने पुढे येताना दिसते. स्थिर समाजात, विशिष्टांचे हितसंबंध जोपासताना आणि इतर दोषांवर पांघरून घालण्यासाठी हाच राष्ट्रवाद नकारात्मक भावना बहुसंख्यांकांत भरविण्याचे काम करतो. कारण त्याच्या आडून आपल्या शोषणाची तयारी चालू आहे असे वाटण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा स्थिर समाजात सांस्कृतिक अंगाने ही संकल्पना काम करते. मग बहुसंख्यांकांचा राष्ट्रवाद हा सर्वांचाच होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या ठिकाणी कलहाची बिजे निर्माण होऊ शकतात. म्हणून राज्याने अत्यंत संतुलित पद्धतीने ही संकल्पना हाताळण्याची आवश्यकता निर्माण होते. आज देशात जे वातावरण निर्माण झाले आहे हे त्याचाच परिपाक म्हणावे लागेल. म्हणूनच हेगेलच्या नंतर उदारमतवादी विचारवंतांनी या संकल्पनेचा खरपूस समाचार घेतला. यात जे. एस. मिल यांचा स्वातंत्र्यावर लिहिलेला निबंध जगभर याच कारणामुळे गाजला. प्रसिद्ध निबंधलेखक रॉबिन्सन जॉन्सन यांनी तर राष्ट्रवाद हा बदमाश लोकांचा शेवटचा अड्डा होय, असे म्हटले आहे. कारण दिवसभर सामान्यांचे या ना त्या कारणाने शोषण करायचे आणि सकाळ संध्याकाळ राष्ट्राच्या नावाने घोषणा द्यायच्या आणि त्यातच आपले सौख्य सामावल्याचा आनंद मानायचा. ही जी प्रवृत्ती आहे ती राष्ट्रवादी संकल्पनेस खीळ बसवणारी आहे. राज्याने बहुविध सांस्कृतिक संपन्नता आणि त्यांचे वैशिष्ट्य जाणीवपूर्वक जोपासले तर आणि तरच या संकल्पनेस काही अर्थ उरतो. अन्यतः ती केवळ राज्यशास्त्रीय संकल्पना म्हणून अभ्यासवर्गापूरती सीमित होऊन राहील. ती इतिहास, भूगोल, समाजशास्त्र आणि एकूणच देशवासीयांच्या आस्थेचा, विवेकी विचारांचा आणि विकासात्मक प्रक्रियेचा भाग बनावी यासाठी हेतूतः प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**



प्रकाश क्षीरसागर
संपर्क क्र. ९०११०८२२९९

# योद्धा कवी - गजानन रायकर

आधुनिक केसरी

**गजानन रायकर हे गोव्यातील ज्येष्ठ कवी. गोवा मुक्ती लढ्याचे ते एक खंदे सेनानी. गोवा मुक्ती लढ्यात त्यांनी सक्रिय सहभागी होऊन पोर्तुगीज सत्तेला प्रखर विरोध केला. गोव्यात राहून व प्रसंगी भूमिगत होऊन त्यांनी अनेक मोहिमांत भाग घेतला. त्यांना दीर्घायुष्य लाभले होते. हे आयुष्य ते सर्वार्थाने जगले. सार्थक झाले जन्माचे असे त्यांच्या बाबतीत म्हणता येईल. २३ सप्टेंबर २०२१ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या स्मृतीस एक वर्ष झाले. त्यांच्या 'चला पणजीवर रोवू झेंडे' या त्यांच्या कवितेने गोवा मुक्ती लढ्यात चैतन्य निर्माण केले होते. गोवा मुक्ती लढ्यात त्यांनी प्रत्यक्ष सहभाग तर घेतलाच परंतु त्यांच्या काव्याने अप्रत्यक्षरीत्याही ते स्वातंत्र्यलढ्यात आघाडीवर होते.**

जीवनात अखेरच्या काही वर्षांपर्यंत चित्त व मन सचेत असताना पर्यंत त्यांनी सातत्याने लेखन केले. संगम नावाचा अंकही ते प्रकाशित करीत, त्या अर्थाने ते संपादकदेखील होते. क्रिया करून करवावी, या समर्थ रामदासांच्या उक्तीप्रमाणे ते इतरांनादेखील लिहिते करीत. अनेक कार्यक्रमांचे आयोजन करीत. संगम पुरस्कार देखील देत. ते स्वातंत्र्याच्या चळवळीत होते तसेच साहित्य चळवळीतदेखील सक्रिय होते.

त्यांचे प्रकाशित कवितासंग्रह

रोवू चला पणजीवर विजयी झेंडे (१९५५), जयजयकार(१९६१), किलबिल (१९६२), कुळागर (१९८८), रंगयात्रा (१९९४), इंद्रफुले (१९९६), रुद्रस्वर(२००४), रानराई (२००५) व चंद्रदिवा (२०११).

दादुली (१९९०) हा कथासंग्रह आणि मजुरांचे राज्य (१९६१) हे नाटक अशी विपुल साहित्य संपदा.

पुरस्कार : कोकण मराठी परिषदेचा कविकुलगुरू कालिदास पुरस्कार, राज्य शासनाचा व कला अकादमीचा पुरस्कार त्यांना प्राप्त झाला आहे.

रायकरांची अर्थगर्भ कविता

गजानन रायकर यांची कविता ही अतिशय नादमधुर आहे. ती अल्पाक्षरी परंतु विस्तृत सार घेऊन येते. तिचा आशय कवेत न मावणारा असा विशाल आहे. त्यांच्या कवितेचे रंग नाना असल्याने ते एक इंद्रधनुच आहे. असे जाणवते. रायकरांची प्रेमकविता, रायकरांची देशभक्तीपर कविता पणजी आकाशवाणीवरून ऐकायला आजही मिळते. वानगीदाखल ही मिटले आकाश कविता पाहू. या कवितेत गूढ अर्थ भरला आहे. अर्थात त्याचा शोध घेण्यासाठी कवितेच्या अंतरंगात शिरूया...

मिटले आकाश, मिटले आकाश
किती किती पाणी
तुजसाठी गातो, भिजतच गाणी
किती किती पाऊस, किती किती सरी
सरींच्या कंठात, थेंब थेब गाणी
किती सोसू वारा, पावसाचा मारा
चिंब चिंब गाण्याचा
सूर झाला वारा, किती किती भिजू
किती किती सोसू
तिरमिर तमात, आभाळाचे हसू
लख लख तमात, लख लख प्रकाश
लख लख कुशीत, मिटले आकाश...

या कवितेत त्यांच्यातील निसर्गकवी दिसतो. अंतरंग प्रेमही डोकावते. या कवितेत अनुप्रास ओळीओळीत भरला आहे. कविता अल्पाक्षरी आहे. हल्ली षडाक्षरी (तसा पूर्वपार चालत आलेला) हा काव्यप्रकार आहे. गजानन रायकर यांनी या एकाच कवितेत अध्यात्म, प्रेम आणि विरह अशा सर्व भावना प्रकट केल्या आहेत. रायकर म्हणतात,

किती किती पाणी । किती किती गाणी ।
तुजसाठी गातो । भिजतच गाणी ।।

इथे रायकरांमधील प्रियकर आपल्या प्रिय सजनीला आर्त हाक घालतो. तो म्हणतो मी तुझ्यासाठी किती किती गाणी गाऊ. वरून पाऊस कोसळू लागला आहे. तरीदेखील ते भिजत गाणी म्हणतात. हा संदर्भ जसा प्रियसीसाठी लागू पडतो. तितकाच किंवा त्याहून जास्त ईश्वरासाठीदेखील असल्याचे



या ओळींतून जाणवते. दयाघना ईश्वरा तू खूप पाऊस पाडलास. त्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मी हे गीत गात आहे. या पडत्या पावसात धुंद होऊन मी गात आहे. तुला आळवत आहे. या धुंद पावसात एक लय, ताल व सूर आहे. तो कवीला ऐकू येतो. या कवितेत ते म्हणतात,

किती किती पाऊस । किती किती सरी ।
सरींच्या कंठात । थेंब थेब गाणी ।।

हा निसर्ग जणू मुक्त कंठाने गाणे गातो ते थेंबांच्या रूपाने. धरती तृषार्त असते तेव्हा हा निसर्ग मुक्त होऊन कोसळतो व तप्त धरेला शांत करतो, अशी ही कल्पना आहे. दुसरी कल्पना अशी आहे की कवीची प्रेयसी तृषार्त आहे ती त्याच्या प्रेमासाठी ही प्रेयसी असणारी सर म्हणजे तिचं विलोभनीय रूपच आहे जणू. तिच्या कंठात ही आर्त प्रेमपावसाची गाणी थेंब थेंब ठिबकत आहे. किती सोसू वारा म्हणजे हा विरहाचा वारा कवीला सोसत नाही. त्यातच आठवणींच्या पावसाचा मारा कवीला सोसत नाही. या प्रेमपावसात चिंब झालेल्या गाण्यांचा वाराच सूर झाला आहे व तो सर्वदूर आपल्या प्रेमाचा डंकाच पिटत असल्याचा भास कवीला होतो. दुसरीकडे धरतीच्या प्रेमाची ही आर्त साद आहे. येथील झाडे आणि त्यातून सुटणारा वारा हे धरतीचे प्रेमदूत आहेत. वाऱ्याचे सूर दूरवर निसर्गाला हे पृथ्वीचे विरहगीत ऐकवत आहेत. निसर्ग आणि मानवाच्या जीवनाचे विविध कंगोरे दाखवणारी गजानन रायकर यांची कविता लयबद्ध आहे आणि छंदमुक्त अशा मुक्तछंदातील देखील आहे. आपले जीवन कटकटीने भरलेले असून देखील रायकरांनी त्याचा त्रागा केला नाही. सोसणे हे जीवनाचे सार आहे असेच ते म्हणतात. त्यातूनच भावगम्य कविता ते रसिकांना देतात. ते गाऊन कविता म्हणत आणि रसिकांना ती भिडत असे. त्यांच्या कविता ऐकताना तल्लीन होणारे रसिक श्रोते सुद्धा ताल धरत. आकाशवाणीवरूनदेखील त्यांच्या कवितावाचनाचे कार्यक्रम होत. अनेक कविसंमेलनाची अध्यक्षपदे त्यांच्याकडे चालून आली होती. ते निराशावादी कवी नव्हते.

दिवसा विरहाचे काही वाटत नसले तरी रात्र वैराची व भयाण वाटते. तिमिरमय रात तिरमिरते म्हणजे तळमळते आहे असे कवीला वाटते. या प्रेम पावसात किती किती भिजू आणि किती किती विरह सोसू असे कविच्या मनातील प्रियसीला वाटत राहते. रात्र संपल्यावर प्रभातकाळीतरी आपल्या सख्याचे दर्शन होऊन त्याचे सुहास्य आपल्या दृष्टीस पडेल हा विश्वास तिला वाटतो. रायकर मुक्तीलढ्यात असल्याने सतत घराबाहेरच असत. त्यामुळे त्यांची सखी, पत्नी विरहात झुरते हे दाखवणारी ही कविता. परकाया प्रवेश करावा तशी त्यांनी सखीच्या भूमिकेतून ही कविता लिहिली आहे. अर्थात सखीला किंवा प्रियसीला जसा विरह सोसावा लागतो तसाच तो प्रियकरालादेखल सोसावा लागतो. या दोन्ही भूमिकांत शिरून रायकर ही कविता लिहितात. दुसरीकडे सर्वव्यापक धरणी आणि आभाळाचे प्रेम या कवितेतून व्यक्त झाले आहे. या तमातून म्हणजे रात्रीच्या गर्भातील उद्याचा उषःकाल आभाळाच्या रुपाने हसत आहे.

या तमभरल्या रात्रीत देखील आशेचा प्रकाश लखलखत असतो. तिच्या ओढीने ही रात्र कशीबशी सरते. त्या विरहणीच्या मिठीत आकाशाचा प्रियकर स्वतःला झोकून देतो. तम आणि आकाश एकरूप होऊन जाते आणि मध्येच चकाकणारी आशेची वीज लख्ख प्रकाशते. हे आशावादाचे बीज ही कविता पेरत आहे.

दुःख कुणाला नसते.

ते साऱ्यांनाच सोसावे लागते. त्या दुःखातून आणि वेदनेतून रायकरांची कविता प्रकट होते. गजानन रायकर यांनी अनेक उन्हाळे – पावसाळे सोसले आहेत. शिवाय पोर्तुगीज राजसत्तेचे चटकेही त्यांना सहन करावे लागले आहेत. या कवितेतून तिसरी एक बाजू प्रकट होते म्हणजे या पारतंत्र्याच्या अंधारातच उद्याच्या स्वातंत्र्याचे बीज दडले आहे. ते या तमाच्या कुशीत विसावले आहे. आज ना उद्या हा प्रकाश आपल्याला मार्ग दाखवील, हे आशेचे किरण कवी आपल्या कवितेतून त्या काळच्या रसिकांना दाखवत आहे. नव्या पिढीने या कवीचे स्मरण केलेच पाहिजे. त्यातून बोध आणि प्रेरणा घ्यायला हवी. त्यांच्या स्मृतींना त्रिवार वंदन.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# देवीची विविध रूपांतील वाहने



सौ. मानसी चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

आधुनिक केसरी

**प्रस्तावना :** भारतीय संस्कृतीत शक्ति उपासनेला अर्थात देवी उपासनेला आत्यंतिक असे महत्व आहे. मंत्र, तंत्र आणि यंत्र अशा तीनही साहित्य प्रकारांत देवी उपासना दिसून येते. महालक्ष्म्यै च विद्महे सर्वशक्त्यै च धीमहि । तन्नो देवी प्रचोदयात् ॥ या मंत्रावरून आपल्याला शक्ती आणि देवी यांचे एकरूपत्व ध्यानी येते. देवीची अनेक रूपे आहेत आणि त्या रूपातील कार्यांसाठी अनुकूल अशी देवीची वाहने आहेत. उदा. महिषासुरमर्दिनी या रूपातील देवीचे वाहन पराक्रमाला संयुक्तिक ठरणारा सिंह हे आहे.

**संशोधन पद्धती**

**संशोधनाचे उद्दिष्ट :** देवीच्या विविध रूपांतील वाहनांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :** ग्रंथ सर्वेक्षण (Bibliographical Research)

**तथ्य संकलन :** ग्रंथ अभ्यास, तज्ज्ञांसमवेत चर्चा

निष्कर्ष मांडणी

पुढील संशोधनासाठी विषय

**देवीची वाहने :** या संशोधन पत्रात आपणास देवीच्या पुढील रूपांतील वाहनांचा विचार करावयाचा आहे.

मातृकारूपांतील देवीची वाहने

दुर्गारूपातील देवीची वाहने

लक्ष्मीरूपातील देवीची वाहने

शीतला माता, नदी देवता या रूपांतील देवीची वाहने

मातृकारूपांतील देवीची वाहने

ब्राह्मी माहेश्वरीचैव कौमारी वैष्णवी तथा ।

वाराही च तथेन्द्राणी चामुण्डा सप्तमातरः ॥

**हंस वाहन**

ब्राह्मी म्हणजे ज्ञान शक्ती. या ब्राह्मी देवीचे वाहन हंस आहे.

परब्रह्म-उपासनेतही हंसाचे महत्व आहे. हंस हा ज्ञानमार्गाचे प्रतिक मानला जातो.

ॐ परमहंसाय विद्महे महाहंसाय धीमहि ।

तन्नो हंसः प्रचोदयात् ।।

सदसद्विवेकबुद्धी हे हंसाचे वैशिष्ट्य होय. यासच नीरक्षीरविवेक असे संबोधले जाते.साधक आपल्या श्वास उःश्वास याद्वारे "हंस" असा जप सहजतेने करीत असतो. सरस्वती मातेचे वाहन हंस आहे. कारण सरस्वती ही ज्ञानाची देवता आहे. हंसाचे शुभ्रत्व हे ज्ञानयोगाचे प्रतिक आहे. विश्वामध्ये ज्ञानयोगाचा प्रचार करण्यासाठी स्वामी विवेकानंदांनी रामकृष्ण मिशनची स्थापना केली. या संस्थेच्या प्रतिकात हंसाचा समावेश आहे. तसेच घोषवाक्यात वरील हंस गायत्री मंत्राचा (तन्नो हंसः प्रचोदयात् ।) समावेश आहे.

**वृषभ वाहन**

माहेश्वरी ही महेशाची शक्ती आहे. तिचे वाहन वृषा (बैल) आहे. 'वृषा' या शब्दाचा अर्थ धर्म असा होतो. वृषा भाति अर्थात धर्म जेथे शोभून दिसतो, त्यास वृषभ हे नाम प्राप्त होते. अशा वृषभावर महेश्वराची कार्यशक्ती म्हणजे माहेश्वरी आरूढ होते, अर्थात कार्यशक्ती धर्माच्या अधिष्ठानावर आरूढ होणे यातून ध्वनित होते. वृषभ हा शक्ती, सहनशीलता यांचेही प्रतिक मानला जातो.

ॐ तत्पुरुषाय विद्महे, नन्दिकेश्वराय धीमहि,

तन्नो वृषभः प्रचोदयात् ।।

असा वृषभ संबंधित मंत्र आपल्याला प्राप्त होतो.

**मयूरवाहन**

कौमारी देवीचे वाहन मयूर आहे. कौमारी शिखिवाहना |

असे वर्णन श्रीदेवी कवचात देखील येते. कौमारी म्हणजे कुमार अर्थात कार्तिकेयाची शक्ती होय. ती कुमाराप्रमाणेच मयूरवाहना आहे.

**गरुड वाहन**

विश्वाचे पालन करणाऱ्या शक्तीचे नाव वैष्णवी शक्ती आहे. तिचे वाहन गरुड हे आहे. वैष्णवी गरुडासना | असे वर्णन श्रीदेवी कवचात येते.

ॐ तत्पुरूषाय विद्महे,

सुवर्णपक्षाय धीमहि, तन्नोगरुडः प्रचोदयात् ||

गती, ऊर्ध्वगामित्व, निरीक्षणक्षमता हे गरुडाचे महत्वपूर्ण गुण आहेत.

**गज वाहन**

ऐन्द्री म्हणजे इंद्राची शक्ती. या इंद्र शक्तीचे वाहन ऐरावत आहे.



ऐन्द्री गजसमारूढा | असे वर्णन श्री देवी कवचात येते.

गज हा समृद्धी, औदार्य, मांगल्य आणि राजयोगाचे प्रतिक होय. म्हणून देवराज इंद्राची जी शक्ती तिचे वाहन गज आहे.

काही ठिकाणी ऐरावताला आठ सोंडी असण्याचे वर्णन येते. यावरून आठ दिशांचे स्वामित्व संसूचित होते.

**शृगाल वाहन**

चामुंडा देवीचे वाहन म्हणून शृगाल, श्वान किंवा शव यांचे उल्लेख मिळतात.धूर्तता, क्रूरता आणि जडता यांची अनुक्रमे ही प्रतीके होत. या सर्व नकारात्मक गोष्टींवर विजय मिळवून देवी त्यांच्यावर आरूढ होते. चामुंडा शववाहना | असे वर्णन श्रीदेवी कवचात येते.

**दुर्गा रूपातील देवीची वाहने**

**सिंह वाहन :** संस्कृत भाषेत लिहिल्या गेलेल्या 'स्कंद पुराणा'चा तमिळ अनुवाद 'कांडा पुराणम' मध्ये उल्लेख आहे की देवासूर संग्रामात शिवाचा पुत्र मुरुगन(कार्तिकेय) याने दानव तारक आणि त्याचे दोन भाऊ सिंहामुखम आणि सुरापद्मन यांना पराजित केले होते. आपल्या पराजयानंतर सिंहामुखमने माफी मागितली तर मुरुगनने त्याला एक सिंह बनवला आणि आपली माता दुर्गा हिच्या वाहनाच्या रुपात तिची सेवा करण्याचा आदेश दिला.

सिंह हे पराक्रम, शौर्य यांचे प्रतिक आहे. दुर्गा माता ही "दैत्यानां देहनाशाय" कार्य करते. म्हणून तिचे वाहन सिंह आहे.

**व्याघ्र वाहन :** देवी कुष्मांडा व माता चंद्रघंटा वाघावर स्वार आहे. देवीने महिषासुरासमान प्रमुख दैत्यांचा वध करताना सिंह तर अन्य राक्षसांचा वध करताना व्याघ्र हे वाहन घेतले होते, असेही उल्लेख आढळतात. या ठिकाणी सिंह आणि व्याघ्र हे दुष्टांच्या संहाराचे प्रतिक आहेत आणि यांमध्ये एक प्रोटोकॉल अर्थात शिष्टाचार दिसून येतो.

**लक्ष्मी रूपातील देवीची वाहने**

**उलूक वाहन :** घुबडाचे दर्शन भारतात अशुभ मानले जाते आणि लोक घुबडाला घाबरतात. पण काही देशात घुबड शुभ मानले जाते. हा पक्षी दिसायला भीतीदायक असला तरी अतिशय बुद्धिमान आहे आणि म्हणूनच कदाचित धनाची देवी लक्ष्मी हिने त्याची स्वतःचे वाहन म्हणून निवड केली असावी. घुबडाची नजर अतिशय तीक्ष्ण असते.

**शीतला माता, नदी देवता या रूपांतील देवीची वाहने**

**गर्दभ वाहन :** शीतला माता गाढवावर स्वार होते. गाढव हा अतिशय सहनशील प्राणी मानला जातो. माता शीतला गाढवावर स्वार होऊन आपल्या भक्तांना हा संदेश देते की जर माणूस तन, मन आणि धनाने धीर धरतो आणि सतत प्रयत्न करतो तर तेवढे यश माणसाला नक्कीच मिळते.

**मकर वाहन :** मगर हे गंगा देवीचे वाहन आहे. हिंदू धर्मग्रंथांमध्ये, मकराचा उल्लेख आहे, म्हणजे मगर, गंगा देवीचे वाहन, जे जलचर प्राण्यांमध्ये सर्वात शक्तिशाली आणि सर्वात वेगवान मानले जाते.

**कच्छप वाहन :** यमुनानदीचे वाहन कासव आहे. कासव हे क्षेम, स्थैर्य आणि संयमाचे प्रतिक आहे.

एकंदर, देवीच्या विविध रूपांतील विविध वाहने आहेत. प्रस्तुत वाहनाचे आणि देवीरूपाचे बहुतेक ठिकाणी औचित्य असल्याचे दिसून येते.

संदर्भ : पुस्तके / वेबसाईट, शक्ति-अंक, गीता प्रेस गोरखपूर, सप्तशती, गीता प्रेस गोरखपूर, wikipedia.org इत्यादि.

# अनोखे व्रत नवरात्रीचे



ज्योती ज. आळंदकर
संपर्क क्र. 9370946057

आधुनिक केसरी

खरं तर हा लेख नसून सर्वांना मनापासून केलेलं एक आवाहन आहे. नवरात्रात अनेक व्रत केले जातात.कोणी नऊ दिवस उपवास करतात, पलंग गादी वर्ज्य,चप्पल किंवा कुठल्याही वहाणा वापरणे वर्ज्य करतात. तर कोणी नवरात्रात नऊ दिवस जोगवा मागतात. अलीकडे एक नवीन प्रकार सुरू झाला आहे. तसा तो वाईट नाही पण त्याचा अतिरेक खूप मोठया प्रमाणात झाला आहे.

मुख्य म्हणजे हा प्रकार धार्मिक नाहीय त्यामुळे मुळात त्याला व्रताचे अधिष्ठान अजिबातच नाहीये.म्हणजे बघा कोणा कपड्याच्या व्यापाऱ्याने स्वतःचा व्यापार वाढावा म्हणून नऊ दिवस नऊ रंगाच्या साड्या,ड्रेस वापरण्याची टूम काढली. आणि अगदी धार्मिक कार्या सारखी सर्वांनी डोक्यावर घेतली. प्रत्येकीला ते टाळणे किंवा सहज करणे आणि परवडणारे असतेच असे नाही. कुणीतरी असली कुठलाही धार्मिक आधार नसलेली प्रथा चालू करावी आणि भाबड्या जनतेनी ती अंधपणे आचरणात आणावी. ह्या प्रथांची पुढे अशीच रुढी बनते. बहूधा अशाच प्रथा,रुढी कालांतराने परंपरा बनत असतील तर मग चला आपण काही नविन प्रथा सुरू करूयात.

नवरात्रातलं प्रत्येक दिवस सत्कारणी लावायचा असे यापुढे आपण व्रत घेऊ. उतायचं नाही मातायचं नाही,घेतला वसा टाकायचा नाही, हे मनाशी अगदी पक्कं करू.

**पहिला दिवस :** या दिवशी आपण स्वतःपासुन सुरूवात करूया.स्वतःचे लाडकोडं स्वतःच पुरवूया,हवं ते जमेल ते लेवूयां,खाऊया आवडणारे छंद जोपासुया. पण मनाशी एक गोष्ट मात्र नक्की करायची की मन आपलं मारायचं नाही,ईच्छा कुठली दडपायची नाही.उगाच कुठल्या कारणानी पुढेही ढकलायची नाही.मनाला आनंदी ठेवायचं,आनंदाने भिजवायचे.

**दुसरा दिवस :** हा दिवस आपल्या जवळच्यांचे लाड करण्यात,कोड कौतुक करण्यात घालवूया.म्हणजे आज त्यांना आठवणींनी त्यांच तुमच्या आयुष्यातलं महत्व जाणवून द्या. जरा विचित्र,नाटकी वाटेल तुम्हाला पण प्रत्येक माणसाला हे मनापासून ऐकायचं असतं आणि आवडत ही असतं.

**तिसरा दिवस :** हा दिवस देऊया मैत्रिणींना



आणि स्नेह्यांना दुरावले असतील तर फोन करा.जवळ असतील तर एकत्र जमुन आनंदात वेळ घालवा. "माझ्यासाठी मैत्री" किती महत्वाची आहे ही भावना आपल्या मैत्रिणी,स्नेही यांच्यापर्यंत पोहंचू द्या. कारण मैत्रीच नातं हे इतर सर्व नात्यांपेक्षा निखळ,निर्मळ असते याची जाणीव स्वतः च्या मनाला ही करुन द्या.

**चौथा दिवस :** या दिवशी कुणाही एका गरजु व्यक्तीला नातं असो नसो जमेल ती मदत करायची. मग ती मदत पैसे,वस्तु,शब्द अशा कुठल्याही स्वरूपात असू शकते.वृद्धाश्रम, अनाथाश्रम अशा ठिकाणी जाऊन करा. आपल्याकडे काम करणाऱ्या व्यक्तीना मदत करा. गरजुला मदतीचा हात देणे ही खूप मोठी गोष्ट आहे हे स्वतःच्या मनात ठसवा.

**पाचवा दिवस :** या दिवशीच्या व्रताला आपण "विद्या व्रत" म्हणूया. शिक्षणा संदर्भात जिथे जमेल तशी मदत करूया. गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य द्या किंवा आपल्याला झेपेल, जमेल तसा कुणाचा शैक्षणिक भार उचला.शाळेत किंवा ग्रंथालयाला मदत द्या.

**सहावा दिवस :** हा दिवस राखुन ठेऊयां मुक्या प्राण्यांसाठी."गो शाळां"ना भेट द्या.गो शाळांना मदत करा."प्राणी कल्याण" संस्थांना मदत द्या अथवा स्वतः तिथे जाऊन खायला घाला,चारा द्या.

**सातवा दिवस :** हा दिवस निसर्गासाठी ठेऊया. एक रोपटं तरी लावुया.फुलझाडंही चालतील पण लावू आणि निसर्गाचे संवर्धन करू, पर्यावरणाचा समतोल राखण्याचा प्रयत्न करू.पुढच्या पिढीला त्याचे महत्त्व पटवून देऊया.त्यांनाही झाडे लावण्यास प्रवृत्त करुया.

**आठवा दिवस :** हा देशासाठी ठेऊया. माझं शहर, माझा जिल्हा, माझा तालुका,माझं राष्ट्र,माझा देश यासाठी काय करू शकतो आपण ह्याचा विचार करू. आपल्या सरहद्दीवरच्या सैन्याला किमान प्रोत्साहनपर शब्दतरी पाठवुयात.स्वतःच घर,कुटुंब सोडून आपल्या देशाच्या रक्षणासाठी दूर गेलेल्या सैनिका प्रती कृतज्ञ राहूया. देशासाठी काहीतरी करायचे आहे ह्या भावनेतून आधी आपला परिसर स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न करुया.

**नववा दिवस :** हा खूप महत्वाचा असा "पुर्णाहुतीचा" दिवस.या दिवशी सर्व वाईट चालीरिती, वाईट रूढी आणि वाईट,दुष्ट विचारांची आहुती देऊ. सकारात्मक विचारांचे पुरणाच्या दिव्यात माणूसकीच्या ज्योती लावून त्या आदीशक्तीची आरती करू. आपुलकीचा,माणूसकीचा, एकात्मतेचा गोड प्रसाद वाटू.

**दहावा दिवस :** हा सिमोलंघनाचा दिवस. आपण जो कांही निर्धार करून जे केलं त्याने काही फरक पडला आहे का ते स्वतःच तपासून बघा. आपल मन नकारात्मक विचारांचा उंबरठा ओलांडून पुढे गेलं आहे का? हे बघा.मन मोकळं करा, लिहा बोला पण व्यक्त व्हा. कारण आपले बुरसटलेले नकारात्मक विचार, कृती बदलणे हेच खरे सिमोल्लंघन आहे. मग आनंदाचा सोनेरी दसरा आपल्या आयुष्यात कायम असेल,आणि प्रसन्न झालेल्या देवी आदिशक्तीचा कृपा आशिर्वाद ही पाठीशी असेल.

ही प्रत्येक गोष्ट करताना त्या त्या दिवसाच्या रंगाचे कपडे परिधान करू नका असे माझे म्हणणे नाही,पण नुसते कपड्यांचे रंग बदलून काय होणार आहे?असे दररोज एक कपडे बदलण्यापेक्षा आपले मळकट झालेले विचार आधी बदलू.निदान विचारांना शुभ्र धवल, निर्मळ करण्याचा मनापासून प्रयत्न करू. मी जे म्हणतेय ते पटतंय का तुम्हाला? बोला मग हे व्रत घ्यायला आवडेल ना तुम्हाला? अगदी मोकळ्या मनाने सांगा,संदेश वाचून निवांतपणे विचार करून मग ठरवा. फारतर तुम्ही तुमच्या सोयीनुसार किंवा त्या त्या दिवशीच्या परिस्थितीनुसार नवरात्रीच्या ह्या नव्या व्रतातील पहिल्या आठ दिवसांमध्ये अदलाबदल करु शकता.

# 1039.79 कोटी रुपये वाटलेत कसे ?

आधुनिक केसरी

विश्व प्रवक्ते, शिवसेनेला राष्ट्रवादी काँग्रेसचे दावणीला बांधून वाताहत करणारे सेना प्रमुखांचे खास विश्वासू संपादक, पत्रकार, साहेबांचे मार्गदर्शनाखाली समृध्दीचा ध्यास घेऊन हडेलहप्पी करून कमाई करणारे आणि आज गेल्या दोन अडीच महिन्यांपासून जेलची हवा खात असलेले, वाचाळ, नेते श्रीमान संजय राऊत यांनी मराठी माणसांची फसवणूक करून ही जी 1039.79 कोटी रुपयांची लुबाडणूक करून बेगमी केली त्या गोरेगाव मधील पत्राचाळीतील घोटाळ्याचे अंमलबजावणीदार संजय राऊत होते हे जवळपास ईडीने, सिध्द करत आणले आहे. पण याचे खरे मास्टरमाईंड कोण होते. मार्गदर्शक कोण आहे आणि लाभार्थी कोण कोण तसेच किती किती रकमेचे लाभार्थी आहेत हे अजून सुस्पष्ट होत नाही. संजय राऊत यांनी या व्यवहारात, म्हाडा, 672 भाडेकरू व तेथील जूणे रहिवाशी, बोगस भूमीपूजन करून बुकींग स्वीकारत गोळा केलेले 134 कोटी रुपयांचे मालक या सर्वांना बुडवून, फसवून, देशोधडीला लावून ही कमावलेली हजार कोटीचे वर असलेली रक्कम नक्की कशी आणि कोणाकोणात विभागली गेली हे स्पष्ट होईल तेंव्हा महाराष्ट्रात राजकीय भूकंप होईल. तो टाळण्यासाठी साहेब आटोकाट प्रयत्न करत आहेत. पण आता नरेंद्र मोदी दाद देत नाही आहेत.

मस्ती आणि माज माणसाची मती भ्रष्ट करतो. त्यात बारा मती चा मालक मार्गदर्शक निघण्याची शक्यता वाढत चालली आहे. या प्रकरणाची व्याप्ती केवळ संजय राऊत पुरती मर्यादित नाही राहीली आहे. यात वाघवाणी बंधू, प्रविण राऊत, पी एम सी बॅंक, मार्गदर्शक, रश्मी वहीनीसाहेब, विलासराव देशमुखांचे वारस असे बरेच लोक यात अडकु शकतात. बेनामी, निनामी, बोगसनामी, अलीगडच्या प्रॉपर्टीज्, प्लॉटस्, बंगले हे सर्वच समोर येणार आहे. जामीन मिळणे तर दूरच उलट अजून 14 दिवसाच्या कोठडीत वाढ झाली आहे.

पैसा आयुष्याला पुरत नाही उलट कौटूंबीक जीवन पूरतो. समुद्राला पाच पन्नास बकेटस् पाणी गेल्याने फरक पडत नाही. पण मुळातच आडात (विहरीत) नसलेल्या पाण्याची पातळी वाढवायला ही पन्नास बकीटे त्यात ओतल्याने फरक पडतो पातळीत. अर्ध्या हळकुंडाने पिवळे झालेले संजय राऊत यात देशोधडीला लागणार. मग आपण बुडणार असे स्पष्ट झाले तर मग माकडीनी सारखे तेही कोणाच्या तरी खांद्यावर बसून स्वतःला वाचवायचा प्रयत्न करणार, जमलेच नाही तर सगळ्यांना घेऊनच बुडणार. पत्राचाळ ही सुरूवात आहे. प्रफुल्ल पटेल, तेलगी, छगन भुजबळ, सिंचन क्षेत्र, साखर कारखाने, लिक्विडेशन मधे निघालेले, विकल्या गेलेले साखर कारखाने, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंका, तिथे पडून असलेला काळा पैसा ( जून्या नोटा) , क्रिकेट क्षेत्र, कबड्डी, खोखो, कुस्ती संघटना या मधील घोटाळे, शेतकरी कर्जमाफीतील घोटाळे, पुनर्वसन कामातील फंड्स चे घोटाळे, असे अनेक विषय आता मारुतीचे शेपटा सारखे वाढत जाणार. बघूया आता कोण वाचतात , कोण बुडतात, कोण कोणाला घेऊन बुडतात. कायद्याचे राज्य आहे आणि कोणीही कायद्या पेक्षा मोठा नाही. हे स्पष्ट झाले तर खुप उलथापालथ होईल राजकीय क्षेत्रात.

**-पीपीएम पुणे**

# ।। नवरात्री उत्सव ।। शक्तिची उपासना ।।



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**शारदीय नवरात्र आपल्याकडे मोठ्या प्रमाणावर साजरे केले जाते. अश्विन महिन्यात येणाऱ्या नवरात्राला शारदिय नवरात्र म्हणतात. धार्मिक ग्रंथात सांगितल्याप्रमाणे दुर्गा पुजनासाठी शारदीय नवरात्र सर्वश्रेष्ठ मानले गेले आहे. या नव दिवसात केलेल्या देवी. दुर्गा पुजनामुळे शक्ती ,ज्ञान सुख-समृद्धी आनंद धन प्राप्त होऊ शकते. तसेच आशीर्वादाने आणि पूजनामुळे कुटुंबात सुख शांती नांदते. गणपती उत्सव आटोपला की नवरात्राचे वेध लागतात.**

पितृपक्षातच अनेक मंडळांची दुर्गाउत्सवाची तयारी सुरु होते.नवरात्र म्हणजे शक्तिची उपासना.शक्ति म्हणजे देवी. घरोघरी घटस्थापना केली जाते.अखंड दिप प्रज्वलीत ठेवला जातो.सकाळ- संध्याकाळी देवीची नवरात्राची आरती करतात....

उदो बोला उदो अंबाबाई माऊलीचा हो....
उदो कारे गर्जती काय महिमा वर्णू तिचा हो...

ही नवरात्राची आरती होते.काही जण नऊ दिवस उपवास करतात.

नवरात्राचे नऊ दिवसात युध्दात देवीने अनेक दैत्याचा संहार केला.महिषासूराचाही वध केला.म्हणूनच महिषासूरमर्दिनी नाव रूढ झाले.या तिच्या शक्ति रुपाचीच पूजा नवरात्रीत केली जाते.

।। "या देवी सर्वभूतेषु शक्ति रुपेण संस्थिता, नमस्तस्ये नमस्तस्ये नमस्तस्ये नमो नमः।। हाच जप आपण म्हणतो.नऊ दिवस होईल तेवढी जास्तीतजास्त या शक्तीदेवीची उपासना करायची असते.देवीच्या पाठाचे वाचन करायचे असते.अनेक ठिकाणी देवीचे पाठ केले जातात.

शैलपुत्री, ब्रम्हचारिणी, चंद्रघंटा, कुष्मांडी,स्कंदमाता, कात्यायनी, कालरात्री, महागौरी, सिध्दिदात्री, अशी देवीची नव रूपे आहेत.

महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती, ह्या रूपातही देवीची पूजा केली जाते. नवरात्राचे नऊ दिवस वेगवेगळ्या फुलांच्या माळा घालण्याची प्रथा अनेक ठिकाणी आहे.

**पहिली माळ :** शेवंती आणि सोनचाफ्यासारख्या पिवळ्या फुलांची माळ.
**दुसरी माळ :** अनंत, मोगरा, चमेली, किंवा तगर यांसारख्या पांढऱ्या फुलांची माळ.
**तिसरी माळ :** निळी फुले. गोकर्णीच्याकिंवा, कृष्णकमळ, कृष्णकमळाच्या फुलांच्या माळा.
**चौथी माळ :** केशरी अथवा भगवी फुले. अबोली, तेरडा, अशोक किंवा तिळाची फुले.
**पाचवीमाळ :** बेल किंवा कुंकवाची वाहतात..
**सहावीमाळ :** कर्दळीच्याफुलांची माळ.
**सातवी माळ :** झेंडू किंवा नारिंगीची फुले.
**आठवी माळ :** तांबडी फुले. कमळ, जास्वंद, कण्हेर किंवा गुलाबाच्या फुलांची माळ.
**नववी माळ :** कुंकुमार्चन करतात.

ह्या वर्षीआश्विन शुद्ध प्रतिपदा सोमवार दिनांक २६/९/२०२२ ते आश्विन शुद्ध दशमी शुक्रवार दिनांक ५/१०/२०२२ या कालावधीत नवरात्रौत्सव सर्वत्र साजरा होत आहे. यावेळेस विशेष म्हणजे नवरात्रीच्या एकाही तिचा क्षय नाही नऊ दिवस पूजा राहील आणि अनेक शुभ योग तयार होत आहे. घटस्थापनेच्या दिवशी सर्वार्थसिद्ध योग आणि अमृत सिद्धी योग आहे. हे दोन्ही धनवृद्धी आणि कार्यसिद्धी यांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत, यामुळे ऐश्वर्य आणि भरभराट होते. पंचमीच्या व सप्तमीच्या दिवशी सर्वार्थसिद्ध योग आहे षष्ठी आणि अष्टमीच्या दिवशी रवी योग आहे.

अश्विन शुद्ध प्रतिपदेला घटस्थापना होते. एका कोऱ्या पाटीत काळी माती घेऊन त्यात नऊ प्रकारचे धान्य पेरले जाते, त्यात कलश ठेवून पाच विड्याचे पाने व नारळ ठेवतात, रोज पाणी दिल्याने पिक वरती येते, त्या कलशावर रोज झेंडूच्या फुलांच्या माळा सोडल्या जातात. काही ठिकाणी चौरंगावर कलश मांडून त्याच्याभोवती काळी माती टाकून धान्य पेरतात. नवरात्रात धूप, गुगुळ, याच महत्त्व आहे त्यामुळे घरात वातावरणात प्रसन्नता येते.

**१) पहिला दिवस :** आश्विन शुद्ध प्रतिपदा, सोमवार दिनांक २६/९/२०२२.
देवीचे शक्तीरुप : श्री महाकाली.
देवीचे नवदुर्गा रुप : श्री शैलपुत्री.
रंग : पांढरा रंग. शांती तपस्या ज्ञानाचे प्रतीक आहे.
नैवेद्य : गाईचे शुद्ध साजूक तूप. केळी.
पहिल्या दिवशी श्री देवीला साजूक तूप अर्पण केल्याने आपणास बरे होण्याचे आशिर्वाद मिळतात.आणि शरीर निरोगी राहते.

**२) दुसरा दिवस :** आश्विन शुद्ध द्वितीया मंगळवार, दिनांक २७/९/२०२२
श्री देवीचे शक्तीरुप : श्री महाकाली.
श्री देवीचे नवदुर्गा रूप : श्री ब्रम्हचारीणी.
रंग : लाल रंग, शांती आणि पवित्रतेचे प्रतिक आहे.
नैवेद्य : पंचामृत किंवा साखर.
दुसऱ्या दिवशी पंचामृत किंवा साखर देवीला अर्पण केल्याने आपल्या घरातील सर्व व्यक्तींचे वय वाढते.

३) तिसरा दिवस : आश्विन शुद्ध तृतीया/चतुर्थी.बुधवार, दिनांक--२८/९/२०२२/
श्री देवीचे शक्तीरुप : श्री महाकाली.
श्री देवीचे नवदुर्गा रूप : श्री चंद्रघंटा.
रंग : निळा रंग, साहस बलिदान आणि असंत्यावर सत्याचा विजयाचे प्रतीक आहे.
नैवेद्य : दूध किंवा खीर.
तिसऱ्या दिवशी देवीला दूध किंवा खीर अर्पण केल्याने दुःखापासून मुक्तता होते आणि परम आनंद प्राप्त होतो.

४) चौथा दिवस : आश्विन शुद्ध पंचमी, गुरुवार. दिनांक, २९/९/२०२२. ललिता पंचमी.
श्री देवीचे शक्ती रुप : श्री महालक्ष्मी.
श्री देवीचे नवदुर्गा रूप : श्री कुष्मांडा.
रंग : पिवळा रंग भक्तांना मोक्षाचा आशीर्वाद देते स्नेह समृद्धी आणि संतती साठी आशीर्वाद देते.
नैवेद्य : मालपुआ.
चौथ्या दिवशी देवीला मालपुआ अर्पण केल्याने बुद्धीमतेचा विकास होतो आणि निर्णय घेण्याची शक्तीही वाढते.



५) पाचवा दिवस : आश्विन शुद्ध षष्ठी, शुक्रवार, दिनांक ३०/९/२०२२/१०
श्री देवीचे शक्ती रूप : श्री महालक्ष्मी.
श्री देवीचे नवदुर्गा रूप : श्री स्कंदमाता.
रंग : हिरवा रंग आनंद आणि प्रकाशाचे प्रतीक आहे.
नैवेद्य : केळी.
पाचव्या दिवशी श्री देवीला केळी अर्पण केल्याने शरीर निरोगी राहते.

६) सहावा दिवस : आश्विन शुद्ध सप्तमी, शनिवार दिनांक--१/१०/२०२२.
श्री देवीचे शक्तीरुप : श्री महालक्ष्मी.
श्री देवीचे नवदुर्गा रूप : श्री कात्यायनी.
रंग : करडा, राखाडी रंग विकासाचे प्रतीक आहे तसेच नवीन कामाची सुरुवात.
नैवेद्य : मध.
सहाव्या दिवशी श्री देवीला मध अर्पण केल्याने आकर्षक शक्ती वाढते.

७) सातवा दिवस : आश्विन शुद्ध अष्टमी, रविवार. दिनांक २/१०/२०२२.
श्री देवीचे शक्तीरुप : श्री महासरस्वती.
श्री देवीचे नवदुर्गा रुप : श्री कालरात्री.
रंग : नारंगी, केशरी रंग बल आणि शक्तीचे प्रतीक आहे.
नैवेद्य : गुळ.
सातव्या दिवशी श्री देवीला गुळ अर्पण केल्याने शोक दूर होतो आणि येणाऱ्या संकटांपासूनही संरक्षण होते.

८) आठवा दिवस : आश्विन शुद्ध नवमी, सोमवार. दिनांक ३/१०/२०२२.
श्री देवीचे शक्तीरुप : श्री महासरस्वती.
श्री देवीचे नवदुर्गा रूप : श्री महागौरी.
रंग : मोरपंखी रंग समृद्धी आणि दृढ विश्वासाचे प्रतीक आहे.
नैवेद्य : नारळ.
आठव्या दिवशी श्री देवीला नारळ अर्पण केल्याने मुलांशी संबंधित अडचणी दूर होतील. आणि हा नारळ नवरात्र उत्थापन केल्यानंतर वाढवून त्याचा प्रसाद वाटप करावा. होमहवन केले जाते.

९) नववा दिवस : आश्विन शुद्ध दशमी, मंगळवार, दिनांक ४/१०/२०२२.
श्री देवीचे शक्तीरुप : श्री महासरस्वती.
श्री देवीचे नवदुर्गा रूप : सिध्दीदात्री.
रंग- गुलाबी रंग. प्रेम स्नेह आणि सद्भावाचे प्रतीक आहे.
नैवेद्य : पांढरे तीळ.
नवव्या दिवशी श्री देवीला पांढरे तीळ अर्पण केल्याने मृत्यूच्या भीतीपासून मुक्तता मिळेल आणि अनुचित घटनांपासूनही संरक्षण मिळेल. तसेच आश्विन शुद्ध दशमी. बुधवार, दिनांक ५/१० / २०२२.

विजयादशमी (दसरा.) या दिवशी नैवेद्य : श्रीखंड, पुरणपोळी पंचपक्वानांसह भोजनाचा नैवेद्य दाखवतात. सीमोल्लंघना नंतर देवीच्या मंदिरात दर्शन, एकमेकांना भेटून सोने (अभेट्याची पानं)पूर्वापार। परंपरा प्रमाणे, दिले जाते.

ह्या कालावधीत देवीचा नवार्णवमंत्र || ओम ऐं ह्रीं क्लीं चामुण्डायै विच्चै नमः|| जप करावा।.

नवरात्राचे आरतीत देवीच्या रोजच्या रूपाचा वर्णन आहे.प्रतिपदेला घटस्थपाना,द्वितीयेला चौसष्ट योगिनी पूजा,तृतियेला शृंगार,चतुर्थीला विश्वव्यापक जननी,पंचमीला उपांगललिता,षष्ठीचे दिवशी गोंधळ,सप्तमीचे दिवशी सप्तश्रृंग गडावर,अष्ठमीला अष्टभुजा नारायणी,नवमीला नवदिवसांचे पारायण होते,आणि दशमीचे दिवशी अंबा सीमोल्लंघनाला निघते.

नवरात्रात जोगवा मागणे हा ही एक देवी उपासनेचा प्रकार/ भाग आहे.पाच घरी जाऊन मूठभर तांदूळ किंवा पिठाचा जोगवा मागतात.आपल्यातला अहंकार नष्ट व्हावा ही यामागची कल्पना आहे.

अनादी निर्गुण निर्गुण प्रगटली भवानी .।
मोह महिषासूर मर्दना लागुनी.।।
त्रिविध तापांची कराया झाडणी ।
भक्तालागुनी पावसी निर्वाणी.।।
आईचा जोगवा जोगवा मागेन.।।
द्वेत सारुनी माळ मी घालीन ।।
हाती बोधाचा झेंडा मी घेईन ।
भेदरहित वारिसी जाईन.।
नववीध भक्तिच्या करुन नवरात्रा
करुन पोटी मी मागेन ज्ञानपुत्रा ।।

ही एकनाथ महाराजांची रचना प्रसिद्ध आहे. घरोघरी हा जोगवा म्हटला जातो. महाराष्ट्रात -कोल्हापूरची महालक्ष्मी, माहूरची रेणुका माता,तुळजापूरची तुळजाभवानी हे तीन पूर्ण पीठं,तर वणीची सप्तश्रृंगी देवीचे अर्ध शक्तिपिठ असे साडेतीन शक्तिपिठे आहेत. नवरात्रात ईथे जाऊन दर्शन घेणे खूप भाग्याचे समजले जाते. नासिक- चांदवड-रेणुका देवी, मुंबई-महालक्ष्मी, वज्रेश्चरी रेणुका देवी, चिखली-रेणुकादेवी,अमरावती- एकविरा व अंबामाता, कोराडीची देवी-नागपूर, आंबेजोगाई ची देवी,जळगांवची-ईच्छा देवी,पुणे-चतुःशिंगी,तांबडा जोगेश्वरी, आदी ठिकाणी देवीच्या मंदिरात भाविकांची दर्शनासाठी गर्दी असते. या ठिकाणी भाविकांचे उत्साहाला उधाण आले असते. अतिशय प्रसन्न वातावरण असते. फुलं, माळा, प्रसादाची,खण-ओटीची दुकाने थाटली दिसतात.

# नवरात्री (घटस्थापना)



सौ. सीमा मंगरुळे
संपर्क क्र. 9075074994

आधुनिक केसरी

**नवरात्रोत्सवात घरोघरी घटस्थापना केली जाते आणि पुजा अर्चा केली जाते. गावातील मंडळांमध्येही दुर्गादेवीची स्थापना करून नऊ दिवस देवीची धुपदिपांनी यथायोग्य आरती केली जाते. देवीला नैवैद्यात फळं आणि फुलं वाहिले जातात. लोक एकत्र येउन आरती, गायन आणि भजनं देखील म्हणतात. महिलांचा हा सण खास आनंदाचा मानला जातो. महिला, मुली, मुले गरबा, दांडिया खेळायला एकत्र आनंदाने येतात. या सणामुळे सामाजिक ऐक्याची भावना जोपासली जाते.**

**आली नवरात्री**
**नटुन थटून**
**करूया पुजन**
**आरती ओवाळून**

पितृपंधरवडा संपताच वेध लागते ,ते नवरात्रीचे .....
नूकताच गौरी गणपती चा सण येऊन गेलेला...
त्यामुळे पुढचा उत्साहाचा आणि आनंदाचा सण
म्हणजेच दुर्गादेवीची स्थापना...
आणि तो क्षण आला...
आला क्षण हा भाग्याचा
स्थापना करुनी देवीची
सुखसमृद्धीची,भाग्याची
घडी आली ही आनंदाची....

घरोघरी घटस्थापना केली जाते आणि पुजा अर्चा केली जाते. गावातील मंडळांमध्येही दुर्गादेवीची स्थापना करून नऊ दिवस देवीची धुपदिपांनी यथायोग्य आरती केली जाते. देवीला नैवैद्यात फळं आणि फुलं वाहिले जातात. लोक एकत्र येउन आरती, गायन आणि भजनं देखील म्हणतात.

महिलांचा हा सण खास आनंदाचा मानला जातो. महिला, मुली, मुले गरबा, दांडिया खेळायला एकत्र आनंदाने येतात. या सणामुळे सामाजिक ऐक्याची भावना जोपासली जाते.

गरबा दांडिया खेळून
भक्ती करूया देवीची
पानाफुलांची आरास करु
आरती करु देवीची....

नवरात्राच्या पहिल्या तीन दिवसांमधे दुर्गेची पुजा केली जाते तिला उर्जा आणि शक्तीची देवता मानले जाते. नवरात्रात प्रत्येक दिवसाला आई दुर्गेच्या वेगवेगळया रूपाची पुजा केली जाते. पहिले तीन दिवस त्यांच्या कुमारी, पार्वती आणि काली रूपाचे पुजन करण्यात येतं.

घटस्थापनेच्या पहिल्या दिवशी एका लाकडी काडयांपासुन बनविलेल्या नव्या टोपलीत माती भरली जाते त्यात नऊ प्रकारचे धान्य पेरले जातात...

या टोपलीत दहा ही दिवस पाणी घातले जाते. दहा दिवसांमधे संपुर्ण टोपली धानाने हिरवीगार झालेली असतेआणि मातीचा घट त्यामधे झाकून गेलेला असतो...

असे म्हणतात की.जेवढे टोपलीत हिरवेगार धान्य फुलून येईल ...तेवढे आपले घर,अंगणही धनधान्याने भरुन जाते अशी एक धारणा आहे...

**धनधान्याने भरुन जाओ**
**घर अंगण तुमचे**
**आशीर्वाद देऊनी जाते**
**दुर्गा माता तु आमचे...**

टोपलीच्या मधोमध मातीचा घट ठेउन त्यात विडयाची पाच पाने ठेवली जातात त्यावर नारळ ठेवला जातो.

प्रत्येक दिवशी या घटावर फुलांची माळ सोडली जाते. पहिल्या दिवशी अनेक ठिकाणी विडयाच्या पानांची माळ लावण्याची देखील परंपरा आहे.

पुजेत पाच प्रकारची फळं ठेवण्यात येतात आणि वर फुलोरा बांधला जातो. गणपतीची देवीची आणि नवरात्राची आरती मनोभावे म्हटली जाते...

सकाळ संध्याकाळ आरती आणि धुपांनी देवींचे पूजन केले जाते.

देवीच्या घटाजवळ अखंड दीवा दहा दिवसांकरीता लावला जातो. हा दीवा दहा दिवस विझु दिला जात नाही. या दहा दिवसांमधे नऊ कुमारीकांचे पुजन केले जाते त्यांचे पाय धुवुन त्यांना भेटवस्तु दिल्या जातात. अष्टमीला होमहवन करून देवीला नैवेद्य दाखविण्यात येतो. अनेक ठिकाणी नवमीला नवरात्रीचा कुळाचार असतो तर बऱ्याच ठिकाणी दसऱ्याला देखील कुळाचार असतो. नऊ दिवस देवीला वेगवेगळया रंगाच्या साडया नेसवल्या जातात आणि त्या रंगांप्रमाणे स्त्रिया देखील त्या त्या रंगांच्या साडया परिधान करतांना दिसतात.

नवरात्रातील नववा दिवस हा या उत्सवाचा शेवटचा दिवस असतो या दिवसाला महानवमी देखील म्हणतात. या दिवशी कुमारिकांचे पुजन केले जाते, नऊ छोटया कुमारिकांना बोलावुन त्यांचे पुजन करण्याची प्रथा आहे. या नऊ कुमारिकांपैकी प्रत्येकीला देवी दुर्गेचे एक रूप मानले जाते. या दिवशी या कन्यांचे पाद्यपुजन केले जाते .मोठया आदर आणि सन्मानाने त्यांना घरी आमंत्रीत केले जाते.... नंतर त्या कन्यांना जेऊ घातले जाते. नंतर भाविक त्यांना नवे वस्त्र आणि भेटवस्तु देखील देतात. अनेक कुटुंबांमधे जोगवा मागण्याची देखील परंपरा आहे त्याप्रमाणे घरातील सवाष्ण स्त्री पाच घरी जाऊन जोगवा मागते. त्यामधे कणीक, तांदुळ, गुळ असे जिन्नस असतात. या मिळालेल्या जोगव्यातुनच कुळाचाराच्या दिवशी स्वयंपाक करून देवीला नैवेद्य दाखविण्यात येतो.

सार्वजनिक मंडळांमधे मोठया मोठया मुर्तींची स्थापना करण्यात येते. सुरेख असे देखावे तयार करण्यात येतात. पारंपारीक आणि पुराणकाळातील देखावे आकर्षक असतात आणि भाविकांचे लक्ष वेधणारे देखील असतात.

कोल्हापुर, तुळजापुर, माहुर आणि सप्तश्रृंगी या महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपिठांवर या दहा दिवसांमधे भाविकांची प्रचंड प्रमाणात गर्दी असते. भाविक या दिवसांमधे देवीचे दर्शन घेणे मोठे पुण्याचे कार्य समजतात.

नवरात्रात रात्री लोक दांडिया आणि गरबा खेळतात विशेषतः गुजरात मधे लोक मोठया प्रमाणात रासगरबा खेळतात. गरबा आरतीच्या आधी आई दुर्गेच्या सन्मानार्थ खेळला जातो, आणि दांडिया आरतीच्या नंतर खेळला जातो...

सप्टेंबर ऑक्टोबर मधे नवरात्री च्या वेळी नवरात्राचा दहावा दिवस दसरा म्हणुन साजरा करण्यात येतो. या दिवशी भाविक सरस्वतीची पुजा करतात आणि आई दुर्गेला मानसिक शांती आणि ज्ञानाचे मागणे मागतात. या दिवशी लंकाधीश असुर रावणाचा पुतळा बनवुन त्याचे दहन केले जाते.


**नवरात्राची कथा**

रामायणानुसार प्रभु रामचंद्रांनी देवी दुर्गेला रावणासोबत युध्द होत असतांना बोलवले होते. वसंतऋतु च्या शेवटी दुर्गा देवीची पुजा अर्चना केली जाते....

युध्दाची शक्यता पाहाता प्रभुरामचंद्रांनी देवी ला अस्तं महाविद्येने बोलवले होते ज्याला आपण अकाल बोधन या नावाने देखील जाणतो, पण ही पुजा पारंपारिक दुर्गापुजे पेक्षा थोडी वेगळी असते या पुजेला *अकाल बोधन असे म्हणतात. जीला आपण कधीही करता येणारी पुजा देखील म्हणतो.

**नवरात्री गरबा डान्स**

गुजरात इथं गरबा नेहमी नवरात्र, शरद पौर्णिमा, वसंत पंचमी आणि होळी या प्रसंगी खेळला जातो. या सोबतच नवरात्रीच्या नऊ दिवसांमधे आई जगदंबेच्या सन्मानार्थ पारंपारीक संगीत देखील वाजवले जाते. नृत्य साधारणतः महिलाच करतात पण वर्तमान काळात पुरूष देखील यात सहभागी होतांना दिसून येत आहेत....




## जेष्ठांचा सन्मान...!

कधीही विसरू नका जेष्ठ
नागरिक आहे महान,
त्यांच्या आशिर्वादानेच घर
दिसते नेहमी पुण्यवान.

नका करू हो आपमान
जेष्ठ घरातली आहे शान,
अनुभवांचे देतात ते
नेहमी सगळ्यांना ज्ञान.

म्हातारपण हे जेष्ठांचे
असते दुसरे बालपण,
समजून घ्यावे जेष्ठांना
यातच आहे मोठेपण.

नेहमीच करावा जेष्ठांचा
सगळ्यांसमोर सन्मान,
साऱ्यांसाठी हीच चाकोरी
याचेच असू दयावे भान.

जेष्ठांना नेहमी गोड बोला
नका ऐकून पुढे जावे,
त्यांना दुसरे काहीच नको
फक्त जगण्या उभारी दयावे...!

-अय्युब पठाण लोहगांवकर,
मो. ९७६४३५०३७४.

## तु अन् निसर्ग

पानावर दव आकारलेले
तुझेच चित्र साकारलेले

पुन्हा पक्षांची किलबिल
तुझेच नावं पुकारलेले

फुला फुलांनी उमलताना
तुलाच जणु विचारलेले

पावसाने माती
भिजवताना
तुझेच हृदय स्वीकारलेले

हळुवार पानांची सळसळ
तुझे अंग शहारलेले

तो कंठ नाद कां...?
तुझे पैजण झंकारलेले

डोहात उठले तरंग
तुझे ओठ थरारलेले

-बलराज संघई
मो. 9420015108

## जुना गुलाब

मनाच्या कप्प्यात जपलेलं
झालंय जुनं गुलाबाचे फूल
आठवणींना उजाळा देणार
मनाला पडलेली एक भूल...

अजुनही दरवळतो तो सुगंध
माझ्या मनातील त्या फूलाचा
आठवणीत लपलेल्या प्रेमाचा
जपलाय ठेवा मी कधीचा...

पाकळी पाकळीत दडलीय
आठवण तुझ्या प्रेमाची
जतन करून ठेवलीय
सुगंधीत त्या भेटीची...

झाल्यात आता धुसर आठवणी
पाकळ्याही गेल्यात सुकून
पण आठवणींचा सुगंध मात्र
कधीतरी येतो चुकून...

-सीमा मंगरूळे तवटे
वडूज सातारा

## प्रीत

मनी पडले प्रीतीचे
नवे नवे गं चांदणे
फुललेल्या बकुळीला
चोर चोरून हुंगणे
तिच्या तनू गंधारात
माझे पुरते झिंगणे
होती एकरूप जेव्हा
श्वास श्वासाची रिंगणे
किणकिण बोलतात
तिच्या हाताची कांकणे
मौन ओठातून मला
आवडते पालवणे
पाहूनिया प्रणयाला
लाजतात तारांगणे
रती मदनाची चाले
कामक्रिडा पारायणे
निशिगंधा लावी वेड
बकुळीची गं तोरणे
रातराणी फुलो-यात
गंधाळली गं अंगणे

-सौ संगीता माने

## ग़ज़ल

फिर से मौसम को बदलते हुए देखा है
एक हसीं शाम को ढलते हुए देखा है
रास आए न तुम्हे कभी मिलने के वादे
दिल से इक आह को निकलते हुए देखा है
जलती है जो जलाती है आग अपने में
आग को एक आग में जलते हुए देखा है
मुद्दतों बाद मेरी गली से वोह गुजरे है अभी
चांद को शर्म से जमीं पर चलते हुए देखा है
ख़्वाब में ही सही तुम आए तो करीब
छांव को छांव से यूं ही मिलते हुए देखा है
खुशबू से बिछड़ने का गम है गुलशन को पता
मैने तूफ़ान मे फूलों को संभलते हुए देखा है
हो भला कैसे ये बात रोशनी को पता
मोम को आग में पिघलते हुए देखा है

-बलराज संघई
मो. 9420015108

## ।। सत्य ।।

दुःख आहे जगात या;
सत्य हे जीवनात या.

कोण मेले घराजवळ?
वाचले पेपरात या.

माणसे भेटती अता;
मानवी मुखवट्यात या.

आठवण जाळते तुझी;
मज सदा पावसात या.

स्वप्न अन् रक्त पेरतो;
आजही वावरात या...!

- मिलिंद देविदास हिवराळे
बार्शिटाकळी, जि. अकोला,
मो. 7507094882

## टोला

जग खूप बदललंय राव
पूर्वी ज्याला आम्ही वातरटपणा म्हणायचो
त्याला हे बेडूक "एटीट्यूड" म्हणायला लागलं
येड वाकडं तोंड करून त्या टिक-टॉक वर गाऊ लागलं
काहींच्या आंगात तर देवीच यायली,
मंग पोर बी साड्या घालून नाचू लागली !

खरंच सांगतो तुम्हाला जग खूपच बदललंय राव
नव्वद च्या दशका मध्ये ज्याला आम्ही अहंकार गर्व म्हणून
अंगावरून असं ओवाळून फेकल
त्यालाच हे येडे कंदफळं "स्वॅग" म्हणत
डोक्यात घालून निर्लज्जपणे मिरवू लागलं !

कपडे,चपला, बुट सगळ्यांचा काय तो बोंबाटा झाला
कोणतं पोरीच नी पोराचं घंटा उमजेना
म्हनून, ना ईकडे ना तिकडे तो "यूनी सेक्स" फॅशन मधे आला
आम्ही लहानपणी चप्पल उलटी घालून तोंडावर आदळायचो
पण आताच हे बेण मॅचींग चड्डी साठी रडतना !

आता हा फरक तर सगळ्या घरा घरात दिसातोना
आमची म्हातारी आम्हाला अंगाई गावून झोपवी
तरी पण नाहीच लागले डोळे, तर दोन दणके देवून निजवी
आता मम्मीच्या ह्या गोंड्याला हिंदीची फिल्मी लोरी
अन् ते बी फिसकल ना, मग तर झिंग झिंगाटच जमत ना !

हे सगळं ठीक आहे, प्रेमाचं तर विचारूच नका, नुस्ता कचरा!
प्रत्येक सेल्फित तिचा तोच वाकडा मुंगूस चेहरा
ह्या माकडाचा इकडून तोच फोटो, एक डोळा बंद नी एक भोकरा
आमच्या टायमला च्यामारी, साधी "आय लव यू" म्हणाची पंचाईत
आणि हे बुलेट ट्रेन वाले साले "रीबौंड" च्या घाईत !

प्रेमाचं अजून थोड आहे बरका, लय पसारा !
ती त्याला तिकडून म्हणती बेबी-बाबू-बच्चू-पिल्लू-शोना
बरं ती सांगत बी नाय पिल्लू कशाच, अरे नुसतच पिल्लु ना !
आणि आमच्या काळी, झालीच पोरांची वहिनी एखांदी, तर
म्हणे अहो ऐकता ना !

जग लयच बदललंय राव !
हसणाऱ्याच्या जीवनात आनंद नाय
रडणाऱ्याच्या डोळ्यात आसवाचा एक थेंब बी नाय
प्रेम करणाऱ्याच्या मनात प्रेम सोडून सगळंच हाय
दोस्ती मधे लाईक, फॉलो, कमेंट, रिॲक्ट ची मारामारी सुद्धा हाय

खरंच जग एवढं बदललंय राव
जिवंत तर हाय पण जगत बी नाय !

-अमोल सोनाजी मोकासे
पिशोर, ता. कन्नड, संभाजीनगर, 9730781775


## माय

प्रेम श्रेष्ठ जगामध्ये ।
असे माय लेकराचे ।।
नसे तयांमध्ये अंतर ।
जमीन आभाळाचे ।। धृ ।।
बीज भुईआड दडे ।
माती पोसते तयाला ।।
बाळ खेळे उदरात ।
वेदना अलंकार झाल्या ।। 1 ।।
उन्ह डोईवर झेले ।
पदर लेकराच्या माथी ।।
परीक्षेतं जीवनाच्या ।
माय एकमेव साथी ।। 2 ।।
असे दुखणं खुपणं ।
माय राबतसे नेहमी ।।
वसे पाऊलात तिच्या ।
तिन्ही जगांचा तो स्वामी ।। 3 ।।
येता दमून भागून ।
माय भरविते घास ।।
तिच्या हातामध्ये जणू ।
अन्नपूर्णेचा वास ।। 4 ।।
नसे घरी माय जेव्हा ।
घर खायलाच उठे ।।
तिच्या प्रेमळ स्पर्शानं ।
भोवती वैकुंठच दाटे ।। 5 ।।
घरासाठी झिजतांना ।
माय झेलतसे काटे ।।
संकट येता वासरावरी ।
गाय वाघीणच वाटे ।। 6 ।।
शब्द शब्द लिहू माय ।
तुझे कर्तृत्व महान ।।
तुझ्या ममतेपुढे गं ।
उभं आभाळ लहान ।। 7 ।।

-मनिष आहिरे



# एक पाऊल टाकू 'मी माझा'च्या पलीकडे



आशिष निनगुरकर
संपर्क क्र. : ९०२२८७९९०४

आधुनिक केसरी

**तरुणाईच्या हातात देश सुरक्षित राहायला हवा,अशी जगाची अपेक्षा असते.परंतु,देशाच्या सुरक्षिततेआधी आपली,आपल्या नोकरीची आणि परिवाराची सुरक्षितता महत्वाची मानून 'आपण बरं आणि आपलं काम बरं' अशा भावनेतून आपल्यापैकी अनेक जण आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टींकडे दुर्लक्ष करत पुढे सरकत राहतात. दिवस पुढे जात राहतात आणि मग एखाद्या ताज्या आदोंलनाच्या निमित्तानं आपल्याला सत्व तपासून पाहण्याची संधी मिळते. गेल्या काही वर्षांत आपल्याला अशा अनेक संधी मिळत आहेत. कधी भाषिक अस्मिता, तर कधी कडवी आक्रमक भूमिका घेणाऱ्यांच्या निमित्तानं आपण कोड्यात पडतो. खरोखरचं आपली म्हणून काही भूमिका आहे काय,तशी ती असल्यास जाहीरपणे आपण ती मांडू शकतो का, आणि तशी भूमिका मांडल्यानंतर होणारी टीका स्वीकारायची आपली तयारी आहे काय ? नोकरीत तणाव,आवराआवरीची धावपळ आणि थकून जाणारं मन आणि शरीर याला आपल्यातला प्रत्येक जण सभ्य , सुशिक्षित असतांना संघर्षापासून भूमिका घेण्यापासून दूर राहू लागलो, तर नेमकी समजोपयोगी भूमिका घेणार कोण? आवर्जून काही सांगायची तीव्र गरज असतांनाही गप्प बसून राहिल्यामुळे समाजात पसरत राहणारे चुकीचे विचार अधिक टोकदार बनले तर येणारा भविष्यकाळ आपल्याला क्षमा करेल काय, या प्रश्नांचा विचार करायला हवा. रस्त्यावर उतरून संघर्ष करता येत नसला, तरी पुढे येऊन विचार मांडणं आवश्यक आहे.**

मनमोकळेपणाने व्यक्त होणे गरजेचे आहे. नाहीतर आपल्या भावनांचा एकत्र उद्रेक झाला कि त्याचा काय उपयोग? तेव्हा वेळ हातातून निघून गेलेली असते.त्यापेक्षा योग्य वेळी बोलता यायला हवे.आजच्या काळात नुसते शांत बसणे किंवा बघ्याची भूमिका घेणे हा गुन्हा आहे. सध्या सगळीकडे 'करोनो' व्हायरसने थैमान घातले आहे.संपूर्ण देश लॉकडाऊन कडून आता अनलॉकच्या दिशेने पाऊल टाकत आहे.कोरोनाच्या दोन लाटा येऊन गेल्या आहेत आणि आता तिसरी लाट येते कि काय? असे तर्कवितर्क सुरु आहेत. काहीजणांचे तर अजूनही 'वर्क फ्रॉम होम' सुरु आहे. अशावेळी काय करायचे? हा सगळ्यांना भेडसावणारा प्रश्न आहे.तेव्हा किती सिनेमे बघणार? किती पुस्तके वाचणार? मोबाईलवर किती गेम खेळणार? अशा सर्व गोष्टींचा कंटाळा हा कधी ना कधी येणारच. परंतु जर आपण हा वेळ आपल्या स्वतःसाठी दिला,तर किती उत्तम होईल. या धावपळीच्या जगात कुठेतरी आपल्याला ब्रेक मिळणे गरजेचे होते. स्वतःचे आत्मपरीक्षण करणे गरजेचे होते.त्यासाठी ही वेळ योग्य आहे,असे मला वाटते. या काळात आपण आपले अनेक जवळचे अनेक मित्र,नातेवाईक गमावले आहेत. त्यामुळे जवळची व्यक्ती अश्या कुठल्या आजाराने गेल्यानंतर काय होते? हे आपण अनुभवले असेलच. या काळात मानसिक आधाराची जास्त गरज असते.

एरवी आपण आपल्याच कामात म्हणजे नोकरीत किंवा व्यवसायात व्यस्त असतो. स्वतःला द्यायला आपल्याकडे जरासुद्धा वेळ नसतो. त्यामुळे मिळालेला हा वेळ सत्कारणी लावणे गरजेचे आहे. मी जेव्हा माझ्या भूतकाळात जातो, तेव्हा माझ्या कॉलेजचे ते मोरपंखी दिवस मला आठवतात.ते दिवस खरंच खूप भारी होते. त्यावेळी मी 'कमवा आणि शिकवा' या योजनेत सहभाग घेतला होता.कॉलेजचे लेक्चर्स झाले कि,आम्ही सगळा ग्रुप कॉलेजमधील काम करत असू.त्याचे आम्हाला काही पैसे मिळायचे.पण त्या पैशांपेक्षा जास्त मनोभावे आनंद त्या कामातून मिळायचा.पैशातून बसच्या पासची निकड भागायची. त्यामुळे घरच्यांवरचा थोडासा भार हलका व्हायचा.त्या वयात पैशाची किंमत कळली,म्हणून आजच्या महागाईच्या जगात सर्व गोष्टींना तोंड देता येते.पण याउलट आजच्या तरुणाईबद्दल बोलायचे ठरले तर फारच चित्र-विचित्र अवस्था आहे.कॉलेज कॅम्पसमध्ये शिरलं,की मन अगदी प्रसन्न होऊन जातं.या तरुणाईत फेरफटका मारल्यानंतर,नवीन पंख घेऊन उडू पाहणारी ही पाखरं वेगवेगळ्या कल्पनेत रमतांना दिसतात.नवनवीन फॅशन करू पाहणारी ही तरुणाई कट्ट्यावर आल्यानंतर त्यांच्या विविध विषयांवरील चर्चा,प्रसंग व मतं मांडतांना पाहून बरं वाटतं.प्रत्येक जण आपल्या देहबोलीतून जो स्मार्टनेस दाखवीत असतो,तो वाखाणण्याजोगा असतो.परंतु,याच वातावरणात व्यसनाधीन,निराशमय पिढीचं चित्रही मला दिसतं,तेव्हा मन चिंताग्रस्त होतं आणि नकळत वाईट वाटतं.अशी दोन्ही टोके दिसल्याने मन भावविभोर होते.

तरुणाई म्हटलं,की सळसळता उत्साह,कट्ट्यावरच्या गप्पा,मित्रांबरोबर एन्जॉय केलेला प्रत्येक क्षण,हेच आठवतं. पण बदलत्या परिस्थितीनुसार भान येतंच असं नाही.मी नेमका कोण आणि बदलत्या परिस्थितीत माझं खरं स्थान काय आहे, हा प्रश्न आपल्यापैकी किती तरुणांना पडतो? शिक्षण,उच्च शिक्षण,रोजगार,लग्न आणि सेटल होणं या मार्गानं सुरु असलेला आपला सरधोपट प्रवास उमेदीची १५ वर्षं तरी खातो. इतकी वर्ष घालवल्यांनंतर आणि 'दोनाचे चार' झाल्यानंतर संसाराची काळजी घेण्याची जबाबदारी पडते. चाळीशीपर्यंतचा माणूस तरुण मानला जात असला तरी तरुणाईत अपेक्षित असलेला जोश,संस्कारांचं उपयोजन आणि समाजभिमुखता खरोखरच कितपत जपता येते,असा प्रश्न आजघडीला पडतो आहे.आक्रमक,अतिरेकी विचारांचं तांडव बाहेर सुरु असतांना आत्मपरीक्षण करतांना असा प्रश्न हटकून पडतो. आपली भविष्यातील ओळख काय असावी याचे असे सुस्पष्ट चित्र घटनात्मक स्वरूपात आपल्या भावी पिढ्यांपुढे ठेवणाऱ्या मोजक्या देशांमध्ये आपला देश आहे, हे आपले भाग्य आहे. ते चित्र प्रत्यक्षात आणण्यासाठी सर्वस्व पणाला लावणे, त्या ध्येयपूर्तीसाठी समाजाला दिशा देणे, समाजाची जडण-घडण करणे, त्या चित्रातील तत्त्वांच्या विरोधी तत्त्वांशी अहिंसक संघर्ष करणे आणि ते चित्र प्रत्यक्षात आणल्यानंतर ते प्राणपणाने अबाधित राखणे, संवर्धित करणे हे आपल्या भावी नेतृत्वाचे इतिहासदत्त कर्तव्य आहे आणि तेच त्याच्यापुढील आव्हानही आहे. आपल्या देशाचा विकास म्हणजे वरील घटनात्मक स्वप्नाची परिपूर्ती. या स्वप्नपूर्तीला खीळ घालणाऱ्या अनेक समस्या आहेत. त्यात - पराकोटीची विषमता, गरिबी, कुपोषण, उपासमार, बेकारी, व्यसनाधीनता, सार्वजनिक सुविधा व विकासातील असमतोल, आर्थिक मंदीचे सावट, भ्रष्टाचार, अस्वच्छता, प्रदूषण, रोगराई, अज्ञान, निरक्षरता, निकृष्ट दर्जाचे शिक्षण-आरोग्यव्यवस्था-जीवनमान, पराधीनता, अवैज्ञानिकता, दैववाद, सामाजिक अन्याय, शोषण, लिंगभेद, जातीयवाद, धर्मांधता, हिंसाचार, अत्याचार, झुंडशाही, शत्रुभाव, असहिष्णुता, अल्पसंख्याकांमधील असुरक्षितता, लोकशाही संस्थांचा ऱ्हास, सामाजिक अशांतता, दहशतवाद, सांप्रदायिकता, सांस्कृतिक मागासलेपण, बेशिस्त, सुजाण नागरिकत्वाचा अभाव, नैसर्गिक संसाधनांची उधळपट्टी, पर्यावरणीय अरिष्ट अशा अनेक जटील समस्या आपल्या देशात दीर्घ काळ टिकून राहिल्या आहेत. या समस्या पारंपरिक उपायांनी सुटण्यासारख्या असत्या तर अद्याप शिल्लक राहिल्याच नसत्या.

गेल्या दहा हजार वर्षांत मानवी समाज शेतीप्रधान, उद्योगप्रधान आणि माहितीप्रधान अवस्थांमधून संक्रमित होत-होत आता ज्ञानप्रधान व बुद्धिमत्ताप्रधान अवस्थेत प्रवेश करत आहे. पूर्वीच्या तीनही अवस्थांपेक्षा ही अवस्था मुळातच खूप वेगळी आहे. पूर्वीच्या अवस्थांमध्ये मानवी समाज ज्ञान वापरत नव्हता असे नाही, पण त्याच्या जीवनात ज्ञानाला मध्यवर्ती स्थान नव्हते. निसर्गसंपत्ती, खनिजे, कच्चा माल, ऊर्जा, जमीन, प्राण्यांचे व माणसांचे शारीरिक श्रम, आर्थिक भांडवल, माहिती आणि तिच्यावर वेगाने व स्वस्तात संगणकीय प्रक्रिया करण्याची क्षमता इत्यादींना मध्यवर्ती स्थान होते. एकविसाव्या शतकापासून मात्र नव्या कर्मशील ज्ञानाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होताना आपण बघतो आहोत. या शतकात निसर्गसंपत्ती, खनिजे, कच्चा माल, ऊर्जा, जमीन, शारीरिक श्रम करणारी मोठी प्रशिक्षित लोकसंख्या, आर्थिक भांडवल इत्यादी घटक पुरेसे नसूनही केवळ



ज्ञानाच्या, बौद्धिक संपदेच्या बळावर काही समाज, काही देश, काही उद्योग विलक्षण विकास करताना दिसू लागले आहेत. हे पूर्वी कधीही झाले नव्हते. कर्मशील ज्ञान आणि संपत्ती हे शब्द या शतकात समानार्थी होत आहेत.

गेल्या दोन शतकांत श्रीमंत देश अधिकाधिक श्रीमंत होत गेले, ते त्यांनी केलेल्या नव्या कर्मशील ज्ञानाच्या प्रचंड निर्मितीमुळे. केवळ विज्ञान-तंत्रज्ञानच नव्हे, तर जीवनाच्या सर्वच क्षेत्रांना स्पर्श करणाऱ्या ज्ञानशाखांमध्ये अत्याधुनिक ज्ञानाच्या निर्मितीचा त्यांनी ध्यास घेतला. हे नवे ज्ञान समाजातल्या भेदाभेदांना पार करत सर्व स्तरांपर्यंत सतत वेगाने वितरित करण्याचा महाप्रयास त्यांनी केला. हे नवे ज्ञान जुन्या उपयुक्त ज्ञानाशी जोडत, जुन्या-नव्याचे एकात्मिक व्यवस्थापन त्यांनी केले. सर्वसामान्यांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन देत, या नव्या ज्ञानाचा आर्थिक व सामाजिक विकासासाठी सतत परिणामकारकपणे वापर केला. नव्या ज्ञानाची इंटरनेटद्वारे जोडलेल्या लोकसमूहांच्या सहभागातून सहनिर्मिती, वितरण, व्यवस्थापन व सर्वसमावेशक विकासासाठी उपयोजन अशा विशिष्ट विकासनीतीतून वर उल्लेखिलेल्या चतुःसूत्रीने आकार घेतला. आता या ज्ञानाधिष्ठित प्रक्रियेला विकासाच्या क्षेत्रात मध्यवर्ती स्वरूप प्राप्त झाले आहे आणि ज्ञानप्रधान सभ्यता किंवा ज्ञानाधिष्ठित समाज आकाराला येत आहेत. स्मार्ट फोनची जी किंमत आपण मोजतो ती त्याच्यातील जड पदार्थांच्या वजनासाठी नसून त्यामागील निसर्गविज्ञान, मनोविज्ञान, समाजविज्ञान, तंत्रज्ञान आणि कलात्मक आविष्कार यांच्या बौद्धिक संपदेसाठी (म्हणजेच मुख्यत्वे नवकल्पनांच्या आणि ज्ञानाच्या आशयासाठी) आहे. जशी कच्च्या मालाची आणि ऊर्जेची जागा ज्ञान घेत आहे, तशीच शारीरिक श्रमाची जागाही बौद्धिक श्रम घेत आहेत. आर्थिक भांडवलाची जागा कर्मशील स्वरूपातील ज्ञान-भांडवल घेत आहे आणि भौतिक किंवा आर्थिक मालमत्तेपेक्षा बौद्धिक संपदेला महत्त्व प्राप्त होत आहे. कंपन्यांचे बाजारमूल्य निश्चित करताना आता त्यांच्याकडील जमीनजुमला, प्लांट व मशिनरी किंवा आर्थिक मालमत्तेपेक्षा त्यांच्याकडील तज्ज्ञ मनुष्यबळ व त्यांची पेटंट्स आणि कॉपीराईट्स इ.च्या स्वरूपातील नोंदणीकृत बौद्धिक संपदा व त्यांचे बौद्धिक स्वामित्व हक्कच प्रामुख्याने विचारात घेतले जात आहेत. ज्ञानाचा चहूबाजूंनी आणि सेकंदा सेकंदाला विस्फोट होत आहे. ज्ञानयुगाचे ते एक व्यवच्छेदक लक्षण आहे. अभिजनांची मक्तेदारी संपवत समाजाच्या अनेक स्तरांतील लोक आता ज्ञानाची निर्मिती करत आहेत. एकविसावे शतक सुरू होताना जन्मलेले विकिपेडिया आणि तत्सम मुक्त ज्ञानस्रोत हे सर्वसामान्य लोकांच्या ज्ञानक्षेत्रातील असामान्य अशा सामूहिक कृतीचे पहिलेवहिले नमुने आहेत. इंटरनेटमुळे भौगोलिक बंधने दूर सारून माहितीची सर्वदूर उपलब्धता आणि ज्ञानाची सहनिर्मिती विलक्षण वेगाने वाढत आहे. मानवी समाज जणू काही एका चिरायू अशा वैश्विक मेंदूची निर्मिती करत आहे आणि समाजातला प्रत्येक जण त्या मेंदूचा बव्हंशी मुक्त वापर करणार आहे. या पार्श्वभूमीवर, आता आपल्या देशाला गरज आहे - कोट्यवधी गरीब जनतेच्या जीवनातील वर उल्लेखलेल्या जटिल समस्या सोडवू शकणाऱ्या सर्जनशील, नवोन्मेषी ज्ञानकर्मींची. आणि अशा असंख्य संवेदनशील व लोकाभिमुख ज्ञानकर्मींची चळवळ कशी निर्माण करायची व कार्यरत ठेवायची, हे भावी काळातील युवा नेतृत्वासमोरील प्रमुख आव्हान असणार आहे. अक्राळविक्राळ स्वरूप धारण करणाऱ्या वरील समस्यांची अशी अपारंपरिक सोडवणूक न केल्यास प्रगत देशांचा व बहुराष्ट्रीय कंपन्यांचा नवा ज्ञानाधिष्ठित साम्राज्यवाद आपले शोषण करेल आणि मग आपल्या स्वातंत्र्याला ग्रहण लागेल. अशा साम्राज्यवादाला पूरक अशी भ्रष्ट व संधिसाधू (सत्ताधारी वर्ग, नफेखोर कॉर्पोरेट्स, विकाऊ मीडिया) यांची युती राज्यघटनेत अभिप्रेत असलेला आदर्श समाज प्रत्यक्षात आणू देणार नाही. असंघटित सामान्य जनतेच्या मागासलेपणाचा गैरफायदा उठवून अशा शक्तींनी केलेल्या आपल्या शोषणाचा इतिहास फार जुना नाही. आजही त्यांच्याकडून ते मोठ्या प्रमाणावर चालू आहे. आपल्या देशातील ८० कोटी लोकांच्या भीषण दारिद्र्याचे ते मुख्य कारण आहे. दारिद्र्यमुक्त, विषमतामुक्त, सर्जनशील, नवोन्मेषी, स्वतंत्र वृत्तीच्या, आधुनिक नैतिक/जीवन-मूल्ये जपणाऱ्या, पर्यावरणसंवर्धक आणि लोकशाही समाजाच्या निर्मितीची जबाबदारी नवे ज्ञानाधिष्ठित समाजविकासकेन्द्री नेतृत्वच पेलू शकेल. आपल्या देशाचे ‘भारत’ हे नाव या अर्थाने सार्थ करून दाखवणे, हे भावी युवा नेतृत्वासमोरील एक मोठे आव्हान आहे.

समान विचारांचे काही मित्र उभे करणं आणि पुढल्या पिढीला या प्रागतिक आणि संस्कारी विचारांचं बाळकडू देणं गरजेचं आहे.वाद कुठल्याही गोष्टींनी उभा राहिला,तरी आपलं सत्व न गमावता,समाजाभिमुख विचार मांडत आत्मपरीक्षण करता यायला हवं. रोजच्या दगदगीतून वेळ काढत 'मी माझा' च्या पलीकडे जाऊन इतरांसाठी,समाजासाठी काहीतरी करायला हवं.एक सुरुवात कुणीतरी करायला हवी,तरच कदाचित त्यातून उद्याची रम्य पहाट उगवेल.सध्या जी आपल्यावर परिस्थिती ओढवली आहे,त्याचा नेमकेपणाने अभ्यास करून स्वतःची काळजी घेणे गरजेचे आहे.त्याबरोबर इतरांचा विचार करणेही तितकेच गरजेचे आहे.सध्या हे संकट किंवा ही लढाई कुण्या एकट्याची नसून आपल्या सर्वांची आहे.ही लढाई आपल्याला मैदानावर न लढता घरात बसून जिंकायची आहे. त्यामुळे सध्याच्या कोरोनामय परिस्थितीमध्ये,आतातरी आपण आपले आत्मचिंतन करायला हवे आणि एक पाऊल 'मी माझा' च्या पलीकडे टाकायला हवे.

# सायबर गुन्हेगारांचे अदृश्य चेहरे



श्याम ठाणेदार
संपर्क क्र. ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**सध्याचे युग हे सोशल मीडियाचे युग आहे. या युगात सोशल मीडियावर ऍक्टिव्ह राहून आपण किती सोशल आहोत हे दाखवून देण्याची चढाओढ लागलेली असते. त्यातही तरुण वर्ग तर सोशल मीडियाच्या आहारीच गेला आहे. सोशल मीडियावर आपले फॅन फॉलोअर्स कसे वाढतील? आपल्या पोस्टला जास्तीतजास्त लाईक आणि शेअर कसे मिळतील याकडे तरुणांचे लक्ष असते. मात्र काही वेळा हेच जास्त फॅन फॉलोअर्स असलेले अकाउंट सायबर गुन्हेगारांना आकर्षित करतात आणि यांना धोका दिला जातो.**

सायबर गुन्हेगार ज्यांचे जास्त फॅन फॉलोअर्स असतील अशा तरुणांना स्टार्टअप कंपनी आपल्या प्रोडक्टच्या जाहिराती करण्यासाठी संपर्क करतात त्यातही या सायबर गुन्हेगारांचे लक्ष तरुण मुलींवर अधिक असते. सुंदर आणि जास्त फॅन फॉलोअर्स असणाऱ्या तरुण मुलींना जाळ्यात ओढण्यासाठी सायबर गुन्हेगार आपण मोठ्या कंपनीतून बोलत असून या मुलींचे फेसबुक आणि इंस्टाग्रामवरील रिल्स आणि व्हिडिओ पाहून संपर्क केल्याचे सांगतात.


मुलींचा व्हिडीओ कंपनीला आवडला असून तुम्हाला आमच्या कंपनीच्या प्रोडक्टसाठी जाहिरात करण्यासाठी निवडले असल्याचे सांगून आणखी व्हिडीओ आणि रिल्स पाठवण्यास सांगतात. बहुतेक वेळा असा संपर्क ईमेल द्वारे केला जातो. मुलीही जणू आपण मॉडेल बनलो आहोत अशा आविर्भात त्यांनी सांगितल्याप्रमाणे व्हिडीओ पाठवतात व इथेच फसतात. व्हिडिओ पाठवल्यानंतर काही दिवसांनी पुन्हा त्या मुलींना मेल येतो हा मेल त्यांचाच मॉर्फ केलेला व्हिडिओ असतो. तो व्हिडिओ मॉर्फ करून अश्लील बनवलेला असतो. हा व्हिडीओ पाठवून मुलींना ब्लॅकमेल केले जाते. हे अश्लील व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देऊन मुलींकडे पैशांची मागणी केली जाते. ज्यांच्याकडे पैसे आहेत त्या मुली पैसे देऊन स्वतःची सुटका करून घेतात मात्र ज्यांना पैसे देणे शक्य होत नाही त्या मुली बदनामीच्या भीतीने स्वतःच आयुष्य संपवून टाकतात.

आजवर देशात अनेक मुली या सायबर गुन्हेगारांच्या कारस्थांनाना बळी पडल्या आहेत. विशेष म्हणजे हे ब्लॅकमेलर सायबर गुन्हेगार अदृश्य असल्याने सायबर क्राईमकडे तक्रार करूनही यांचा छडा लागेलच असे नाही. अशा अनेक केसेस पोलिसांच्या सायबर क्राईम सेल कडे दाखल असूनही अनेक गुन्हेगार मोकाट




फिरत आहेत. अशा सायबर गुन्हेगारांचा छडा लावणे पोलिसांसाठी डोकेदुखीची बाब बनली आहे. पोलिसांच्या सायबर सेलकडून अशा आमिषाला बळी पडू असे आव्हान केले जातेतरीही अनेक तरुण आमिषाला बळी पडतात. अलीकडे तर हे प्रमाण खूप वाढले आहे त्यामुळे सोशल मीडियावर वावरताना खूप सतर्क राहणे आवश्यक आहे. सायबर गुन्हेगारांची ही टोळी आपली सोशल मीडियामध्ये आपण टाकत असलेल्या पोस्टवरुन आपली मानसिकता ओळखून पद्धतशीरपणे जाळे टाकतात व फसवतात त्यामुळे सोशल मीडियावर पोस्ट टाकताना काळजी घ्यावी.

सोशल मीडियावर ओळखीच्याच लोकांना फॉलो करावे. अनोळखी लोकांच्या फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नये. अनोळखी लोकांच्या मेल आणि फोन कॉलला उत्तर देऊ नये. स्वतःच्या कौटुंबिक आणि वैयक्तिक बाबी सोशल मीडियावर टाकू नये. सोशल मीडियावर वावरताना जर सतर्क राहिले नाही तर सायबर गुन्हेगारांचे हे अदृश्य चेहरे आपल्याला घेरण्यास टपून बसलेलेच आहेत याची जाणीव सोशल मीडिया वापरणाऱ्या सर्व तरूणांनी ठेवावी.







श्रीमती छाया खेडकर
संपर्क क्र. 8888780568


आधुनिक केसरी

अ) गणिताच्या मुलभूत संकल्पनाः संख्याज्ञान संख्येचे लेखन व वाचन : ते सारणी क्र. 1पर्यंत



सारणी क्र. 1

| संख्या | तिचे लेखन | तिचे वाचन |
|---|---|---|
| 7 | 7 | सात |
| 64 | 64 | चौसष्ट |
| 350 | 350 | तीनशे पन्नास |
| 8291 | 8,291 | आठ हजार दोनशे एक्याण्णव |
| 94301 | 94,301 | चौऱ्याण्णव हजार तीनशे एक |
| 853277 | 8,53,277 | आठ लाख त्रेपन्न हजार दोनशे सत्त्याहत्तर |
| 4301652 | 43,01,652 | त्रेचाळीस लाख एक हजार सहाशे बावन्न |
| 62589010 | 6, 25,89,010 | सहा कोटी, पंचवीस लाख एकोणनव्वद हजार दहा |




ब) गणिताची मुलभूत संकल्पना प्रश्न संच
1) संख्येचे लेखन करताना कोणत्या चिन्हांचा वापर करतात.
2) 25, 830 या संख्येचे वाचन करा.
3) 968756 या संख्येचे चिन्ह वापरून वाचन करा.
4) 40532017 या संख्येचे चिन्ह वापरून लेखन करा.
5) 55, 44, 833 या संख्येचे वाचन करा.

उखाणाः 1) पोपट मैना जोडीने असतात संख्येचे वाचन नीट होण्यासाठी स्वल्पविराम देऊन,संख्येतील अंकाचे गट पाडतात. 2) घार फिरते आकाशात संख्येचे गट पाडताना उजवीकडून-डावीकडे तीन अंक सोडून दोन-दोन अंकाचे गट पाडत जातात.
5) कविता क्रमांक 14

तुकारामनीती
भाग 27

# कमोदिनी काय जाणे तो परिमळ...!



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**कोणताही कवी, लेखक, वक्ता किंवा प्रबोधनकार चिरकाल लोकांच्या मनावर अधिराज्य गाजवून काळाच्या पलीकडे जाऊन, अनंत आकाशाला गवसणी घालून का अमर असतो ? याचं कारण म्हणजे, ती सृजन व्यक्ती आपल्या वाङमयाद्वारे, लेखन सामर्थ्याच्या जोरावर काळाच्या जिवंत अनुभूतीने अमरत्व अक्षररुपाने लोकांच्या घराघरातून अभंग-कथा-नाटकं-गाणी इत्यादीच्या द्वारे सामान्य माणसांच्या संघर्षाचं-आनंदाचं अस्तित्व अधोरेखित करत असते ! हे लेखक-कवी लोक अर्धवेडे, पागल असतात ! त्यांना आपल्या नजरेच्या पलीकडचं सहजच दिसतं ! जिथं सूर्याचा प्रखर प्रकाश, चंद्राचं शीतल चांदणं पोहचत नाही किंवा कोकिळेची कुहूकुहू पोहचत नाही, तिथं या माणसांची दृष्टी पोहोचते ! अक्षरशः या लेखक लोकांना पक्षी-पानं-फुलं-झाडं-नद्या-डोंगर-प्राणी बोलत असतात ! झाडाचं डुलणं, फुलाचं फुलणं यांना कळतं आणि मग त्यावर ते कथा-कविता-संवाद लिहितात ! सृजन लोकांचे दृष्टांत आणि सिद्धांत एकदम वेगळे असतात. सामान्य माणसं दुःखी झाले कि; ते दुःखाला कुरवाळत बसतात, आनंदी झाले कि; हुरळून जातात ! या वेड्या लोकांचं मात्र वेगळंच असतं. दुःख होवो कि सुख, ते त्या क्षणाचं अक्षर-सोनं करून घरोघरी वाटत सुटतात ! त्यांना 'सुख-दुःखात' भेद वाटत नाही !**

त्याचबरोबर एखादं वाङमय लोकांच्या दैनंदिन जगण्याचं माध्यम का होतं ? याचं कारण म्हणजे त्या सृजन साहित्यिकानं उपयोगात आणलेले साधे लोकसिद्धांत आणि त्याला अनुसरून सरळ सोपे दृष्टांत ! यामुळेच संपूर्ण भारतातच काय अखंड जगात होमर, ब्लेक, शेक्सपिअर, खलील जिब्रान, वॉल्ट व्हिटमन, वर्डस्वर्थ, पो, शेले, किट्स, बायरन, एलिएट, डांटे, टागोर, थिरू वल्लूर, कबीर, तुलसी, वाल्मिक, मोरोपंत, ज्ञानोबा, तुकोबा, तुकडोजी महाराज, शिरवाडकर, बालकवी, बोरकर, भट, साठे, पाडगावकर, ग्रेस, कर्डक, वाघ, गजवी, महानोर, कांत, बागुल, ढसाळ, भालेराव आदी अनंत वेड्यांनी आपल्या अमर, अलौकिक, सर्वांगसुंदर अभंग-काव्याद्वारे दृष्टांत आणि त्याच तोडीचे जीवन सिद्धांत हसत खेळत मांडून जनसामान्यांचं जगणं आणि मरणं सुंदर-सोज्वळ करून टाकलं आहे ! या प्रत्येक कवीचं एक साधर्म्य म्हणजे, ही सर्वच मंडळी धर्माच्या (म्हणजेच मानवधर्म) आधारे प्रबोधन करतांना आपले जीवन-सिद्धांत पटवून देतात, नव्हे नव्हे अवघड झालेलं जगणं सोपं करून सहजतेने शुगर कोटेड गोळीसारखं सामान्यांच्या गळी उतरवतात ! ही माणसं भक्ती किंवा देवाचे कुठलेही अवडंबर न माजवता अनेक विषय सहज पटवून देतात. त्यांचा देव मंदिर-चर्च-गुरुद्वारा-मस्जिद-स्तूप किंवा एखाद्या मूर्तीत केंव्हाच अडकलेला नसतो ! त्यांचा देव त्यांच्या अक्षरातून पाझरत असतो, अगदी गावाकुसातील आणि बाहेरील सामान्य माणसांच्या पडक्या भिंती-झोपडी-शेतापर्यंत ! याच अनुषंगाने संत ज्ञानोबाराय आपल्या ज्ञानेश्वरी या दृष्टांत-सिद्धांताने ओतप्रोत, अलौकिक ग्रंथातील दहाव्या अध्यात श्री गुरूंचे वर्णन करतांना आणि त्यांच्याप्रती अनन्य-कृतज्ञभाव व्यक्त करतांना,

केउता कल्पतरुवरी फुलौरा ? । कायसेनि पाहुणेरु
क्षीरसागरा ? ।
कवणें वासीं कापुरा । सुवासु देवों ? ॥ ११ ॥
चंदनातें कायसेनि चर्चावें । अमृतातें केउतें रांधावें ।
गगनावरी उभवावें । घडे केवीं ? ॥ १२ ॥ (श्री ज्ञानेश्वरी अध्याय १०) या ओव्या लिहितात. यातील दृष्टांत आणि सिद्धांत कोणत्या तोडीचे आहेत (?) हे सुज्ञ वाचकांना विस्ताराने सांगण्याची आवश्यकता नाही. एकएक शब्द म्हणजे केवळ शब्द्ब्रम्हच! वाचतांना कल्पना-बुद्धी सहजतेने नतमस्तक होते असं नितांत सुंदर वाङमय! याच तोडीचे नऊ हजार दृष्टांत आणि



सिद्धांताने नटलेलं ज्ञानेश्वरी नावाचा सर्वांगसुंदर ग्रंथ सर्वांसाठी खुला आहे ! याच अनुषंगाने आजच्या तुकाराम नीती अभंगात जगद्गुरू संत तुकोबाराय अत्यंत कोमल हृदयाने एक एक दृष्टांत देऊन भक्ती-ईश्वर-जीवन ही महान तत्वे समजावून सांगतात. तुकोबांचा ईश्वर आपल्याला नीट समजून घ्यावा लागेल.

तुकोबांचा सगुण ईश्वर म्हणजे त्यांच्याच पूर्वजांनी घरी स्थापन केलेली श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती ! हा तुकोबांचा वसा आणि वारसा ! दुसरीकडे त्यांनी देवाची व्याख्या करतांना "तीर्थी धोंडा पाणी | देव रोकडा सज्जनी ||" अशी व्याख्या करून विविध मार्गाने प्रश्न विचारणारांना निरुत्तर करून टाकले आहे. याशिवाय तुकोबां श्री विठ्ठलाचे सगुण भक्त असल्याकारणाने ते सरळ सरळ त्याच्याशी संवाद साधतात.

कमोदिनी काय जाणे तो परिमळ | भ्रमर सकळ भोगीतसे || धृ ||
तैसे तुज ठावे नाही तुझे नाम | आम्हीच ते प्रेम सुख जाणो || १ ||
माते तृण बाळ दुधाची ते गोडी | ज्याची न ये जोडी त्यासी कामा || २ || तुका म्हणे मुक्ताफळ शिंपी पोटी | नाही त्याची भेटी भोगती ये || ३ || (शा.अ.गाथा अ.क्र.533)

तुकोबांची ही सगुण भक्ती आणि त्याद्वारे अंतर्मनाशी साधलेला हा संवाद खूपच बोलका आहे ! या अभंगात तुकोबाराय अपरोक्षपणे देवाशी संवाद साधतात. साधकाची अवस्था भक्ती करतांना कशी भावविभोर होते (?) याचे हा अभंग सर्वोच्च उदाहरण आहे ! हा अभंग म्हणजे 'श्रवणं किर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम्। अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम्॥' यानवविधा भक्तीमधील शेवटची म्हणजेच आत्मनिवेदन भक्तीची परमोच्च अनुभूती आहे. हा अभंग सर्वांच्या पाठातील आहे. गानकोकिळा स्व. लताजींनी आपल्या सुमधुर आवाजात गायिलेला हा अभंग सर्वांनाच सुपरिचित आहे. तुकोबाराय प्रस्तुत अभंगात भक्ती करणे ही अनुभूती केवळ भक्तालाच येऊ शकते, त्यासाठी तुकोबाराय विविध दृष्टांत देऊन स्वतः ईश्वर भक्तीच्या अनुभवाला कसा पारखा झाला आहे (?) हा सिद्धांत पटवून देतात. हे सांगतांना जगद्गुरू मोठ्या चाणाक्षपणे विविध दृष्टांत जसे कि; कमळाला त्याचा सुगंध माहित नसतो, तो सुगंध-आनंद मात्र एक भुंगा मनमुरादपणे अनुभवतो ! ईश्वर किती प्रेमळ आहे आणि त्याची प्रेमानुभूती काय आहे (?) हे बिचाऱ्या देवालाच कळत नाही. याच माध्यमातून तुकोबा विविध दृष्टांत जसे कि गवत खाणाऱ्या गाईला दुधाची चव काय माहित ? त्याची जोड किंवा आनंद केवळ आणि केवळ वासरुच घेऊ जाणे. शेवटी तुकोबाराय शिंपल्यातून निर्माण होणाऱ्या अनमोल मोत्याचे सर्वोच्च उदाहरण देऊन, देवालाच भक्ती अनुभूती किती श्रेष्ठ आहे ?' याचे प्रतिपादन करतात.

तुकोबांचा हा अभंग म्हणजे श्री विठ्ठलाची मानस पूजा आहे. तुकोबां, देवाचे अस्तित्व सहज-सोप्या पद्धतीने पटवून देतांना, ईश्वराला शोधण्यासाठी कुठेही जाण्याची आवश्यकता नसून, तो प्रत्येक माणसाच्या शुद्ध-सात्विक अंतर्मनात, हृदयांत विराजमान आहे ! याच अनुषंगाने संत कबीरजी

कस्तूरी कुंडल बसे मृग ढूँढ़ै बन माहि।
ऐसे घटी-घटी राम हैं दुनिया जानत नाँहि॥

कस्तुरी मृगाचा दृष्टांत देऊन देव शोधणाऱ्या, त्याच्यासाठी अनंत खटपटी करणाऱ्या माणसांना आपल्याच अंतर्मनात शोधण्याचे प्रतिपादन करतात. हा अभंग निर्गुण भक्तीचं सुद्धा उत्तम उदाहरण आहे. भक्त-ईश्वर आणि भक्ती ह्या तीनही अवस्था एकाच अंतरंगात तरंगत असतात. कमल दलाचा सुगंध घेण्यासाठी माणसाचे अंतरंग कमळासारखे सुगंधी झाले, कि मग भ्रमर होऊन त्याचा सुगंध घेता येतो. माणसाने गाय-तृण-वासरू होऊन तीनही अवस्थांचा अनुभूतीयुक्त आस्वाद घ्यायला हवा! असे झाले कि; प्रत्येक माणसाचे हृदय शिंपला होईल आणि त्यातून आनंदाची लाखो मुक्ताफळे जन्माला येतील! कस्तुरी मृगाची ही आनंदानुभूती इथे प्रत्येक भक्ताला यायची असेल त्याने आपल्या अंतर्मनाच्या स्तरावर ही अनुभूती घ्यावी आणि जीवन ईश्वरमय करावे. जीवनाचा खरा अर्थ व्यक्त करणारा असा हा अभंग !

हे सहृदय वाचकांनो, मागील चार महिन्यापासून म्हणजेच तुकाराम बिजेपासून तुकाराम नीती हे सदर नियमितपणे लिहितो आहे आणि आपण ते मन लावून वाचत आहात. तुकाराम नीती हे सदर लिहिणे का आवश्यक वाटले? याचे कारण म्हणजे आज सगळ्या बाबी आपल्याला सहजतेने उपलब्ध झाल्या असतांना वाचन आणि लेखन संस्कृतीला मरगळ आली आहे. त्यासाठी तुकारामांचे प्रबोधन करणारे अभंग सर्वांच्या अवलोकनात यावेत हा प्रांजळ उद्देश ! तसेच संत तुकारामांचे जीवन आणि त्यातून निर्माण झालेले नितांत सुंदर सुवर्णालंकारीत वाङमय नव्या पिढीच्या नजरेखालून जावे ! आज घराघरातील हरिपाठ, पोथी वाचन बंद झाले आहे. खेड्यापाड्यातील पारावरच्या पोथ्या-गाथा पारायण बंद पडले आहे. गावोगाव होणाऱ्या अखंड हरीनाम सप्ताहातील गाथा भजन बंद झाले आहे. परिणामी गाथ्याचे वाचन आणि सातत्याने अवलोकन व्हावे, यासाठी हा एक छोटासा प्रयत्न करतो आहे. मित्रांनो, खरंच आपण खूप शिकलोय, परंतु आपण आंतर्बाह्य बदलण्यासाठी सतत कार्यरत रहावे. आपल्यातील शुद्ध-सात्विक कमळाचे, सुगंधाचे, मातृप्रेम, वात्सल्यभाव जागृत होऊन माणूस माणूस शिंपला व्हावा आणि त्यातून हजारो प्रेमानुभूती, आनंद, उत्साह, आपुलकी, जिव्हाळारुपी मुक्ताफळे समाजात सर्वत्र आणि घरोघर निर्माण व्हावीत ! असे झाले कि; खऱ्या अर्थाने इथे प्रत्येकाला सर्वांगसुंदर सगुण-निर्गुण भक्तीची सर्वोच्च अनुभती आल्याशिवाय राहणार नाही ! प्रत्येकजण शुद्ध-सात्विक जीवन जगेल आणि आपसूकच सर्व रोग-व्यसनं-भांडणं समाजातून हद्दपार होतील !असं झालं कि; खऱ्या अर्थाने तुकाराम नीतीचं सार्थक झालं ! जय तुकोबाराय!

**(टीपः लेखक हे व्याख्याता, कवी, लेखक, प्रबोधनकार, प्राणायाम प्रशिक्षक आहेत)**



# नौरात्रानिमित्त नारीशक्तीचा गौरव

भारत हा विकसनशील देश आहे, तसेच कृषीप्रधान देश आहे, त्याचबरोबर पुरूषप्रधान देश आहे, असे पूर्वीपासून मानले जात आहे, कारण काही क्षेत्रात पुरूषांची मक्तेदारी सक्तीने चालत आली आहे. पण अलिकडे तीस-चाळीस वर्षात भारतीय स्त्री ही अग्रेसर झालेली आहे. शिक्षण क्षेत्र, चिकित्सा, अभियांत्रिकी, उद्योग-व्यवसाय, माहिती - तंत्रज्ञान, सुरक्षा दल असो, तिने आपले पाय खंबीरपणे रोवले. बरीच क्षेत्रे तिने पादाक्रांत केली. हा अमुलाग्र बदल झाला, पुरूषांची मक्तेदारी तिने मोडून काढली. हे निर्विवाद सत्यय.

याचेच उत्तम उदाहरण म्हणजे, मुंबईकरांच्या जीवाभावाची लोकल सेवा. मध्य रेल्वेच्या लोकलचे माटुंगा हे स्टेशन गेली पाच वर्षे महिलांच्या हाती आहे. त्या उत्तम रितीने, अत्यंत सफाईदारपणे, शिस्तबद्ध पणे सांभाळत आहेत.

महिला सबलीकरण, सशक्तीकरणाच्या उद्देश्याने ही कामगिरी सोपविण्यात आली होती, ती त्यांनी यथासांग पार पाडली. 2017 मध्ये दिलेली ही कामगिरी त्यांनी उत्तमरीत्या पार पाडली. एवढेच नाही तर 2018 मध्ये लिमका बुक ऑफ रेकॉर्ड नेही याची दखल घेतली. ही महिलांसाठी अभिमानाची गोष्ट आहे.

इथे तिकीट चेकर पासून,, सुरक्षारक्षक पर्यंत, व्यवस्थापक, सफाई कामगार सर्व महिलाच आहेत. जवळपास पस्तीस महिला कर्मचारी काम करतात. तिकीट विंडो ते व्यवस्थापन, ऑपरेशन, कमर्शियल, रेल्वे प्रोटेक्शन फोर्स, तिकीट चेकर, उदघोषक आणि अन्य बाकीच्या कामात कार्यरत आहेत.




पस्तीस महिला जारी पण सगळ्यांनाच भारी । असे हे देशातील एक हटके वेगळे रेल्वे स्थानक भारी आहे.

**-सौ. सुनिता रोझेकर मुंबई**

# अविस्मरणीय 'पोस्टातील दिवस'



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**सध्याचे युग हे सोशल मीडियाचे युग आहे. या युगात सोशल मीडियावर ऍक्टिव्ह राहून आपण किती सोशल आहोत हे दाखवून देण्याची चढाओढ लागलेली असते. त्यातही तरुण वर्ग तर सोशल मीडियाच्या आहारीच गेला आहे. सोशल मीडियावर आपले फॅन फॉलोअर्स कसे वाढतील? आपल्या पोस्टला जास्तीतजास्त लाईक आणि शेअर कसे मिळतील याकडे तरुणांचे लक्ष असते. मात्र काही वेळा हेच जास्त फॅन फॉलोअर्स असलेले अकाउंट सायबर गुन्हेगारांना आकर्षित करतात आणि यांना धोका दिला जातो.**

आयुष्य जगताना त्यात अनेक घडामोडी घडत असतात. चढ- उतार असतात. जे क्षण येतात ते आपण सहजपणे जगतो. वर्तमानात जगताना याच अनुभवलेल्या दिवसांकडे पाहताना सगळ्या बारीक नोंदी आठवतात. आयुष्यातील ठरावीक कालखंड आपण कसे जगलो, त्यातून आपण काय शिकलो, याचा विचार करताना ते गेलेले दिवस पुन्हा आठवतात. आपल्या जीवनातील एका ठराविक टप्प्यात आपण जे जगलो, त्या क्षणांना , आठवणींना पुन्हा उजाळा द्यावा, या हेतुने लेखक सुनील पांडे यांनी 'पोस्टातील दिवस' ही आत्मकथनात्मक कादंबरी लिहिली. स्नेहवर्धन प्रकाशनाने ही कादंबरी प्रकाशित केली आहे. प्रथमपुरुषी निवेदनशैली, साधी- सोपी भाषा, ओघवती रचना यामुळे पुस्तक वाचताना आपलेपणा आपोआप निर्माण होतो. वाचकही या आठवणींमध्ये रमतो. कादंबरी ही वर्तमानातील प्रसंगाने सुरु होते. पोस्ट ऑफिसच्या काउंटरच्या रांगेत उभा असलेल्या लेखकाचे मन भूतकाळात कधी विसावते, हे कळतच नाही. या कादंबरीत लेखकाच्या जीवनातील तो महत्त्वपूर्ण काळ उभा राहिला आहे. १९९६ चा काळ. दहावी परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्यानंतर लेखक पुन्हा परीक्षा देण्याच्या उद्देशाने अभ्यासाला लागतात आणि पोस्टातील दिवस सुरु होतात. लेखकाचे वडील नीरेतील पोस्ट ऑफिसमध्ये कार्यरत असताना लेखक आपल्या वडिलांचे काम प्रत्यक्ष पाहत होते. प्रामाणिकपणे, निष्ठेने काम करणाऱ्या आपल्या वडिलांनी पोस्टात केलेली अविरत सेवा, कुटुंबासाठी केलेली धावपळ सुद्धा लेखकाने यात चित्रित केली आहे.

अभ्यास करता करता पोस्टात तात्पुरत्या स्वरुपात लेखक पोस्टात नोकरीला लागतात.वरिष्ठांकडून काम शिकून घेतात. या तात्पुरत्या नोकरीत ते पोस्टातील काम कसे शिकतात, या प्रवासात त्यांना कोणते अनुभव येतात , हे सगळे प्रांजळपणे त्यांनी मांडले आहे.

ज्या काळी मोबाइल, समाज माध्यमे हे तंत्रज्ञान विकसित झाले नव्हते, तेव्हाचा काळ या कादंबरीत अनुभवायला मिळतो. जेव्हा मोबाइल , फेसबुक, व्हाट्सअप या सुविधा नव्हत्या तेव्हा पोस्ट ऑफिसची सेवा हाच संवाद साधण्यासाठी आधार होता.कामानिमित्त किंवा इतर काही कारणास्तव लांब राहणाऱ्या व्यक्तिशी संवाद साधण्यासाठी पत्र पाठवली जायची. तेव्हा पोस्टमन देवासमानच असायचे. प्रत्येक जण आपल्या पत्राची, त्यातील भावनांची आतुरतेने वाट पाहत असायचा.कोणाचे निधन झाले किंवा कोणी आजारी असेल तर तार पाठवली जायची. ती तार घेऊन पोस्टमन तातडीने त्या घरापर्यंत निरोप पोहचवत असत.पोस्टमनची चातकाप्रमाणे लोक वाट पहायचे.एका - एका पत्राचे उत्तर मिळण्यासाठी १५ - १५ दिवस वाट पहावी लागत असे. मोबाइल आल्यामुळे क्षणात संवाद साधणे शक्य झाले आहे. एका ठिकाणी बसून आपण समाज माध्यमाद्वारे कोणत्याही व्यक्तिशी




चुटकीसरशी संवाद साधू शकतो, वीडियो कॉल करू शकतो.यामुळे पत्रलेखन मागे पडले. पत्रातून ज्या भावना व्यक्त व्हायच्या, त्यात मायेचा ओलावा असायचा. आता टाइप केलेल्या मेसेजमध्ये निव्वळ औपचारिकता दिसून येते. या तंत्रज्ञानामुळे पोस्ट खात्यावर झालेले परिणाम या पुस्तकात लेखकाने विशद केले आहेत.

आजही पोस्ट खात्यावरील लोकांचा विश्वास कायम आहे. भलेही पत्र लिहिली जात नसतील पण विविध कागदपत्रे पाठवणे, पार्सल म्हणा , वस्तू इत्यादी... यासाठी पोस्ट खाते विश्वसनीय वाटते. लेखकाने पुस्तकातून फक्त आपले अनुभव मांडले नाहीत तर पोस्ट खात्याचे महत्त्व, त्यांच्यातर्फे पुरवण्यात येणाऱ्या सेवा तसेच पोस्ट ऑफिसचे बदलते स्वरूप, काम करण्याच्या पद्धती, त्यात तंत्रज्ञानाची जोड यामुळे कामाला मिळालेली गती हा प्रवास ही मांडला आहे.हे सर्व शब्दबद्ध करत असताना लेखक पोस्ट ऑफिसच्या अवस्थेकडे लक्ष वेधून घेत आहेत. रंग उडालेल्या भिंती, अंधुक प्रकाश, जुनी कपाटे , जुने फर्नीचर इ.. या वर्णनातून पोस्ट ऑफिसचे वातावरण ही बदलायला हवे, हवेशीर आणि आकर्षक असे मोकळे वातावरण असणे आवश्यक आहे, पोस्ट ऑफिस ही सर्व बाजुनी सुसज्ज असावे, हा बदल व्हावा, असे लेखक सुचवत आहेत.

लेखक पांडे यांनी पोस्टात तार मैसेंजर, पँकर , क्लार्क, पोस्टमन आणि सफाई कामगार अशा जागेवर काम केले. कोणत्याही कामाला नाही म्हंटले नाही. मेहनतीने पैसे कमावण्याची वृत्ती लेखकात रुजू लागली. या लहान वयात पैसे बचत करण्याचा समंजसपणा लेखकाच्या मनात कसा आला, हा जड़णघडणीचा प्रवास या आत्मकथनात्मक कादंबरीत चित्रित झाला आहे. लेखकाच्या वडिलांनी पोस्ट खात्यात केलेली सेवा, या निमित्ताने भेटलेली माणसे, पत्रातून त्यांच्या व्यक्त होणाऱ्या भावना, वेदना तसेच कोणा व्यक्तीच्या बदली पोस्टात काम करणारे लेखक , ही सर्व कामे करताना आलेले अनुभव , आणि त्यांनी जपलेला प्रामाणिकपणा या पुस्तकात शब्दबद्ध केलेला आहे. पोस्ट खात्यावर विपुल लेखन केलेले आढळत नाही. पण लेखक पांडे यांनी या 'पोस्टातील दिवस' पुस्तकाच्या माध्यमातून भूतकाळातील ते दिवस वाचकांसमोर आणले आहेत. लेखकाने आपली ही साहित्यकृती प्रामाणिकपणे आणि निष्ठेने पोस्ट खात्यात सेवा देणारे आपले वडील प्रभाकर पांडे यांना अर्पण केली आहे.कादंबरीचे समर्पक मुखपृष्ठ संतोष धोंगडे यांनी रेखाटले आहे. तसेच डॉ. स्नेहल तावरे यांनी पुस्तकाची पाठराखण केली आहे. नेमक्या शब्दात या कादंबरीचे सार त्यांनी मलपृष्ठावर मांडले आहे. या पोस्टातील दिवसांनी त्यांना काय दिले, काय शिकविले, हे पुस्तक वाचताना अनुभवता येईल. अनुभव हा शिक्षकच असतो, हे अनुभव आपल्याला जीवनातील महत्वाचे धड़े शिकवतात. लेखकाला आलेल्या अनुभवांचे संचित या कादंबरीत सामावलेले आहे. ते पोस्टातील दिवस , तो कालखंड भूतकाळात जमा झालेला असला तरी त्या आठवणीं आजही लेखकाच्या मनात ताज्या आहेत. नक्की अनुभवा 'पोस्टातील दिवस'.

**( पोस्टातील दिवस - आत्मकथनात्मक कादंबरी / लेखक सुनील पांडे / प्रकाशक : स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे / मूल्य : २०० रूपये )**

# नापीक होत असलेल्या जमिनीचे धोके

आधुनिक केसरी

**रासायनिक खतांचा वापर शेतीत कधीपासून सुरू झाला याचा इतिहास क्वचितच कुणाला माहीत असेल. मात्र असे मानले जाते की 1840 च्या सुमारास जर्मन शास्त्रज्ञ लिबिक यांनी प्रथमच नायट्रोजन, फॉस्फरस आणि पोटॅशचा वापर जगासमोर मांडला होता. पुढे जगातील सर्व कृषी शास्त्रज्ञांनी त्यांचे संशोधन मान्य केले. नायट्रोजन, फॉस्फरस आणि पोटॅश (एनपीके) ही खते तयार करून ती शेतात टाकल्यास पिके लवकर वाढू शकतात, असे लीबिक यांनी सांगितले होते. हा नवा प्रयोग जगभरातील शेतकऱ्यांनी स्वीकारला. पण त्याच्या सततच्या वापरामुळे जमिनीची सुपीकता तर कमी झालीच पण करोडो हेक्टर जमीन नापीकही झाली. त्यामुळे जगभर वाळवंटी क्षेत्र झपाट्याने वाढत आहे. जमिनीची सुपीकताही कमी होत आहे. अशा परिस्थितीत निर्मनुष्य वाळवंटात जीवन कसे परत आणायचे हे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. मृदा शास्त्रज्ञांच्या मते, मातीचा दर्जा घसरण्याची चार प्रमुख कारणे आहेत. यामध्ये जलद औद्योगिकीकरण, शेतीमध्ये पाण्याचा अतिवापर, गुरांसाठी कुरणांचे अतिशोषण आणि दुष्काळाचा वाढलेला कालावधी यांचा समावेश होतो.**

आकडेवारी दर्शवतात की रासायनिक खतांच्या वाढत्या वापरामुळे, सुपीक आणि हिरवीगार जमीन देखील नापीक बनली आहे आणि यामुळे जगभरातील सुमारे एक अब्ज लोकांचे जीवन धोक्यात आले आहे. यामुळे लाखो जैविक आणि वनस्पती प्रजातींचे जीवनही धोक्यात आले आहे. झाडांच्या आणि वनस्पतींच्या अनेक प्रजाती कायमच्या नष्ट झाल्या आहेत. शेती आणि बागायतीतून उदरनिर्वाह करणाऱ्या कोट्यवधी लोकांना स्थलांतरित व्हावे लागले आहे. या शतकाच्या मध्यापर्यंत पृथ्वीची एक चतुर्थांश माती वाळवंटीकरणामुळे प्रभावित होईल, असा अंदाज आहे. ही चिंतेची बाब आहे, पण परिस्थिती बिघडण्याआधीच परिस्थिती हाताळण्यासाठी पुढे आलो, तर हे भीषण संकट टाळता येईल.दुसऱ्या महायुद्धानंतर बहुराष्ट्रीय कंपन्यांनी एनपीके खते आणि कीटकनाशकांच्या स्वरूपात शिल्लक राहिलेल्या दारूगोळ्याचे रासायनिक साहित्य विकण्याचा जगभर नवा व्यवसाय थाटला होता. या व्यवसायात कंपन्यांनी भरघोस नफा कमावण्यास सुरुवात केली आणि बाजारात त्यांची मुळेही मजबूत झाली. या कंपन्यांनी बनवलेल्या खतांवर बहुतांश शेतकरी इतके अवलंबून राहिले की या खतांशिवाय कोणतेही पीक घेत नव्हते.

भारत आणि आशियाई देशांमध्ये औद्योगिक क्रांतीनंतर हरित क्रांती सुरू झाली. खते आणि कीटकनाशकांचे व्यवहार करणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांनी चांगले उत्पादन मिळविण्यासाठी कीटकनाशकांचा वापर आवश्यक असल्याचा प्रचार सुरू केला. यानंतर देशातील लहान-मोठे शेतकरी अशा प्रकारे कीटकनाशकांचा वापर करू लागले. त्यामुळे त्याचा जमिनीच्या सुपीकतेवर वाईट परिणाम होऊ लागला. आज परिस्थिती अशी आहे की देशातील लाखो शेतकऱ्यांच्या जमिनीची सुपीकता इतकी खालावली आहे की रासायनिक खते आणि कीटकनाशके मोठ्या प्रमाणात घातल्याशिवाय पीकच येत नाही.रासायनिक खते आणि





कीटकनाशकांच्या वापरामुळे अनेक समस्या निर्माण होतात, असेही कृषी शास्त्रज्ञांचे मत आहे. जमिनीत वाढणारे विषारी प्रमाण अनेक आजारांना कारणीभूत ठरत आहे. यामुळे जमिनीत आढळणाऱ्या घटकांचा समतोलही बिघडला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना नवनवीन समस्यांनी घेरले आहे. आता केंद्र सरकारने रासायनिक खतांना पर्याय म्हणून नीम-कोटेड युरियाचा वापर करण्यास सांगितले आहे. परंतु या संदर्भात हे जाणून घेणे आवश्यक आहे की त्याच्या वापरामुळे माती आणि जनावरांवर काय बरा- वाईट परिणाम होतो.

मातीवरील सर्व संशोधनातून असे दिसून आले आहे की त्यात नायट्रोजन, पोटॅशियम, फॉस्फरस, कॅल्शियम, मॅग्नेशियम, सोडियम, कार्बन, ऑक्सिजन आणि हायड्रोजन कमी प्रमाणात राहणे आवश्यक आहे. परंतु त्यात लोह, सल्फर, सिलिका, क्लोरीन, मॅंगनीज, जस्त, कोबाल्ट, मॉलिब्डेनम, तांबे, बोरॉन आणि सेलेनियमची उपस्थिती देखील कमी प्रमाणात आवश्यक आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की या घटकांचा सहभाग निसर्ग स्वतःच्या मर्जीनुसार ठरवतो, परंतु मानवी क्रियाकलापांमुळे या सर्व घटकांचा समतोल बिघडला आहे. विशेष म्हणजे, नायट्रोजन सेंद्रिय स्वरूपात तसेच अजैविक स्वरूपात जमिनीत अस्तित्वात आहे. जीवाणू अमोनियमशी संवाद साधतात कारण सेंद्रिय पदार्थ विघटित होतात आणि अखेरीस जीवाणूंद्वारे एंजाइम तयार होतात. इतर घटकांचीही स्वतःची विशेष भूमिका असते. कॅल्शियममुळे झाडाच्या स्टेमला बळकटी येते, म्हणून फॉस्फेट फुले आणि फळांसाठी फायदेशीर आहे. मॅग्नेशियम क्लोरोफिल तयार करण्याच्या प्रक्रियेत मदत करते. जमिनीत असलेल्या पाण्यातून वनस्पतींना हायड्रोजन आणि ऑक्सिजन मिळतो. या नैसर्गिक घटकांच्या आधारे माती कशी आहे हे ठरवले जाते. खूप जास्त आम्लता आणि खूप जास्त क्षारता, दोन्ही वनस्पतींसाठी हानिकारक आहेत.

कृषी शास्त्रज्ञ एमएस स्वामीनाथन यांच्या अहवालानुसार, भारतात दरवर्षी 25 लाख टन नायट्रोजन, 33 लाख टन फॉस्फरस आणि 25 लाख टन पोटॅश नष्ट होते. ही धूप रोखल्यास दरवर्षी सुमारे साठ हजार लाख टन मातीचा वरचा थर वाचेल आणि त्यामुळे दरवर्षी सुमारे पंचावन्न लाख टन नायट्रोजन, फॉस्फरस आणि पोटॅशची बचत होईल. विशेष म्हणजे, केंद्र सरकार शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करून त्यांना सुखी शेतकरी बनवण्याचे बोलते, पण प्रश्न असा आहे की जमिनीची घटती सुपीकता वाचवल्याशिवाय हे शक्य आहे का?

केंद्र सरकारच्या पुढाकाराने 1953 मध्ये मृदा संवर्धन मंडळाची स्थापना करण्यात आली. तेव्हापासून लाखो हेक्टर जमीन सुपीक करण्यात आली आहे, परंतु अजून जमीन सुपीक करणे आवश्यक आहे. औद्योगिकीकरण, वनीकरण आणि इतर विकास प्रकल्पांमुळे जमिनीचे क्षेत्रफळही कमी होत आहे, त्याचप्रमाणे जमिनीचा ऱ्हासही वेगाने होत आहे. मातीची धूप रोखण्यासाठी केंद्र सरकारने गावोगावी जनजागृती मोहीम राबवली आहे. याशिवाय इतर मृदसंधारण मोहिमाही राबविण्यात येत आहेत, परंतु शेतकऱ्यांनी जमिनीची सुपीकता राखण्यासाठी पुढाकार घेतला नाही, तर या सर्व मोहिमा यशस्वी होणार नाहीत. अशा परिस्थितीत ज्या कारणांमुळे जमीन नापीक होत आहे, त्या कारणांचा शोध घेऊन जमिनीची सुपीकता वाढवणे आवश्यक आहे.भारतात गेल्या चार दशकांहून अधिक काळ मातीत पोषक तत्वांची कमतरता आढळून आली आहे. सुरुवातीला फक्त नायट्रोजनची कमतरता होती, परंतु धूप, पाणी साचणे, कीटकनाशके आणि रासायनिक खतांचा अतिवापर आणि एकाच पीक चक्रात जास्त पिके घेणे अशा विविध कारणांमुळे जमिनीची सुपीकता कमी झाली. आज परिस्थिती अशी झाली आहे की रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वापर करूनही चांगले उत्पादन मिळत नाही. अशा परिस्थितीत जागृत शेतकरी सेंद्रिय किंवा नैसर्गिक शेतीकडे वळले आहेत ज्यामुळे जमिनीची गुणवत्ता वाढते. यामध्ये कीटकनाशके किंवा रासायनिक खतांचा वापर केला जात नाही. देशातील सर्व शेतकरी कंपोस्ट, हिरवळ आणि सेंद्रिय खत वापरून जमिनीचे आरोग्य सुधारण्यात गुंतलेले आहेत. मात्र जिथे नैसर्गिक शेती होत नाही तिथे मातीची गुणवत्ता आणि संवर्धन करण्याचे मोठे आव्हान आहे.

**-मच्छिंद्र ऐनापुरे, जत जि. सांगली**

# व्यथा डोंगरातील गावाची



ज्ञानेश्वर गायके
मो.नं. 9403384889

आधुनिक केसरी

**मराठवाडा व खान्देशच्या सीमेवर सातमाळा अजिंठा डोंगररांगेत हिरव्या वनराईत सुपखेडा हे टुमदार गाव वसले आहे.गावात सर्व जातीपातीचे लोक गुण्यागोविंदाने राहत असून शेजारच्या डोंगर परिसरात आज ही आदिवासी ठाकर जमातीच्या लोकांनी जुन्या परंपरा कायम जपून ठेवल्या आहे. गाव तसे तालुक्याच्या गावापासून फक्त २२ कि.मी.अंतरावर आहे पण आडवळणावर असल्यामुळे बरेच दिवस गावातील लोकांना पक्का रस्ता माहीत नव्हता. गावाने एकत्र येऊन एकदा निवडणुकीवर बहिष्कार टाकला अन राज्यकर्ते जागे झाले व गावाला हेंगडा वाकडा का होईना रस्ता मिळाला व आपण एक लढाई जिंकलो याचा आनंद गावकऱ्यांना झाला.**



स्वातंत्र्याच्या पंचाहत्तरीत ही गावाच्या समस्या दूर होण्याचं नाव घेत नव्हत्या.देश फोर जी वरून फाइव्ह जी कडे निघाला तरी इथं मोबाईलचे टॉवर नसल्यानं संदेशवहन बंद होते.

आता आपण मोबाईल टॉवरसाठी सरकार दरबारी मागणं करून थकलो म्हणून लोकशाही मार्गाने आंदोलन करूया" सरपंच गावकऱ्यांना म्हणाले.

हो हो आपण तहसीलदार कचेरीवर मोर्चा नेऊ"पोलीस पाटील म्हणाले.अन सर्वांनी या निर्णयाला अनुमती दिली.तहसीलदार कचेरीवर मोर्चा काढण्यात आला.पोलीस पाटील व सरपंचांने मोर्चाचे नेतृत्व करून आपल्या मागण्याचे निवेदन तहसीलदार साहेबांना दिले. शेवटी खूप दिवसांनी अनेकदा निवेदने देऊन व पेपरबाजी करून बी.एस.एन. एल. चे टॉवर गावात आले. गाव आता जगाशी जोडले गेले .गावकरी खुश झाले पण गावाचे ग्रहण काही सुटले नव्हते.

गावात पहिली ते सातवी पर्यंतची जिल्हा परिषदेची व आठवी ते दहावी पर्यत संस्थेची शाळा होती.दोन्ही शाळेतील गुरुजन वर्ग त्या गावातील व वाड्या-वस्त्यावरील लेकरांना मनापासून शिकवत होते. गावातील विद्यार्थी संख्या कमी असल्याने ती वाढावी या हेतूने गावापासून दूर मुख्य रस्त्यावर शाळा हलवण्याचा घाट संस्थेने घातला पण गावाने एकत्र येऊन शाळेचे स्थलांतर थांबवले अन गावाच्या चेहरा उजळला. इतकं सारं होऊनही संकटाची मालिका काही थांबण्याचं नाव घेत नव्हती.

जिल्हा परिषदेच्या शाळेत सात वर्ग व सहा शिक्षक व त्यातील एक गुणवंत शिक्षक तालुक्याच्या गावी निवडणूक विभागात प्रतिनियुक्तीवर असल्याने उरलेले पाच शिक्षक शाळेचा भार उचलत असतांनाच मुख्याध्यापक नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले अन आता चार शिक्षकांच्या भरवश्यावर शाळा चालू लागली पण या शाळेतून प्रतिनियुक्तीवर गेलेले गुरुजी काही शाळेवर परत येण्याचं नाव घेत नव्हते.


आता पुन्हा एकदा गावकरी चावडीवर जमा झाले. ते शाळा सोडून तहसिलला ड्युटी करीत असलेल्या..शिक्षक असून शाळेत न येणाऱ्या शिक्षकाला परत शाळेवर आणण्यासाठी विचारविमर्श करू लागले. पण ते काम इतकं सोपं नाही असे बरेच जण म्हणू लागले तेव्हा सरपंच म्हणाले"शिका ,संघटित व्हा अन संघर्ष करा.हे पुज्यनिय डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सहज नाही सांगितले. त्यांना माहीत होते की जनतेला आपल्या हक्कासाठी स्वतंत्र भारतात ही झगडावे लागेल अन त्या शिवाय दुसरा मार्ग सध्यातरी दिसत नाही.

अन गावकरी आता दिसाआड गटशिक्षणाधिकारी कार्यालय व तहसीलदार कार्यालयात येरझाऱ्या घालू लागले.

शिक्षक देता का शिक्षक ही आर्त विनवणी करू लागले म्हणून तहसीलदारांच्या सूचनेनुसार गटशिक्षणाधिकारी साहेबांनी तहसीलच्या शिक्षकांऐवजी कमी विद्यार्थी पट असणाऱ्या शाळेतील एका शिक्षकाची तात्पुरत्या स्वरूपात ऑर्डर काढली तर मी का जाऊ इतक्या दूर ...मला पाठवलं तर मी आत्महत्या करील अशी धमकी ते वरिष्ठ अधिकाऱ्यांना देऊ लागले..अन रडत खडत सुपखेड्याच्या वाटेवरील मोठमोठ्या खड्ड्यांना चुकवत शाळेवर जाऊ लागले.

अन आता दुपारच्या सुट्टीत शाळेतील लेकरं टेकडीवर जाऊन तालुक्याच्या वाटेकडे आपले तहसीलचे गुरुजी येण्याची वाट पाहू लागले.

# दुसरे शक्तिपीठ- श्री रेणुकामाता (माहूरगड)



आधुनिक केसरी

एक महान तिर्थक्शेत्र व महाराष्ट्रातील शक्तिपीठ मानले जाते. रेणुका देवीचे मंदिर शहरापासुन सुमारे 2.415 किमी अंतरावर नैसर्गिक सौंदर्यात डोंगरावर वसलेले आहे. देवगिरीच्या यादवाचा राजा यानी देवीचे मंदिर सुमारे आठशे ते नऊशे वर्षांपूर्वी बांधण्यात आले होते. दरवर्षी दसर्याच्या दिवशी रेनुकदेवीच्या सन्मानार्थ एक मोठा मेळा भरतो.

देवीच्या साडेतीन शक्तिपीठांपैकी एक मूळ जागृत पीठ म्हणजे, माहूरची श्री रेणुकामाता होय. श्री परशुरामाची माता म्हणूनही रेणुकामातेला ओळखले जाते. महाराष्ट्रातील अनेक परिवारांची ही कुलदेवता आहे. देवीचे मंदिर १३ व्या शतकात देवगिरीच्या यादवकालीन राजाने बांधले आहे असे म्हटले जाते. माहूरगडावरच श्री दत्तात्रयांचा जन्म झाला अशी भाविकांची श्रद्धा आहे. आख्यायिका : एका कथेनुसार, माता पार्वतीने कुब्ज देशाच्या राजाच्या पोटी जन्म घेतला. तिचे नाव रेणू असे ठेवण्यात आले. शंकराचा अवतार मानलेल्या जमदग्नी ऋषीबरोबर तिचे लग्न झाले. जमदग्नीच्या आश्रमात अनेक शिष्य शिकत असत. सर्वांच्या मनोकामना पूर्ण करणारी कामधेनू गाय जमदग्नीकडे होती. राजा सहस्त्रार्जुनाला या कामधेनूचा मोह झाला. त्याने जमदग्नीकडे कामधेनू मागितली. ऋषीने राजाची मागणी मान्य केली नाही. तेव्हा पराक्रमी जमदग्नीपुत्र परशुराम आश्रमात नाही, हे साधून सहस्त्रार्जुनाने आश्रमावर हल्ला केला. आश्रम उद्ध्वस्त करून जमदग्नींना ठार मारले व कामधेनू हिरावून नेली. नंतर त्यांचा पुत्र परशुराम तिथे आला. घडला प्रकार बघून परशुरामाने क्षत्रियांचा विध्वंस करण्याची प्रतिज्ञा केली. पित्याला अग्नी देण्यासाठी कोरी भूमी हवी म्हणून त्याने कावडीच्या एका पारड्यात जमदग्नींचे पार्थिव व दुसऱ्या पारड्यात माता रेणुकेला बसवले. रानोमाळ भटकत अखेर तो माहूरगडावर आला. तिथे वास्तव्यास असलेल्या दत्तात्रेयाने त्याला कोरी भूमी दाखवली व इथेच पित्यावर अग्नीसंस्कार कर असे सांगितले. परशुरामाने प्रथम बाण मारून मातृतीर्थ व सर्वतीर्थ निर्माण केले. या पाण्याने स्नान घालून जमदग्नीवर अंत्यसंस्कार केले. यावेळी माता रेणुका सती गेली. या सर्व विधींचे पौरोहित्य दत्तात्रेयांनी केले. त्यानंतर परशुरामाला माता रेणुकेची खूप आठवण येऊ लागली. तो दुःखी होऊन शोक करत होता, तोच आकाशवाणी झाली. तुझी आई जमिनीतून वर येऊन तुला दर्शन देईल. फक्त तू मागे पाहू नकोस. परंतु परशुरामाची उत्सुकता चाळवली गेल्याने त्याने मागे वळून बघितले. त्यावेळी रेणुकामातेचे केवळ मुखच जमिनीतून वर आले होते. तेवढेच परशुरामाला दिसले. या तांदळा रूपातल्या मुखाचीच माहूरला पूजा होते. परशुरामाला या डोंगरावर मातेचे दर्शन झाले म्हणून याला मातापूर म्हणू लागले. शेजारच्या आंध्रप्रदेशात ऊर म्हणजे गाव ते माऊर आणि पुढे माहूर झाले..!!

# नवरात्र व्रताचा इतिहास, महत्त्व आणि शास्त्र

आधुनिक केसरी

**सर्वमंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके ।**
**शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणि नमोस्तुते ।।**

अर्थ : सर्व मंगलकारकांची मंगलरूप असणारी; स्वतः कल्याणशिवरूप असणारी; धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चारही पुरुषार्थ साध्य करून देणारी; शरण जाण्यास योग्य असणारी; त्रिनेत्रयुक्त असणारी, अशा हे नारायणी देवी, तुला मी नमस्कार करतो.

श्री दुर्गादेवीच्या अतुलनीय गुणवैशिष्ट्यांची ओळख या एका श्लोकावरून होते. जीवनाला परिपूर्ण करणारे जे-जे आहे, त्या त्या सर्वांचे मूर्तीमंत प्रतीक म्हणजे आदिशक्ती श्री दुर्गादेवी. श्री दुर्गादेवीला सर्व जगताची जननी म्हटले आहे. जगताची जननी आपणा सर्वांचीच ती आई असल्याने लेकरांच्या हाकेला सत्वर धावून येते. महिषासुराच्या नाशासाठी अवतार घेणाऱ्या श्री दुर्गादेवीचा उत्सव म्हणजे नवरात्र ! नवरात्रात घटस्थापना करतात. घटरूपी ब्रह्मांडात अवतीर्ण झालेल्या तेजस्वी अशा आदिशक्तीचे म्हणजेच श्री दुर्गादेवीचे अखंड तेवणाऱ्या नंदादीपाच्या माध्यमातून नऊ दिवस पूजन करणे, म्हणजे नवरात्रोत्सव साजरा करणे. या वर्षी 26 सप्टेंबर ते 5 ऑक्टोबर या कालावधीत नवरात्रोत्सव साजरा होत आहे. नवरात्र हे देवीचे व्रत असून महाराष्ट्रासह अनेक ठिकाणी हे व्रत कुलाचार म्हणूनसुद्धा पाळले जाते. या व्रतात नऊ दिवस व्रतस्थ राहून देवीची मनोभावे आराधना केली जाते. आज अनेक राज्यांत याला उत्सवाचे स्वरूपही आले आहे. या उत्सवात हिंदूंना देवीतत्त्वाचा लाभ होतो; मात्र हल्ली नवरात्रोत्सवाला आलेल्या विकृत स्वरूपामुळे त्यातून देवीतत्त्वाचा लाभ तर दूरच; पण त्याचे पावित्र्यही घटले आहे. या उत्सवातील अनुचित प्रकार रोखून त्याचे पावित्र्य राखणे, हेही काळानुसार धर्मपालनच ! नवरात्र व्रतामागील इतिहास, या व्रताचे महत्त्व आणि ते साजरे करण्यामागील शास्त्र या लेखातून जाणून घेऊया.

**तिथी :** आश्विन शुद्ध प्रतिपदा ते नवमी.

**इतिहास :** रामाच्या हातून रावणाचा वध व्हावा, या उद्देशाने नारदाने रामाला नवरात्रीचे व्रत करायला सांगितले. नंतर हे व्रत पूर्ण केल्यावर रामाने लंकेवर स्वारी करून शेवटी रावणाला ठार मारले.

महिषासुर नावाच्या असुराशी प्रतिपदा ते नवमी असे नऊ दिवस युद्ध करून देवीने नवमीला रात्री महिषासुराला ठार मारले. तेव्हापासून तिला महिषासुरमर्दिनी म्हणू लागले.

**महत्त्व :** जगात जेव्हा जेव्हा तामसी, आसुरी आणि क्रूर लोक प्रबळ होऊन सात्त्विक अन् धर्मनिष्ठ सज्जनांना छळतात, तेव्हा देवी धर्मसंस्थापनेकरता पुनःपुन्हा अवतार घेते. त्या देवतेचे हे व्रत आहे. नवरात्रीत देवीतत्त्व नेहमीपेक्षा 1000 पटीने कार्यरत असते. देवीतत्त्वाचा अधिकाधिक लाभ मिळण्यासाठी नवरात्रीच्या काळात 'श्री दुर्गादेव्यै नमः ।' हा नामजप अधिकाधिक करावा.

व्रत करण्याची पद्धत : नवरात्र व्रताला पुष्कळ घराण्यांत कुलाचाराचे स्वरूप असते. आश्विन शुद्ध प्रतिपदेस या व्रताचा प्रारंभ होतो.



**अ.** घरात पवित्र स्थानी एक वेदी सिद्ध करून त्यावर सिंहारूढ अष्टभुजादेवीची आणि नवार्णयंत्राची स्थापना करावी. यंत्राशेजारी घट स्थापून त्याची आणि देवीची यथाविधी पूजा करावी.

**आ.** नवरात्रमहोत्सवात कुलाचाराप्रमाणे घटस्थापना आणि मालाबंधन करावे. शेतातील मृत्तिका आणून तिचा दोन पेरे (बोटाची) जाड चौकोनी थर करावा आणि त्यात (पाच किंवा) सप्तधान्ये घालावी. जव, गहू, तीळ, मूग, राळे, सावे आणि चणे ही सप्तधान्ये होत.

**इ.** मृत्तिकेचा किंवा तांब्याचा कलश घेऊन त्यात पाणी, गंध, फुले, दूर्वा, अक्षता, सुपारी, पंचपल्लव, पंचरत्ने किंवा नाणे इत्यादी वस्तू घालाव्यात.

**ई.** सप्तधान्ये आणि कलश (वरुण) स्थापनेचे वैदिक मंत्र येत नसल्यास पुराणोक्त मंत्र म्हणावेत. तेही येत नसल्यास त्या त्या वस्तूचे नाम घेऊन 'समर्पयामि' म्हणून नाममंत्रांचा विनियोग करावा. कलशामध्ये माळ पोहोचेल अशी बांधावी.

**उ.** नऊ दिवस प्रतिदिन कुमारिकेची पूजा करून तिला भोजन घालावे. सुवासिनी म्हणजे प्रकट शक्ती, तर कुमारिका म्हणजे अप्रकट शक्ती. प्रकट शक्तीचा थोडा अपव्यय होत असल्याने सुवासिनीपेक्षा कुमारिकेत एकूण शक्ती जास्त असते.

ऊ. अखंड दीपप्रज्वलन, त्या देवतेचे माहात्म्यपठन (चंडीपाठ), सप्तशतीपाठ, देवीभागवत, ब्रह्मांडपुराणातील ललितोपाख्यानाचे श्रवण, ललिता-पूजन, सरस्वतीपूजन, उपवास, जागरण इत्यादी कार्यक्रम करून क्षमता आणि सामर्थ्य यांनुसार नवरात्रमहोत्सव साजरा करावा.

**ए.** पूजकाला उपवास असला, तरी देवतेला नेहमीप्रमाणे अन्नाचा नैवेद्य दाखवावा.

**ऐ.** या काळात उत्कृष्ट आचाराचे एक अंग म्हणून श्मश्रू न करणे (दाढीमिशीचे केस आणि डोक्यावरील केस न कापणे), कडक ब्रह्मचर्यपालन, पलंगावर अन् गादीवर न झोपणे, सीमा न उल्लंघणे, पादत्राणे न वापरणे अशा विविध गोष्टींचे पालन केले जाते.

**ओ.** नवरात्राच्या संख्येवर भर देऊन काही जण शेवटच्या दिवशीही नवरात्र ठेवतात; पण शास्त्राप्रमाणे शेवटच्या दिवशी नवरात्र उठणे आवश्यक आहे. त्या दिवशी समाराधना (भोजनप्रसाद) झाल्यावर वेळ उरल्यास त्याच दिवशी सर्व देव काढून अभिषेक आणि षोडशोपचार पूजा करावी. हे शक्य नसल्यास दुसऱ्या दिवशी सर्व देवांवर पूजाभिषेक करावा.

**औ.** देवीच्या मूर्तीच्या विसर्जनाच्या वेळी पेरलेल्या धान्याची झालेली रोपे देवीला वाहतात. त्या रोपांना 'शाकंभरीदेवी' म्हणून स्त्रिया डोक्यावर धारण करून विसर्जनाला घेऊन जातात.

**अं.** नवरात्र बसवतांना आणि उठवतांना देवांचे 'उद्वार्जन' अवश्य करावे. उद्वार्जनासाठी नेहमीप्रमाणे लिंबू, भस्म इत्यादी वस्तू वापराव्यात. रांगोळी किंवा भांडी घासायचे चूर्ण वापरू नये.

**क.** शेवटी स्थापित घट आणि देवी यांचे मनोभावे उत्थापन (विसर्जन) करावे.

**ख.** नवरात्र किंवा इतर धार्मिक विधींत दिवा अखंड तेवत राहणे, हा पूजाविधीचा महत्त्वाचा भाग असतांना तो वारा, तेल न्यून (कमी) पडणे, काजळी धरणे इत्यादी कारणांमुळे विझल्यास ती कारणे दूर करून दिवा परत प्रज्वलित करावा आणि प्रायश्चित्त म्हणून अधिष्ठात्या देवतेचा एकशे आठ किंवा एक सहस्र आठ वेळा नामजप करावा.

**ग.** देवीची पुढीलप्रमाणे प्रार्थना करतात : हे देवी, आम्ही शक्तीहीन झालो आहोत, अमर्याद भोग भोगून मायासक्त झालो आहोत. हे माते, तू आम्हाला बळ देणारी हो. तुझ्या शक्तीने आम्ही आसुरी वृत्तींचा नाश करू शकू.

**घ.** घागरी फुंकणे : अष्टमीला स्त्रिया श्री महालक्ष्मीदेवीची पूजा करतात आणि घागरी फुंकतात.

**च.** प्रांतभेद : गुजरातमध्ये मातृशक्तीचे प्रतीक म्हणून नवरात्रात अनेक छिद्रांच्या मातीच्या मडक्यात ठेवलेला दीप किंवा दिवा पूजला जातो. स्त्रीच्या सृजनात्मकतेचे प्रतीक म्हणून नऊ दिवस पूजल्या जाणाऱ्या 'दीपगर्भ'मधल्या 'दीप' शब्दाचा लोप होऊन गर्भ-गरभो-गरबो किंवा गरबा असा शब्द प्रचलित झाला.

**भावार्थ :** असुर या शब्दाची व्युत्पत्ती आहे – 'असुषु रमन्ते इति असुरः ।' म्हणजे प्राणातच, भोगातच रममाण होतात ते असुर होत. अशा महिषासुराचा आज प्रत्येक मनुष्याच्या हृदयात अल्प वा अधिक प्रमाणात वास असून त्याने मनुष्याच्या आंतरिक दैवीवृत्तींवर वर्चस्व प्रस्थापित केले आहे. या महिषासुराची माया ओळखून त्याच्या आसुरी विळख्यातून मुक्त होण्यासाठी शक्तीच्या उपासनेची आवश्यकता आहे. यासाठी नवरात्रीतील नऊ दिवस शक्तीची उपासना करावी. दशमीला विजयोत्सव साजरा करावा. त्याला दसरा म्हणतात. नवरात्रोत्सवातील अपप्रकार रोखून उत्सवाचे पावित्र्य राखा ! पूर्वी 'गरबा' या नृत्याच्या वेळी देवीची, कृष्णलीलेची आणि संतांनी रचलेली गीतेच म्हटली जात असत. आज भगवंताच्या या सामूहिक नृत्योपासनेला विकृत स्वरूप आले आहे. चित्रपटांतील गीतांच्या तालावर अश्लील अंगविक्षेप करून गरबा खेळला जातो. गरब्याच्या निमित्ताने महिलांच्या छेडछाडीच्या घटना घडतात. पूजास्थळी तंबाखूसेवन, मद्यपान, ध्वनीप्रदूषण इत्यादी अपप्रकारही घडतात. हे अपप्रकार म्हणजे धर्म आणि संस्कृती यांची हानी होय. हे अपप्रकार रोखणे, हे काळानुसार आवश्यक धर्मपालनच आहे.

**संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'सण,धार्मिक उत्सव आणि व्रते' संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था, संपर्क- 9284027180**

# लासूरला दफ्तरमुक्त शाळा भरली किराणा दुकानात

## उपक्रम : विद्यार्थ्यांनी घेतली किराणा दुकानाची इंतभूत माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील लासूर स्टेशन येथे दिनांक 24 सप्टेंबर 2रोजी दर शनिवार-दप्तर मुक्त शाळा उपक्रम -क्षेत्रभेट अंतर्गत जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळा लासुर स्टेशन आणि जिल्हा परिषद प्राथमिक उर्दू शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी लासूर स्टेशन येथील श्रेणिक किराणा मालाच्या किराणा दुकानाला भेट देण्यात आली. किराणा मालाचे दुकानदार किशोर कोठारी यांनी सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत केले क्षेत्रभेटीचे उद्देश आणि कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षिका रामेश्वरी नंदगौळे यांनी केले. यावेळी इयत्ता 4थी च्या विदयार्थीनी वैष्णवी पवार आणि चैतन्या पवार यांनी मुलाखत घेतली. विविध प्रश्न विचारून त्यांच्या कामाची माहिती घेतली. तसेच उर्दू माध्यमाची बुशरा शेख (इयत्ता -8वी हिने सुद्धा प्रश्न विचारले. जसे -किराणा दुकानातील विविध माल कुठून आणता खराब झालेल्या मालाचे काय करता? किती वर्षापासून दुकान चालवता एका ठिकाणी बसून कंटाळा येतो का? अश्या विविध प्रश्नांबरोबरच इलेक्ट्रीक वजनकाटा वापरून वजन कसे करतात, याचेही प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. यानंतर दुकानाचे मालक किशोर कोठारी यांनी मनोगत व्यक्त केले शाळेचे जेष्ठ शिक्षक ज्ञानेश्वर वाकळे यांनी सर्वांचे आभार मानले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक ठाकूर, जोशी मॅडम, उर्दू माध्यमाचे फरजाना शेख, मसरत खान, फिरदोस शेख, शा. व्य. स. अध्यक्ष फिरोज मन्सूरी त्याचप्रमाणे पत्रकार गुलाब वाघ उपस्थित होते. सर्व विद्यार्थ्यांना दुकानदार किशोर कोठारी, श्रेणिक कोठारी यांनी खाऊचे वाटप केले.



# महात्मा फुले यांनी मानवमुक्तीचा विचार दिला : प्रा. डॉ. उमेश बगाडे



आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत महात्मा फुले प्रतिष्ठान, ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र, महात्मा फुले - डॉ. आंबेडकर विचारधारा व संशोधन केंद्र आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने सत्यशोधक समाज स्थापना शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त महात्मा फुले आणि सत्यशोधक समाज या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. उमेश बगाडे हे होते तर अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. संजय मून होते. तसेच कार्यक्रमाचे संयोजक प्रा. डॉ. विना हुंबे, प्रा. डॉ. मेहरूनिसा पठाण, प्रा. डॉ. सतीश दांडगे, डॉ. निर्मला जाधव कार्यक्रम समन्वयक डॉ. सविता बहिरट यांची विचार पिठावर उपस्थिती होती. याप्रसंगी बोलताना डॉ. बगाडे यांनी स्पष्ट केले की, भारतातील स्त्रीमुक्ती चळवळ, अस्पृश्यांची चळवळ, कामगारांची चळवळ, शेतकऱ्यांची चळवळ, ब्राम्हणेतरांची चळवळ या सर्व चळवळींचा उद्‌गम हा सत्यशोधक विचारधारेतून झालेला दिसतो असे स्पष्ट केले. या सर्वांचे सूत्र सत्यशोधक मध्यवर्ती विचार प्रेरणा असलेली दिसते. त्याचबरोबर त्यांनी स्पष्ट केले की महात्मा फुले यांनी कर्ता कर्म संबंध, अनुमान तर्क या दोन्ही बाबी मान्य केल्या, परंतु कल्पनेच्या लहरींच्या स्वरूपात तयार होणारा तर्क हा महात्मा फुल्यांनी स्पष्टपणे नाकारला. कारण हा कल्पना तर्क दृश्यमानता नसलेला परंतु सामाजिक परंपरांचे, प्रतिगामी रूढीवादी साचे तसेच ठेवण्याचे काम याद्वारे केले जाते. तसेच त्यांनी स्पष्ट केले की निर्मिक फक्त एक सृष्टी निर्माण करत असतो. परंतु ही सृष्टी ही स्वतः च्या गतीनियमानुसार चालत असते. यामध्ये ईश्वराचा हस्तक्षेप नसतो किंवा निर्मिकाचा हस्तक्षेप नसतो. या सर्व बाबी भौतिकवादी दृष्टीने निसर्गाच्या गतीनियमानुसार होत असतात. तत्कालीन समाज व्यवस्थेत स्त्रियांना घर सांभाळण्याचे शिक्षण दिले पाहिजे असं सूर निघत असताना महात्मा फुल्यांनी मात्र स्त्रियांना मानवी मूल्यांचे ज्ञान दिले पाहिजे, अनुभवी ज्ञान दिले पाहिजे असे स्पष्ट केले. महात्मा फुलेंनी धार्मिक शोषणाला विरोध केला व विषम सत्ता संबंध शोषणाचा मूळ आधार आहे असेही स्पष्ट केले. अशी मांडणी प्रा. डॉ. बगाडे यांनी केली. तर समाजात माणूस उभ करणे हे एक महत्त्वाचे सूत्र आहे आणि माणूस म्हणून मुक्तिदायी स्वतंत्र उभं राहण्यासाठी हा समाज वैज्ञानिक दृष्टिकोनावरच आधारलेला असावा असे प्रतिपादन प्रा. डॉ. संजय मून यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सविता बहिरट यांनी केले, स्वागत पर दोन शब्द डॉ. विना हुंबे यांनी मांडले. प्रास्ताविक डॉ. सतीश दांडगे यांनी केले तर परिचय डॉ. मेहरूनिसा पठाण यांनी केला व कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. निर्मला जाधव यांनी केले. याप्रसंगी ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्रातील प्रा. अश्विनी मोरे, तसेच केंद्रातील डॉ. विकास टाचले, संजय पोळ, वाणिज्य विभागातील कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# मोटरसायकलस्वार व स्कूलबसची समोरासमोर धडक; एक जागीच ठार

आधुनिक केसरी न्यूज

**कचनेर :** पैठण तालुक्यातील निलजगाव पाडळी रोड वरती स्कूल बस व मोटरसायकलची समोरासमोर धडक झाली. मिळालेल्या माहितीनुसार स्कूल बस ही पोरगावा कडून नीलजगाव कडे चालली होती मोटर सायकल स्वार हा नीलजगाव कडून पाडळी कडे चालला होता दोन्ही वाहनाचे समोरासमोर धडक झाली व मोटर सायकल स्वार जागीच जागेवरच ठार झाला. मृत्यू पावलेल्या मोटरसायकल स्वराचे नाव नवनाथ भरत भादे असे असून तो पाडळी येथील रहिवासी आहे. सदरील घटनेमुळे पाडळी या गावावरती दुःखाचा डोंगर कोसळला व संपूर्ण परिसरामध्ये दुःखाची लाट आली.



# फर्दापूर येथे तरुणाचा तलावात बुडून मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापूर येथील मोहित संतोष जाधव वय १७ हुतात्मा स्मारकनगर फर्दापूर हा महाविद्यालयीन तरुण जनावरांना पाणी पाजण्यासाठी धुंदर शिवार या साठवण पाझर तलावात गेला असता त्याचा अचानक पाण्यात बुडून दि.२३/९/२२ शुक्रवारी रोजी मृत्यू झाला. या मृत्याच्या घटनेमुळे सपूर्ण गावात शोककळा



पसरली होती.सदर घटनेची माहिती फर्दापूर पोलीस ठाण्यात मिळताच सपोनि देविदास वाघमोडे व पोलीस कर्मचारी यांनी पाझर तलावाकडे तात्काळ धाव घेतली आणि गावातील नागरिकांच्या मदतीने चार ते पाचच्या दरम्यान त्याला धरणातून बाहेर काढून सोयगाव ग्रामीण रुग्णालयात घेऊन गेले असता सोयगाव ग्रामीण रुग्णालयचे डॉ. श्याम गायकवाड यांनी मोहित जाधव यास तपासून मृत घोषित केले.

या घटनेची नोंद फर्दापूर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. घटनेची माहिती योगेश खडके यांनी दिली असून, पुढील तपास सपोनि सपोनि देविदास वाघमोडे यांच्या मार्गदर्शनखाली नीलेश लोखंडे आदी पोलीस कर्मचारी तपास करीत आहेत.

# राज्यात सर्वाधिक मद्यपी महिला धुळे जिल्ह्यात!

## राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडून राज्य सरकारचा निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य अहवालातून आणखी एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. राज्यात मद्यप्राशन करणाऱ्यांची संख्या गेल्या तीन वर्षांत दुपटीने वाढली असून सर्वाधिक मद्यपी महिला धुळे जिल्ह्यात तर सर्वात मद्यपी पुरुष हे गडचिरोली जिल्ह्यात आहेत. अशी माहिती समोर आली आहे.

तर विशेष म्हणजे या अहवालामुळे धुळे जिल्ह्याचा व महिलांचा अवमान होत असून हे महिलांविषयी षडयंत्र रचले गेला असल्याचा आरोप ही राष्ट्रवादीने केला आहे. त्यामुळे आज राज्य सरकारचा धिक्कार करीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षासह इतर संघटनेच्या महिलांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करीत आंदोलन केलं आहे. सदर अहवाल मागे न घेतल्यास राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष संबंधित माहिती पुरवणाऱ्या अधिकाऱ्यांच्या तोंडाला काळे



भासतील असा इशारा देखील त्यांनी दिला आहे. सदर या अहवालाबाबत धुळे जिल्ह्यात तीव्र नाराजी व्यक्त होत असून महिलांकडूनही राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य यंत्रणा विभागासह राज्य सरकारचा निषेध व्यक्त केला जात आहे.

या आंदोलनावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष रणजीत भोसले, यशवंत डोमाळे, महेंद्र शिरसाठ, राजेंद्र चौधरी, रईस काझी, मनोज कोळेकर, भटू पाटील, उमेश महाजन, नजीर शेख, फिरोज पठाण, गोरख कोळी, रामेश्वर साबरे, कुणाल पवार, जगन ताकटे, अंबादास मराठे, मयुर देवरे, भूषण पाटील, दानिश पिंजारी, संजय सरग, गोलू नागमल, निलेश चौधरी, रमनलाल भावसार, सरोज कदम, तरुणा पाटील, निर्मला शिंदे, वंदना केदार, स्वामिनी पारखे,निखिल मोमाया, निलेश चौधरी यासह सामाजिक कार्यकर्ते गीतांजली कोळी व आदी महिला पुरुष उपस्थित होते.



# सावळदबारा परिसरात कपाशीवर थ्रीप्सचा हल्ला

## शेतकरी पुन्हा मेटाकुटीस : सोयगाव कृषी विभागाने शेतकऱ्यांना मार्गदर्शन करा; महेशसिँह ठाकूर

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात पावसाळा सुरू होऊन तीन महिने उलटले तरीही परिसरात आजही पावसाने रोज रोज हजेरी असल्याने पिकांवर रोगराईने थैमान घातले आहे. विविध खते औषधी वापरूनही शेतात ओल कायम आहे ऐन दाने भरणीत आलेले मकाचे पीक हातातून जाण्याच्या मार्गावर आहे. परिसरात गेल्या दहा दिवसांपासून दररोज झिमझिम पाऊस पडत राहिला. या पावसाने पीक स्थिती उत्तम असली तरी पानथळ काळपोटीच्या जमिनीला मोठा धोका निर्माण झाला आहे. तर ऐन भरणीत आलेल्या मकाच्या पिकासाठी लागणार नसल्याने मकाचे पिक येणार की जाणार हा मोठा पेच शेतकऱ्या पुढे उभा राहिला आहे. मक्का अमेरिकन अळीने, कापूस ,रोगाने थैमान घातल्याने उत्पन्नात कमीत कमी पन्नास टक्के या प्रमुख पिकांना



फटका बसण्याची शक्यता आहे. यंदाच्या खरीप हंगामासाठी जून महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून पावसाला सुरुवात झाली. त्यानंतर जुलैमध्ये पावसाने जोरदार साथ दिल्याने सप्टेंबरच्या पंधरवडया पर्यंत पिकांची उत्तम स्थितीत होते. जरी मुंग , उडीद , या मालाला योग्य भाव नसला तरी शेतकऱ्यांच्या तोंडावर चैतन्य दिसायचे परंतु, ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात पावसाने जोरदार हजेरी लावली दिल्याने हातातोंडाशी आलेली प्रमुख पिके पाण्यात जाण्याच्या मार्गावर असल्याने शेतकऱ्यांची कंबरडे मोडले आहे. सततच्या दमट गरम वातावरणामुळे पिकांची वाढ खुंटली आहे. याशिवाय कापूस तूर मका या पिकांवर कीड रोगांचे आक्रमण झाले आहे. त्यामुळे परिसरातील पिके धोक्यात आली आहेत. ही परिस्थिती लक्षात घेता शासनाने कृषी विभाग आणि तलाठ्यांमार्फत परिसरातील पिकांचे तातडीने सर्वेक्षण करण्याची मागणी पुढे येत आहे.

शासनाने तातडीने सर्वेक्षण करून नुकसानग्रस्त शेतकर्‍यांना भरपाई द्यावी, अशी अपेक्षा शेतकरी सोनू ठाकूर देव्हारी हे व्यक्त करीत आहेत.गेल्या आठ दिवसांपासून रिमझिम पाऊस तर कधी केवळ ढगाळ वातावरण असल्याने खरिपातील कापूस, मका पिकावर विविध रोगांचा प्रादुर्भाव झालाने उत्पन्नात मोठ्या प्रमाणात घट होण्याची भीती शेतकरी व्यक्त करीत आहे. सावळदबारा परिसरातील देव्हारी, नादातांडा, टिटवी, मोलखेडा, चारुतांडा, घाणेगांव तांडा, डाभा,जामठी आदि गावातील शेतकऱ्यांनी जेमतेम पाण्यावर पूर्व हंगामी कापूस व मका पिकाची लागवड केली आहे. मात्र कपाशीला ऐन फूल पाते व कैऱ्या लगडण्याची व विविध रोगांचा प्रादुर्भाव होण्याची वेळ एक झाली आहे. दरम्यान कपाशी पिकावर थ्रीप्सने हल्ला चढविला आहे, तर त्याचबरोबर पांढरी माशी, मवा, फुलकिडे आणि तुडतुड्यांचा प्रादुर्भाव झाला आहे. नाना प्रकारच्या किटक नाशकांटी फवरणी करूण सुद्धा काहीच उपयोग होत नसल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. कृषी विभागाने मार्गदर्शन उपयोजना सुचवाव्यात अशी मागणी शेतकरी करीत आहे.महसूल विभाग व कृषी विभागाने पंचनामा करावा.कधी ढगाळ वातावरण तर कधी रिमझिम पाऊस सुरू आहे. त्यामुळे कपाशी पिकावर मोठ्या प्रमाणावर थ्रीप्स आले आहे, शेतकरी बांधव थ्रीप्स रससोषक किडीचा नायनाट करण्यासाठी एक हजार रूपये किमातीचा प्रतिपंप खर्च करीत आहे. तरी प्रशानाला याची जाणीव नसते ही एक दुर्दैवी बाब आहे.

# अधिकृत विजजोडणी घेण्याचे उत्सव मंडळांना महावितरणचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळांनी सवलतीच्या दराने तात्पुरत्या स्वरूपात अधिकृत वीजजोडणी घ्यावी. तसेच उत्सव मंडळांनी उत्सवातील देखावे, मंडप, रोषणाई व वीज सुरक्षेतील त्रुटीमुळे होणारे संभाव्य अपघात टाळण्यासाठी गांभिर्याने दखल घेवून उपाययोजना कराव्यात, असे आवाहन महावितरणचे उपकार्यकारी अभियंता निरज बिदे यांनी केले आहे. नवरात्र उत्सव दि. २६/९/२२ सप्टेंबरपासून उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.

महावितरणकडून नवरात्र उत्सव मंडळांना घरगुती वीज दराने वीजपुरवठा देण्यात येणार आहे. मंडळांनी अनधिकृत विजेचा वापर केल्यास भारतीय विद्युत अधिनियम २००३ नुसार कारवाई करण्यात येणार आहे. मंडपातील वीजयंत्रणेचे अर्थिंग सुस्थितीत असल्याची खात्री करून घ्यावी. मंडळाच्या अंतर्गत वायरचे इन्सुलेशन खराब झाल्यास अशा वायर्समधून मंडपाच्या लोखंडी पत्र्यांमध्ये किंवा ओल्या वस्तुमध्ये विद्युत प्रवाह येऊ शकतो. हा प्रकार टाळण्यासाठी वायर्सचे जोड काढून टाकावेत किंवा योग्य क्षमतेच्या इन्सूलेशन टेपने जोड देण्यात यावा. स्वीचबोर्डच्या मागे प्लायवूड किंवा लाकडी फळी लाववी. विजेच्या लघुदाब, उच्चदाब वाहिनी व रोहित्रांचा नवरात्र उत्सवातील आणि मिरवणुकीतील देखाव्यांना स्पर्श होणार नाही, याची काळजी घ्यावी. उत्सवात वीजपुरवठा आणि जनरेटरसाठी स्वतंत्र न्युट्रल घेणे अत्यावश्यक आहे. नवरात्र उत्सवाच्या पदाधिकाऱ्यांनी संबंधीत क्षेत्रातील ३३ केव्ही उपकेंद्र सावळदबारा महावितरणचे सहाय्यक अभियंता योगेश जाधव व कर्मचारी दिपक नेवारे,मंगेश धनोकर, ज्ञानेश्वर घोडके, प्रदिप जाधव, विजय बावणे,अशोक आरके,ब्राम्हणे यांच्याशी सावळदबारा परिसरातील नवरात्र उत्सव मंडळांनी भ्रमणध्वनी क्रमांक नोंदवून ठेवावेत. तसेच तक्रारींसाठी किंवा तातडीच्या मदतीची गरज भासल्यास २४ तास उपलब्ध असलेले १९१२ किंवा १८०० २१२३४३५ किंवा १८०० २३३ ३४३५ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन उपकार्यकारी अभियंता निरज बिदे,सहाय्यक अभियंता योगेश जाधव व महावितरणकडून करण्यात आले आहे.



# वरखेडी खु. येथे कृषि सामाजिक समावेशन पंधरवाडा कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील वरखेडी खु येथे सेवा पंधरवाडा कार्यक्रम दि. २३/०९/२०२२ रोजी कृषि विज्ञान केंद्र येथील शास्त्रज्ञ अशोक निर्वळ, टी.बी. चव्हाण, तालुका कृषि अधिकारी एस.जी. वाघ, कृषि पर्यवेक्षक ए.जे.पाटील, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक ए.एस. महाजन, कृषि सहाय्यक ए.एस. बावस्कर व गावातील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि गावातील प्रगतिशील शेतकरी यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी विविध पिकातील किड व रोग नियंत्रण याविषयीची माहिती टी.बी.चव्हाण विषय विशेषज्ञ के.व्हि.के, औरंगाबाद, अशोक निर्वळ विषय विशेषज्ञ के.व्हि. के, औरंगाबाद, यांनी फळबागेतील किड व रोग तसेच विविध उपाययोजना याविषयीची माहिती दिली, तालुका कृषि अधिकारी एस.जी.वाघ कापूस मुल्यसाखळी प्रकल्प याविषयी माहिती दिली. कृषि पर्यवेक्षक ए.जे.पाटील यांनी एम.आर.ई.जी.एस फळबाग लागवड व ठिबक सिंचन योजना याविषयी माहिती दिली, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक ए.एस. महाजन यांनी शेतकरी गट संघटन व प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजना याविषयी माहिती दिली. कृषि सहाय्यक ए.एस.बावस्कर, कृषी सहाय्यक मानसिंग भोळे (राजपूत), यांनी महाडीबीटी योजना, विविध प्रकारचे सापळे वापरणे याविषयी माहिती दिली. तसेच नितेश राजपूत यांच्या साबण बनविण्याच्या प्रकल्पास सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी भेट देऊन माहिती जाणून घेतली.


# औरंगाबाद जिल्हा टेनिस व्हॉलिबॉल संघ राज्य स्पर्धेसाठी चिखलीला रवाना

## तांत्रिक समितीवर डॉ. आबासाहेब सिरसाट, राज्य निवड समितीवर प्रमोद महाजन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महाराष्ट्र राज्य टेनिस व्हॉलीबॉल संघटनेच्या वतीने आयोजित 24 व्या राज्यस्तरीय टेनिस व्हॉलीबॉल 17 वि 19 वर्षाआतील मुला मुलींच्या स्पर्धेचे चिखली जिल्हा बुलढाणा येथे 23 ते 25 सप्टेंबर दरम्यान आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेमध्ये औरंगाबाद जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी जिल्ह्याचा संघ रवाना झाला असून या स्पर्धेतून तामिळनाडू येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी संघ निवडला जाणार आहे औरंगाबाद संघाच्या खेळाडूंना शुभेच्छा देण्यासाठी राज्य संघटनेचे उपाध्यक्ष व जिल्हा टेनिस व्हॉलीबॉल संघटनेचे अध्यक्ष डॉ आबासाहेब सिरसाठ फादर विल्फ्रेड सलढाणा, वाल्मिक भाऊ





सिरसाठ जिल्हा सचिव प्रमोद महाजन कोषाध्यक्ष करण खोमणे,प्रशिक्षक म्हणून अब्दुल बागेस,अक्षय कदम,भीमाशंकर औताडे,जीवन बैनाडे, रामेश्वर म्हस्के विजय बोर्डे आदींनी संघास शुभेच्छा दिल्या. **मुले संघ :-** अथर्व सिरसाठ, आर्यन खोलवाल, आदित्य काकडे, कार्तिक भुसारे, यश भुसारे, पुनीत वाहूल, यश खोलवाल, सुरज डुबे, कृष्णा डेंगळे, मुलीः कल्याणी पवार, गायत्री शिंदे, स्वरांजली बाळासो, मयुरी शेजवळ, समृद्धी पाचोरे.

# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(ए)तर्फे आष्टीत आज प्रमुख कार्यकर्ता मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**आष्टी :** शहरातील लक्ष्मी लॉन येथे रविवार दि २५ सप्टेंबर रोजी दुपारी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) च्या वतीने प्रमुख कार्यकर्त्यांच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा राष्ट्रीय अध्यक्ष दीपक भाऊ निकाळजे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला आहे. प्रमुख पाहूणे म्हणून बाळासाहेब पवार, दादासाहेब ओव्हाळ, सचिन कोकणे, अशोक ससाणे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.तेथील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून पुढे आण्णा भाऊ साठे चौकात पुष्पहार घालून कार्यक्रमला सुरूवात होणार आहे. दीपक भाऊ यांच्या स्वागतासाठी तालुक्यातील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन कैलास जोगदंड यांनी केले आहे.

# ग्रामीण भागातील रस्त्यांचे भाग्य कधी उजळणार

## ग्रामस्थांची पायपीट : जनतेचे हाल कायम, अपघातात झाली वाढ

आधुनिक केसरी न्यूज

**देव्हारी :** रस्ते देशाच्या विकासाचे प्रतिक आहेत. रस्त्यावरुन देशाच्या विकासाची संकल्पना ठरविली जाते. स्मार्ट सिटी, बुलेट ट्रेनचे स्वप्न बघणाऱ्या देशात ग्रामस्थांना जायला धड रस्ता नाही. नागरिकांना कोसोदूर पायदळ पायपीट करावी लागते. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही नागरिकांना रस्त्यासाठी संघर्ष करावा लागतो. मात्र तरीही ग्रामस्थांच्या जिवाचे हाल थांबायला तयार नाही. बहुतांश ठिकाणी रस्त्यांचे तिनतेरा वाजल्याने अपघातात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.त्यामुळे ग्रामीण भागातील रस्त्यांचे भाग्य उजळणार कधी, हा जनतेचा प्रश्न गेल्या अनेक वर्षानंतरही अनुत्तरीतच आहे. रस्ते आणि विकास हे दोन्ही शब्द अगदी जवळचे आहे. मात्र हे दोनही शब्द एकमेकांपासून कोसोदूर गेल्याचे दिसून येते. ग्रामीण भागातील रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. प्रस्तुत प्रतिनिधीने याबाबत सर्वेक्षण केले असता अनेक गावात जायला धड रस्ताच नसल्याचे दिसून आले.सोयगाव या ग्रामीण भागातील रस्त्यावर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले आहे. या रस्त्यावरुन चालताना नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो.सोयगाव हा मार्ग तर खड्ड्यांचा मार्ग म्हणून ओळखला जातो. या मार्गावर एवढे खड्डे पडले आहेत की या मार्गावरुन प्रवास करणे नागरिकांच्या नाकीनऊ येत आहे. या रस्त्यावर मागील महिन्यात रस्त्यातच




ऑटो उलटल्याची घटना घडली होती. यावरुन या रस्त्यावर किती मोठ्या प्रमाणात खड्डे असेल, याचा सहज अंदाज बांधता येतो. रस्त्यांवरील खड्ड्यामुळे रस्ता अपघातात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. रस्त्यातील खड्डेच आता नागरिकांच्या जिवावर उठले आहे. मात्र सामान्य माणूस मेला काय नि वाचला काय, याचे कोणालाही सोयरसुतूक नाही. ग्रामीण भागातील रस्त्यांची एवढी मोठी दूरवस्था झाली आहे की हजारो खड्डे नागरिकांच्या जिवाला कारणीभूत ठरत आहे. रस्ता दुरुस्तीसाठी नागरिकांना रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागत असेल तर या देशातील नागरिकांचे सर्वात मोठे दुर्दैव कोणते? जनतेच्या समस्या सोडविण्याची संधी सरकारमधील लोकप्रतिनिधींना आहे. रस्ता ही नागरिकांची मुलभूत समस्या असताना याकडे सरकार गांभीर्याने का पाहत नाही, हा जनतेचा सवाल असून रस्त्याचे अच्छे दिन कधी येणार, हा खरा प्रश्न आहे.

# शिक्षकांवर शिकविण्यापेक्षा इतर कामांचेच ओझे अधिक !

आधुनिक केसरी न्यूज

**देव्हारी :** जिल्हा परिषद शिक्षकांवर शिकविण्यापेक्षा इतर कामांचेच ओझे जास्त आहे. त्याचा परिणाम थेट विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर होत असून इंग्रजी शाळांकडे पालकांचा ओढा वाढला आहे. केवळ शिक्षण आणि अध्यापनावर शिक्षण विभागाने लक्ष केंद्रीत केल्यास व इतर कामांसाठी स्वतंत्र यंत्रणा उभारल्यास शिक्षणाची गुणवत्ता सुधारेल असा सूर विविध शिक्षक संघटनांतून उमटत आहे.

राष्ट्रीय पातळीवर जनगणना आणि निवडणुकीची कामे शिक्षकांनी स्विकारली आहे. मात्र, त्याशिवाय बांधकाम, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची कामे, अनेक वेळी मतदार पुनर्निरीक्षण, बीएलओ या कामांना शिक्षकांचा विरोध असताना शिक्षकांना त्या कामात जुंपले जाते. या कामांमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर, अध्ययन अध्यापनावर परिणाम होतो. मूळ ज्या कामांसाठी नियुक्ती आहे तेच काम जर योग्य पद्धतीने करता येत नसेल तर त्याचा विचार शासनाने करायला हवा. शिक्षकांना काही कामांसाठी मानधन मिळते. ते मानधन सुशिक्षित बेरोजगारांना देऊन त्यांच्याकडून ही कामे करून घेतल्यास त्यांनाही लाभ होईल आणि



असल्याने एक शिक्षक शिक्षकेतर कामांत अडकून असतो तेथील विद्यार्थी शिक्षणावर त्याचा परिणाम होत आहे. शासकीय योजनांचा भार - शिक्षकांना मतदार यादी, पशु, गाव, आरोग्य असे अनेक प्रकारचे सर्वे, जनजागृती मोहिमा, जनगणना अशी अनेक कामे करावी लागतात. या कामांसाठीच एक शिक्षक पूर्णवेळ लागतो. - पोषण आहार, धान्य वाटप आणि त्यासोबत त्याचे १२ प्रकारचे रेकॉर्ड ठेवणे, निवडणुकीची कामे, आरोग्य विभागाचे लसीकरण, गावातील आजारी, वृद्ध, बालकांचे सर्वेक्षण, गोळ्या औषधांचे वाटप, कृषी विभागाची कामे, प्रत्येक नव्या उपक्रमांत शिक्षक केंद्रस्थानी असतो. - कोरोना काळातही शिक्षकांना कामे होतीच. शाळेच्या काळात अशी कामे लावल्यावर त्या शिक्षकाने अध्यापन कधी करावे, असा सवाल सामाजिक कार्यकर्ता सुरेश चव्हाण यांना केला आहे. अध्यापनाव्यतिरिक्त ३६ प्रकारचे कामे शिक्षकांना अध्यापनाव्यतिरिक्त ३६ प्रकारचे कामे करावी लागतात. ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणावर त्याचा परिणाम होतो. गुणवत्तेचे शिक्षण विद्यार्थ्यांना मिळण्यासाठी शिक्षकांवर अतिरिक्त कामांचे ओझे नको. शिक्षक शासकीय कर्मचारी आहे. त्याला शिक्षणाव्यतिरिक्त कामे दिली गेली तर ते करतात. मात्र, शिक्षक मूळ ज्या कामासाठी नेमला त्या अध्यापनावर त्याचा प्रतिकुल परिणाम होऊ नये. यासाठी प्रयत्न करत आहोत.

## आत्मा अंतर्गत क्षेत्रीय किसान गोष्टी कार्यक्रमाचे जामठी येथे यशस्वी आयोजन

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील जामठी येथे कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा यांचे मार्फत क्षेत्रीय किसान गोष्टी कार्यक्रमाचे आयोजन दि. २३/०९/२०२२ रोजी करण्यात आले होते यात प्रामुख्याने खरीप पिकातील कापूस, मका व सोयाबीन पिकातील किड व रोग व्यवस्थापन तसेच रब्बी हंगामपूर्व प्रशिक्षण याविषयी माहिती देण्यात आली. यावेळी विविध पिकातील किड व रोग नियंत्रण तसेच कामगंध सापळ्याचा वापर याविषयीची माहिती टी.बी.चव्हाण विषय विशेषज्ञ के.व्हि.के, औरंगाबाद, अशोक निर्वळ विषय विशेषज्ञ के.व्हि.के, औरंगाबाद, यांनी रब्बी हंगाम नियोजन याविषयीची माहिती दिली, तालुका कृषि अधिकारी एस.जी.वाघ कापूस मुल्यसाखळी प्रकल्प याविषयी माहिती दिली, कृषि पर्यवेक्षक ए.जे.पाटील यांनी एम.आर.ई.जी.एस फळबाग लागवड व ठिबक सिंचन योजना याविषयी माहिती दिली, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक ए.एस.महाजन यांनी शेतकरी गट संघटन व प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजना याविषयी माहिती दिली, कृषि सहाय्यक एम.आर.भोळे यांनी महाडीबीटी योजना, विविध प्रकारचे सापळे वापरणे याविषयी माहिती दिली. आजच्या कार्यक्रमात गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक व गावातील प्रगतिशील शेतकरी मोठ्या संखेने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ए.एस. बावस्कर कृषि सहाय्यक धनवट यांनी केले.

## सुधीर कोर्टीकर चालण्याच्या स्पर्धेत प्रथम

आधुनिक केसरी न्यूज




**औरंगाबाद :** जायंट ग्रुप ऑफ औरंगाबाद यांनी त्यांच्या वर्धापनदिनानिमित्त औरंगाबाद मध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी चालण्याच्या स्पर्धेचे आयोजन केले होते.

जायंट ग्रुप ऑफ औरंगाबाद यांनी स्त्री आणि पुरुष मंडळींसाठी दोन वयोगटात ही स्पर्धा रोपळेकर हॉस्पिटल ते शहानुरमीया दर्गा चौक अशी तीन किलोमीटर अंतराच्या चालण्याच्या स्पर्धेचे आयोजन केले होते.

पहिला गट६० ते ७०वर्षे .. दुसरा गट ७० ते ७५ वर्षे महिला नी पुरुषांमध्ये ही स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेला उदंड प्रतिसाद देऊन शंभराच्या आसपास स्पर्धकांची उपस्थिती होती.

पुरुषांच्या ७० ते ७५ वर्षे वयोगटात प्रसिद्ध कलावंत सुधीर कोर्टीकर यांनी प्रथम क्रमांक पटकावला. त्यांच्या या यशासाठी सर्व मित्रांनी त्यांचे मनापासून अभिनंदन केले आहे.

नंतर सर्व स्पर्धकांना नास्ता नी मसाला दूध दिले तसेच प्रत्येक सहभागी स्पर्धकांना जायंट ग्रुप ऑफ औरंगाबादच्या पदाधिकाऱ्यांनी प्रमाणात देवून गौरविण्यात आले. सावजी हॉस्पिटलचे संचालक डॉ.सावजी (रोकडिया हनुमान कॉलनी) यांनी ज्येष्ठ नागरिकांनी त्यांच्या मनात असणाऱ्या आपल्या शरीरातील हाडे, सांधे याविषयी माहिती नी त्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली.

## चिखलीत अवजड वाहतुकीस पायबंद

आधुनिक केसरी न्यूज

**चिखली :** शहराची वाढती लोकसंख्या, वाहनांची होणारी गर्दी, वाहतूक कोंडी यामुळे किरकोळ व गंभीर स्वरुपाचे अपघात होत असताना सर्वसामान्य नागरिकांचेही अतोनात हाल होत आहेत. रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण वाढले असून रस्त्यावरच वाहने पार्किंग केली जात होती. याबाबत जिल्हा पोलिस अधीक्षकांनी जिल्हाधिकारी यांना सविस्तर अहवाल सादर केला असता त्याची दखल घेत जिल्हाधिकारी यांनी चिखली शहरातून अवजड वाहनांना सकाळी १० ते ६ वाजेपर्यंत बंदी घातली असून, मुख्य रस्त्यावर हातगाड्या, वाहने लावण्यास प्रतिबंध जारी केले आहेत. याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी यांनी गुरुवारी (दि.२१) काढले असून, या आदेशाची शहरात पोलिसांनी अमलबजावणी सुरु केली आहे.

शहरातील रस्त्यावर गर्दी वाढली असून अपघात व गर्दी रोखण्यासाठी मेहकर फाटा ते राऊतवाडी, शेलूद हायवे सुरु करण्यात आला आहे. तरीही मालवाहू व अवजड वाहतूक ही शिवाजी महाराज चौक, बाजारपेठ, बाबू लॉज चौक, डीपीरोड व शहरातून जात होती. त्यामुळे अपघात वाढून वाहतूक कोंडीचीही समस्या निर्माण झाली होती. वाढती लोकसंख्या व वाहतुकीची समस्या पाहाता, जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रारूप अधिसूचना प्रसिद्ध केली होती. त्यावर दाखल हरकतींची सुनावणी त्रीसदस्यीय समितीने घेतली होती. या त्रीसदस्यीय समितीने केलेल्या शिफारशी जिल्हाधिकारी यांनी स्वीकारल्या असून, काल याबाबत आदेश पारित केला आहे. सदर आदेशानुसार, चिखली शहरातून अवजड वाहतुकीस मनाई करण्यात आली असून, सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत अवजड वाहतुकीस शहरातून बंदी आहे. विशेष बाब म्हणजे बाबू लॉज ते महाराणा प्रताप पुतळ्यापर्यंत सर्व वाहने, हातगाडी, रस्त्यात बसणारे व हातगाडी ठेवणारे यांना मधोमध विक्रीस मनाई घालण्यात आली आहे. या लोकांना तात्पुरत्या स्वरुपात पारधी मठ येथे जागा देण्याचे आदेशही जिल्हाधिकारी यांनी नगरपरिषद व पोलिसांना दिलेले आहेत. मुख्य रस्ता सर्वसामान्य जनतेसाठी मोकळा ठेवण्यास सांगितले आहे. जयस्तंभ चौक ते बसवेश्वर चौक या दोन्ही बाजूने दुचाकी, चारचाकी वाहने व हातगाडी पार्किंगसाठी मनाई करण्यात आली आहे. बसस्टॅण्डपासून २०० मीटरपर्यंत अवैध प्रवासी वाहनांना बंदी घालण्यात आली आहे.ॲटोस्टॉपसाठी बसस्टॅण्डशेजारी असलेली मोकळी जागा दिली आहे.



कन्नड : शहरातील अग्रवाल युवा मंच कन्नड यांच्या तर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी दहा वाजता बालाजी मंदिर बाजार पेठ येथे या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील 53 महिला पुरुष रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी अग्रवाल युवा मंचाचे सर्व सदस्य उपस्थित होते.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

## सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

### पन्नाशीनंतरचे कामजीवन...

आधुनिक केसरी

कोलेस्टेरॉलचे प्रमाण कमी होते त्यामुळे रक्तवाहिन्यांचा व्यास वाढतो. लिंगाजवळील रक्तवाहिन्या या हृदयातील रक्तवाहिन्यांपेक्षा लहान असतात म्हणून त्या बंद होण्याची शक्यता जास्त असते. म्हणून कोलेस्टेरॉल नियंत्रण 'इरेक्टाईल डिसफंक्शन' साठी महत्त्वाचे असते.

**पाईन नट्स** - यामध्ये झिंक' असून त्यामुळे भावना उत्तेजित होते. यामध्ये ''मॅग्नेशिअयम' असते, ज्यामुळे टेस्टेस्टेरॉन व शुक्राणू वाढतात.

**चेरीज** – यामध्ये 'अन्थोसायनीन' नावाची वनस्पतिजन्य औषधी असते, जी रक्तवाहिन्यांमधील गाठी कमी करते आणि त्यामुळे कंबरेखालील रक्तपुरवठा वाढतो.

**वाईन** - रेड वाईनमुळे टेस्टेस्टेरॉन वाढते 'क्युअर सेटीन' हे टेस्टेस्टेरॉन तयार होण्यास अडथळा असलेल्या संप्रेरकाला विरोध करते. त्यामुळे 'टेस्टेस्टेरॉन' वाढते हे अ‍ॅन्टिऑक्सिंडस असून नायट्रिक ऑक्साईड अ‍ॅसीड वाढवते.

**कतुबा (CATUABA)** – हा प्लान्ट ब्राझीलमध्ये आढळते. हे प्रामुख्याने उतेजना वाढवणे आणि नपुंसकता घालवणे यासाठी वापरतात. कुतुबीन हे ब्रेन मधील सेक्स सेंटरवर काम करतात.

**सॅलमन (SALMAN)**– हा एक ऑईली कोल्ड वॉटर फीश आहे. ज्यामध्ये ओमेगा -३, फॅटी अ‍ॅसिड असतात. यामुळे 'डोमीन' लेवल्स वाढतात. लव मॉल्युकल, मोअर सेक्स मोअर फन.

**ब्राझील नटस्** - यामध्ये सेलेनियम असते. मेल इनफर्टिलिटी यामध्ये उपयागी होतो. याच्या सेवनामुळे स्पर्म मोटिलिटी वाढते.

**पोटॅटोज - (बटाटा)** - या बटाट्यामध्ये पोटॅशियअम असतं ज्यामुळे ब्लड सरक्युलेशन वाढतं.

**मका (CORN)** यामुळे उत्तेजना वाढते, स्टेमिना, जनन क्षमता वाढते. हे अन्टिडीप्रेसन्ट मुळे आलेले इरेक्टाईल डीसफंक्शन कमी करते. **कॅरेट (गाजर)** - शुक्राणूंची संख्या व हालचाल वाढते. **(क्रमशः)**

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी अ‍ॅण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com